



राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव






www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# भारतीय जहाजांना होर्मुझमधून जाण्यास इराणची परवानगी

## भारताचे राजनैतिक यश,समुद्र सुरक्षेवरही चर्चा

**नवी दिल्ली,ता.१२–**

**पश्चिम आशियातील संघर्षामुळे 'होर्मुझ'च्या सामुद्रधुनी'चा वापर करणाऱ्या इंधन पुरवठा मार्गांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. दरम्यान, इराणच्या अधिकाऱ्यांनी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे जाण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.**

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर या मार्गावरील सागरी वाहतूक जवळपास पूर्णपणे ठप्प झाली आहे. दरम्यान, पश्चिम आशियात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थिती आणि इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताला मोठे राजनैतिक यश मिळाले आहे. इराणने



भारतीय ध्वज असलेल्या तेल टँकरना रणनीतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्गाने जाण्याची परवानगी दिली आहे.भारतीय परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास आराघची यांच्यात झालेल्या उच्चस्तरीय चर्चेनंतर हा महत्त्वाचा निर्णय समोर आला आहे.या निर्णयानंतर किमान दोन भारतीय तेल टँकर पुष्पक आणि परिमल सुरक्षितपणे होर्मुझ सामुद्रधुनीतून (पान २ वर)

**बंदरे,जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने माहिती दिली की, सध्या पर्शियन गल्फ क्षेत्रात २८ भारतीय ध्वज असलेली जहाजे कार्यरत आहेत. यापैकी २४ जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीच्या पश्चिमेला असून त्यावर ६७७ भारतीय खलाशी तर ४ जहाजे सामुद्रधुनीच्या पूर्वेला असून त्यावर १०१ भारतीय खलाशी आहेत.या सर्वांच्या सुरक्षिततेवर सक्रियपणे लक्ष ठेवले जात असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.**

# इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध

## लोकसभेत मंत्री हरदीप सिंह पुरी यांची माहिती

**नवी दिल्ली,ता.१२–**

**भारतात पुरेसा इंधन साठा आहे आणि उपलब्धतेबाबत काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही, असे केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितले आहे. संसदेत राहुल गांधींना उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.**

भारत रशियाकडून तेल खरेदी करतो की नाही? याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत केली. तसेच भारताबाबतचे निर्णय अमेरिका का घेते आहे? असाही प्रश्न त्यांनी विचारला त्यानंतर उत्तर द्यायला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी उभे राहिले. त्यांनी देशात इंधनाची काय स्थिती आहे याची माहिती दिली. दरम्यान सिंह उभे राहिले तेव्हा एपस्टिन का दोस्त आया अशा घोषणा विरोधकांनी दिल्या. यावेळी सभापती बिर्ला यांनी विरोधकांना शांत



रहाण्याबरोबरच मुळ मुद्यावर बोला अशी सूचना विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांचेसह सदस्यांना केली.

हरदीप पुरी यांनी माहिती दिली की भारताकडे कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे. डिझेल, पेट्रोल आणि गॅस सिलिंडर यांची कमतरता भासणार नाही. एलएनजी कार्गो रोज येत आहेत. दुसऱ्या कार्गोच्या मार्फतही पुरवठा होतो आहे. पुरवठा १०० टक्के होतो आहे. कॅनडा, नॉर्वे, रशिया यांच्याकडून आपण कच्चे तेल घेत आहोत. एलपीजीचे उत्पादन २८ टक्के वाढले आहे. फ्युएल चॅनल्सचे इतर पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. दीर्घ काळ अशा प्रकारच्या स्थितीला तोंड द्यायला आपला देश तयार आहे. तीन मंत्र्यांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे जी इराण, इस्रायल युद्धस्थिती आणि इंधनाची लागणारी आवश्यकता यावर लक्ष ठेवून आहे. अशी माहिती हरदीप पुरी यांनी दिली.भारतात येणारे ५५ टक्के कच्चे तेल दुसऱ्या ठिकाणाहून येत होते. आता हे प्रमाण वाढवून आपण ७० टक्के केले आहे. २००६-२००७ मध्ये आपण २७ देशांकडून कच्चे तेल घेत होतो. सध्या आपण ४० देशांकडून कच्चे तेल घेत आहोत. आपल्याकडे ज्या देशांचे पर्याय उपलब्ध आहेत ते इतर देशांकडे नाहीत असेही पुरी यांनी सांगितले. मागील ५ दिवसांमध्ये एलपीजीचे उत्पादन २८ टक्क्यांनी वाढवण्यात आले आहे. भारतात राहणारे ३३ कोटी कुटुंब जे गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांना स्वयंपकासाठी गॅस सिलिंडर मिळाला पाहिजे ही भारत सरकारची प्राथमिकता आहे.

**हरदीप पुरी म्हणाले,इतिहासात अशा प्रकारचे युध्द जगाने कधीही पाहिलेले नाही.भारत कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत सुरक्षित आहे. सध्या जे संकट इराण,अमेरिका- इस्रायल युध्दामुळे ओढवले आहे त्याआधी भारत ४५ टक्के क्रूड ऑईल होर्मुझच्या मार्गाने घेत होता. सध्या भारताकडे इंधनाचा पुरेसा साठा आहे.पेट्रोल,डिझेल, टर्बाइन फ्युएल,केरोसीन,फ्युएल ऑईल यांचा तुटवडा नाही.**

# रशियाकडून तेल खरेदी करण्याचे ट्रम्प भारताला कसे काय आदेश देवू शकतात

**नवी दिल्ली,ता.१२(प्रतिनिधी)–**



**मी देशाच्या ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक सुरक्षा विषयावर बोलत आहे. मला बोलू दिले जावे असे राहुल गांधी म्हणत होते.लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना संबंधित विषयावर बोलू देण्याची संधी दिली होती. पण राहुल गांधी यांनी मध्येच एप्सटिन मित्र असा उल्लेख केला. या ठिकाणी बिर्ला यांनी लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना एप्सटिन वगळता अन्य विषयावर बोला असे म्हटले. मात्र काही काळासाठी सभागृहात गदारोळ झाला.**

राहुल गांधी यांना आज लोकसभेत बोलण्याची संधी लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी दिली.

## राहुल गांधी यांची मोदी सरकारवर टीका

राहुल गांधी यांनी सुरुवात करताना अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्ध या पासून सुरुवात केली. होर्मुज कालव्यातून मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वायू आणि इंधनाची आयात भारत करत (पान २ वर)

# मुंबईतील विधानभवन बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**मुंबई,ता.१२ (प्रतिनिधी)–**

**मुंबईतील विधानभवन परिसराला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली. सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच हा प्रकार घडल्याने सुरक्षा यंत्रणांची चांगलीच तारांबळ उडाली.या घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी तातडीने पावले उचलत विधानभवनातील कर्मचारी आणि नागरिकांना सुरक्षितरित्या इमारतीबाहेर काढले. तसेच सुरक्षेचा उपाय म्हणून सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना**



**आत येण्यास मनाई करण्यात आली.**

एकीकडे इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेचा संघर्ष सुरु आहे तर दुसरीकडे मुंबईतील विधानभवनात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. हे अर्थसंकल्पीय (पान २ वर)

# शासकीय रूग्णालयातून बाहेरून औषधे लिहून दिल्यास कारवाई

## वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ

**मुंबई,ता.१२(प्रतिनिधी)**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून रुग्णांना बाहेरून औषधे लिहून दिल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.**



सदस्य अमोल मिटकरी यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथील रुग्णांकरता औषधे उपलब्ध करून देणे या विषयी प्रश्न उपस्थित केला होता.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर रुग्ण येतात. या रुग्णांना आवश्यक औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी रुग्णालयात पुरेसा औषध साठा उपलब्ध करून ठेवला जात आहे. (पान २ वर)

# आर.एन.रवी पश्चिम बंगालचे राज्यपाल

**कोलकाता,ता.१२–**

**पश्चिम बंगालचे नवे राज्यपाल आर. एन. रवी यांनी गुरुवारी कोलकाता येथील लोकभवनात राज्याचे २२ वे राज्यपाल म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली.त्यांना न्यायमूर्ती संजय पॉल यांनी शपथ दिली.**

या शपथविधी सोहळ्याला राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते आणि अधिकारी उपस्थित होते.पश्चिम बंगालचे माजी (पान २ वर)

| रमजान - २३ | |
|---|---|
| इफ्तारी | ०६-४८ |
| सहरी | ०५-२३ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५९९०० रु. | २६४००० रु. |


अंडी ४७५ रुपये शेकडा

# बंद पुलावरून जाण्याचा बेजबाबदारपणा नडला

## दुचाकी नदीत कोसळून दोन जखमी

**मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)–**

**कुरणी मार्गावरील बंद करण्यात आलेल्या पुलावरून जाण्याचा प्रयत्न एका दुचाकीस्वाराला महागात पडला. पुलावरून जाण्याच्या प्रयत्नात मोटरसायकल थेट नदीमध्ये कोसळून दुचाकीस्वार व त्याच्या पाठीमागे बसलेला लहान मुलगा**



**गंभीर जखमी झाल्याची घटना आज सकाळी घडली.**

कुरणी पुलाचे (पान २ वर)

# कोणत्याही सदस्याला नियमांबाहेर बोलण्याचा अधिकार नाही-बिर्ला

**नवी दिल्ली,ता.१२–**

**अविश्वास प्रस्तावावरील चर्चेनंतर पहिल्यांदाच लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला गुरूवारी व्यासपीठावर आले. लोकशाही मध्ये मजबूत विरोधी पक्ष असणे आवश्यक आहे आणि विरोधी पक्षनेत्याला कधीही अडथळा आणला जात नाही, असे त्यांनी सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की संसदेचे नियम सर्वोच्च आहेत आणि कोणीही, अगदी पंतप्रधानही, नियमांपेक्षावरचे नाहीत.**



ओम बिर्ला यांनी स्पष्ट केले की, गेल्या दोन दिवसांत सभागृहात बारा तासाहून अधिक काळ चर्चा झाली जेणेकरून सर्व सदस्यांचे विचार आणि समस्या ऐकल्या जातील. हे सभागृह १.४ अब्ज लोकांचे प्रतिनिधित्व करते. प्रत्येक खासदार आपल्या घटकांच्या समस्या आणि अपेक्षा घेऊन येथे येतो.मी नेहमीच प्रयत्न केला आहे की प्रत्येक खासदार नियमांच्या चौकटीत राहून आपले विचार व्यक्त करेल.मी नेहमीच बोलण्यास संकोच करणाऱ्या प्रत्येक खासदाराला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला (पान २ वर)

# कर्जमाफीच्या शेतकऱ्यांची संख्या अद्याप अनिश्चितच

## समितीचा अभ्यास सुरूच

**पुणे,ता.१२–**

**राज्य सरकारतर्फे अर्थसंकल्पात दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली आहे. यासंदर्भात नेमण्यात आलेल्या प्रवीण परदेशी समितीच्या अहवालाची प्रतिक्षा असून, त्यानंतरच त्यातील निकष आणि संख्या स्पष्ट होणार आहे.**

हा अहवाल गेल्या आठवड्यात राज्य सरकारकडे सादर केला जाणार होता. मात्र, अजूनही त्यासंदर्भात अभ्यास सुरू असल्याचे सहकार विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा अहवाल सादर होऊन शेतकऱ्यांची नावे आणि संख्या स्पष्ट होण्याची शेतकरी वाट पाहत आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. त्यापूर्वीच राज्य (पान २ वर)

# कबनूरमध्ये गॅस सिलेंडरचा स्फोट;सुदैवाने अनर्थ टळला

**कबनूर,ता.१२(वार्ताहर)–**

**येथील परीट गल्लीतील एका घरात सायंकाळी सातच्या सुमारास घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. सुदैवाने सिलेंडर टाकीतील गॅसच संपल्याने काही वेळातच आग आपोआप विझली.**

आज कबनूर गावच्या उरुसाचा मुख्य दिवस असल्याने त्या घरातील गृहिणी स्वयंपाक करण्यात मग्न असतानाच अचानक सिलेंडरच्या टाकीचा स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. आगीमुळे घरातील इलेक्ट्रिक फिटिंग जळाले. मोठ्या प्रमाणात धूर झाला.

आग लागलेल्या गॅस सिलेंडरजवळ दुसरी भरलेली सिलेंडर टाकी होती. घरातील लोकांनी भरलेली सिलेंडरची टाकी घेऊन बाहेर पळ काढला. नंतर सिलेंडर स्फोटचा आवाज व आरडाओरडा ऐकून शेजारी जमले. धुराच्या लोटामुळे आत नेमके किती नुकसान झाले. याचा अंदाज येत नव्हता. आग कशी विझवायची या विचारात असतानाच स्फोट झालेल्या सिलेंडर टाकीतील गॅस संपल्याने आग आपोआपच विझली. त्यानंतर इचलकरंजी महानगर पालिकेची अग्निशामक दलाची गाडी आली. पण आग विझली असल्याने गाडी तशीच गेली. उरुसाचा मुख्य दिवस असल्याने बंदोबस्तास असलेले पोलीसही घटनास्थळी पोहोचले. सुदैवाने जीवित व वित्त हानी झाली नाही.

### हास्यतुषार -सुरेंद्र दास



ह्या युद्धामुळे गॅस टंचाई बरोबर अजून आपल्याला कशा कशासाठी गॅसवर राहाव लागणार देव जाणे!

# कागल एमआयडीसीत केरळचा युवक ठार

**सांगाव ता.१२(प्रतिनिधी)–**

**पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील एमआयडीसी रस्त्यावर ट्रक आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात युवकाचा जागीच मृत्यू झाला. आकाश चंद्रू सी (वय २७, रा. तिरुअनंतपुरम, केरळ) असे मृताचे नाव आहे. हा अपघात गुरुवारी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास घडला.**



मिळालेल्या माहिती नुसार, गोकुळ शिरगाव येथील सीडब्ल्यूसी-२ मधून (पान २ वर)

# शिवसेना पक्ष,धनुष्य-बाण कुणाचा?

## दोन्ही गट अंतिम युक्तिवादासाठी तयार

**नवी दिल्ली,ता.१२–**

**गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात धगधगत असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाचा निकाल पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी पार पडली, मात्र पुढील सुनावणीसाठी अद्याप कोणताही मुहूर्त निश्चित करण्यात आलेला नाही. दोन्ही बाजूंचा लेखी युक्तिवाद अभ्यासल्यानंतर सर्वोच्च न्यायालय पुढील तारीख जाहीर करणार असल्याने, या प्रकरणाचा सस्पेन्स अधिकच वाढला आहे.**

गुरुवारच्या सुनावणीदरम्यान उध्दव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. दोन्ही गटांनी (ठाकरे आणि शिंदे) अंतिम युक्तिवादासाठी आपली तयारी दर्शवली आहे. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, या प्रकरणातील व्याप्ती मोठी असल्याने दोन्ही बाजूंचे लेखी मसुदे आधी अभ्यासले जातील आणि त्यानंतरच अंतिम सुनावणीसाठी वेळ निश्चित केली जाईल. पुढील तारीख सर्वोच्च न्यायालयाकडून नंतर कळवण्यात येणार आहे.

२०२२ मध्ये शिवसेनेत पडलेल्या उभ्या फुटीनंतर हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता. निवडणूक आयोगाने फेब्रुवारी २०२३ मध्ये धनुष्यबाण चिन्ह आणि शिवसेना हे नाव एकनाथ शिंदे गटाला दिले. या निर्णयाला उध्दव ठाकरे यांनी आव्हान दिले आहे. ही याचिका गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने शिवसैनिकांमध्ये आणि राजकीय वर्तुळात निकालाबाबत मोठी उत्सुकता आहे. (पान २ वर)

(पान १ वरून)

## रवी पश्चिम बंगालचे राज्यपाल

राज्यपाल सी.व्ही.आनंद बोस यांनी अचानक राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकारने आर.एन.रवी यांची राज्याच्या नव्या राज्यपालपदी नियुक्ती केली.यापूर्वी ते तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून कार्यरत होते. तामिळनाडूमधील त्यांच्या कार्यकाळात राज्य सरकार, विशेषतः मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील सरकारसोबत विविध मुद्यांवर त्यांचे मतभेद चर्चेत राहिले होते.अनेक विधेयकांवरून राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील वाद सार्वजनिकरित्या समोर आले होते. इतकेच नव्हे तर राज्य सरकारने राष्ट्रपतींकडे राज्यपालांना पदावरून हटवण्याची मागणीही केली होती.दरम्यान, सी. व्ही. आनंद बोस यांच्या अचानक राजीनाम्यावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यापूर्वीच प्रश्न उपस्थित केले होते. या राजीनाम्याच्या बातमीने आपण स्तब्ध आणि चिंतित झाल्याचे म्हटले होते. तसेच आगामी विधानसभा निवडणुकांपूर्वी कोणत्याही राजकीय दबावाखाली हा निर्णय घेतला गेला असल्यास ते चिंताजनक ठरेल, अशी शंका त्यांनी व्यक्त केली होती.आता आर. एन. रवी यांनी राज्यपालपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर राज्यातील पुढील राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बॉम्बने उडवून देण्याची धमकी

अधिवेशन सुरु असताना मुंबईतील विधानभवनाला बॉम्बने उडवून देऊ, अशी धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली होती. त्यामुळे खळबळ उडाली.अर्थसंकल्पीय अधिवेशन हे महत्त्वपूर्ण मानले जाते. कारण राज्याचा संपूर्ण अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जातो. यावर चर्चाही होते. काही वेळात चर्चेला सुरुवात होणार होती, त्यापूर्वीच ई-मेलद्वारे विधानभवन उडवून देऊ अशी धमकी पहाटे आल्याने एकच खळबळ उडाली. यानंतर सुरक्षा यंत्रणा सक्रीय झाली. तसेच पोलीसही सक्रीय झाले होते. या संपूर्ण परिसरातून नागरिक, येथे काम करणारे कर्मचारी त्यांना बाहेर काढले गेले. तसेच प्रत्येक केबिनची तपासणी केली जात होती. कुठे काही संशयास्पद गोष्टी आढळतात का, याची झाडाझडती घेतली जात होती.तसेच जे लोक बाहेरुन येतात, त्यांचेही प्रवेश पास बंद केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.त्यामुळे कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवा, असे आदेश विधानसभा अध्यक्षांनी दिले आहेत.

त्यासोबत बॉम्ब शोधक पथकालाही पाचारण करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. तसेच डॉग स्कॉड पथकालाही बोलवण्यात आले होते. या संपूर्ण परिसराची सध्या तपासणी केली जात असून या ठिकाणी काही संशयास्पद वस्तू आढळतात का, याचीही पाहणी केली गेली. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात चिंतेचे वातावरण पाहायला मिळाले. दक्षता घेऊन सध्या सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

## औषधे लिहून दिल्यास कारवाई

शासकीय महाविद्यालयांमध्ये औषध खरेदीची ठराविक प्रक्रिया आहे. औषध खरेदीसाठी मिळणाऱ्या निधीपैकी सुमारे ७० टक्के खरेदी वस्तू प्राधिकरणामार्फत केली जाते, तर उर्वरित ३० टक्के रक्कम संबंधित संस्थांकडून खर्च केली जाते. याशिवाय जिल्हा नियोजन समिती मधून प्राप्त होणाऱ्या निधीतूनही आवश्यक औषधांची खरेदी करण्यात येते.हसन मुश्रीफ म्हणाले, अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संदर्भात सदस्यांनी उपस्थित केलेल्या बाबींची दखल घेतली जाईल. या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासणी करून अहवाल घेतला जाईल. या रुग्णालयात सुमारे एमआरआय, सीटी स्कॅन तपासण्या केल्या जात असल्याचेही वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले. तसेच शासकीय रुग्णालयात पीपीपी तत्वावर नवीन यंत्रणा उभारण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

## बेजबाबदारपणा नडला

पिलर कोसळल्यामुळे प्रशासनाने हा पूल पूर्णपणे बंद केला आहे. दोन्ही बाजूंनी मुरूम टाकून रस्ता अडवण्यात आला असून नागरिकांना या मार्गाने जाण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र सुमारे दोन किलोमीटरचा वळसा टाळण्यासाठी काहीजण जीव धोक्यात घालून मुरूमावरूनच वाहन नेण्याचा प्रयत्न करत आहेत.आज सकाळी अशाच प्रकारे एक दुचाकीस्वार पुलावरून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्याची मोटरसायकल घसरली आणि थेट नदीमध्ये कोसळली. या अपघातात दुचाकीस्वारासह पाठीमागे बसलेला लहान मुलगा गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत मदतकार्य सुरू केले. नदीत पडलेली मोटरसायकल बाहेर काढण्यासाठी नागरिकांनी मोठी शर्थ केली. पूल बंद असूनही काही नागरिकांकडून धोकादायक पद्धतीने वाहन नेण्याचा प्रयत्न केला जात असल्याने अशा प्रकारच्या अपघातांच्या घटना घडत आहेत. सुदैवाने या अपघातात दोघांचाही जीव थोडक्यात बचावला, अशी चर्चा घटनास्थळी उपस्थित नागरिकांमध्ये सुरू होती. प्रशासनाने या मार्गावर अधिक कडक बंदोबस्त ठेवण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## आदेश कसे काय देवू शकतात

असतो. ही आयात इराणने थांबवलेली आहे. यामुळे भारतात नैसर्गिक वायू आणि इंधनाचा तुटवडा जाणवत आहे. ही प्रारंभिक स्थिती आहे. याचे आणखी दूरवर गंभीर परिणाम होतील असा उल्लेख राहुल गांधी यांनी केला. भारत सार्वभौम देश आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताला रशियाकडून ३० दिवस नैसर्गिक वायू आणि इंधन खरेदी करण्याचा आदेश देतात. हा आदेश ते केवळ भारत-अमेरिका व्यापारी करारामुळे देतात. भारत या ठिकाणी तडजोड करत आहे. भारताचे हित आता अमेरिकेवर अवलंबून आहे. आपण अमेरिकेचे कसे ऐकायचे असा प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला. आपण कोणत्याही देशाकडून नैसर्गिक वायू आणि इंधन खरेदी करू शकतो असे राहुल गांधी म्हणाले. नैसर्गिक वायू आणि पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी आहेत. ते सभागृहात होते. त्यांचे नाव एप्सटिन फाइलमध्ये आले आहे. हे स्वतः पुरी यांनी कबूल केले आहे. म्हणून मी बोलत आहे असे गांधी यांनी म्हटले. गांधी पुढे जाऊन काय बोलतील याचा अंदाज घेऊन लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना परवानगी दिलेल्या विषयांवर बोला असे म्हटले. एप्सटिन फाइल हे प्रकरण म्हणजे कमरेखाली वार आहे. यात एका उद्योगपतीचे नाव आले आहे. हे प्रकरण राजकीय पटलावर उत्कंठेने चर्चेला घेतले जाते. भारत किमान ४० देशाकडून नैसर्गिक वायू आणि इंधन आयात करत असतो असे समजले. यामुळे भारतात इंधन तुटवडा जाणवणार नाही असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सामान्य लोकांनी विनाकारण संयम सोडू नये असे सरकारने आवाहन केले आहे.

## संख्या अद्याप अनिश्चित

सरकारने माजी सनदी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्य उच्च अधिकार समिती नेमली आहे.ही समिती कर्जमुक्तीसाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचविणार आहे. तसेच, कर्जमाफी देण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्याही निश्चित करणार आहे. त्यामुळे या समितीच्या अहवालाकडे शेतकऱ्यांचे डोळे लागून आहेत.

# भारतीय जहाजे होर्मुझमधून जाणार

(पान १ वरून )

मार्गक्रमण करत आहेत. वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय जहाजांच्या हालचालींवर परिणाम झालेला असताना हा समुद्री मार्ग विशेष संवेदनशील मानला जात आहे.अमेरिका,युरोप आणि इस्रायलशी संबंधित अनेक जहाजांवर अद्याप निर्बंध कायम आहेत. मात्र भारतीय टँकरना मिळालेल्या या सवलतीमुळे भारताच्या ऊर्जा पुरवठ्याबाबतची चिंता काही प्रमाणात कमी झाली आहे.यापूर्वी लायबेरियाचा ध्वज असलेला एक तेल टँकर,जो सौदी अरेबियातून कच्चे तेल घेऊन येत होता आणि ज्याचे नेतृत्व एका भारतीय कॅप्टनकडे होते, तो दोन दिवसांपूर्वी सुरक्षितपणे होर्मुझ मार्ग पार करून मुंबई बंदरात पोहोचला होता. सध्याच्या संकटाच्या काळात भारतात पोहोचलेले हे पहिले जहाज मानले जात आहे.

विदेशी जहाजांवर निर्बंध असताना केवळ भारतीय टँकरना सुरक्षित मार्ग देणे हे भारताच्या स्वतंत्र आणि संतुलित परराष्ट्र धोरणाचे यश मानले जात आहे. या निर्णयामुळे युध्द आणि संभाव्य नाकेबंदीच्या परिस्थितीतही भारताची ऊर्जा पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेला संघर्ष आता तेराव्या दिवशी पोहोचला आहे.

वाढत्या तणावामुळे या प्रदेशातील सागरी वाहतूक जवळपास ठप्प झाली असून जागतिक तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे.या काळात इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर कडक निर्बंध लागू केले आहेत. तेहरानचे म्हणणे आहे की,अमेरिका आणि इस्रायलच्या हितांशी संबंधित नसलेली जहाजेच सुरक्षितपणे या मार्गाने जाऊ शकतात.

## गौण खनिज वाहतुक; दंड वसुलीसाठी आदेश

मुंबई,ता.१२(प्रतिनिधी)

**अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध फडणवीस सरकारने आक्रमक पाऊल उचलले असून दंड आकारूनही थकबाकी न भरणाऱ्यांकडून ३१ मार्च २०२६ पर्यंत वसुली पूर्ण करण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ताकीद देणारे परिपत्रक आज जारी केले.**

# भारत-इराणमध्ये समुद्री सुरक्षा,ऊर्जा हितांवर चर्चा

**नवी दिल्ली,ता.१२-**

**पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि समुद्री सुरक्षेच्या मुद्यावर भारत आणि इराण यांच्यात कूटनीतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी सांगितले की, अलीकडच्या काही दिवसांत परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री यांच्यात तीन वेळा चर्चा झाली आहे.**

जायस्वाल यांनी सांगितले की, दोन्ही नेत्यांमधील अलीकडील चर्चेत समुद्री जहाज वाहतुकीची सुरक्षा तसेच भारताच्या ऊर्जा सुरक्षेशी संबंधित मुद्यांवर विचारविनिमय झाला.मात्र, या चर्चेचे निष्कर्ष किंवा संभाव्य निर्णयांविषयी अधिक माहिती देण्यास त्यांनी नकार देत, याबाबत आत्ताच अधिक बोलणे घाईचे ठरेल असे स्पष्ट केले.

इराणमधील सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या परतीसाठी भारत सरकार सक्रियपणे मदत करत आहे. जायस्वाल यांनी सांगितले की, सध्या इराणमध्ये सुमारे ९,००० भारतीय नागरिक आहेत. यामध्ये विद्यार्थी,नाविक,व्यावसायिक, उद्योजक, विविध क्षेत्रातील तज्ञ तसेच काही तीर्थयात्री यांचा समावेश आहे.त्यांनी सांगितले की, विशेषतः अनेक विद्यार्थी आधीच इराणमधून बाहेर पडून आपल्या घरी परतले आहेत.तसेच तेहरानमध्ये राहणाऱ्या अनेक भारतीयांना – ज्यामध्ये विद्यार्थी आणि तीर्थयात्रींचा समावेश आहे – खबरदारीचा उपाय म्हणून इराणमधील इतर सुरक्षित शहरांमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.

**परराष्ट्र मंत्रालयाने इराणमध्ये असलेल्या आणि स्थलसीमा मार्गे देश सोडण्याची इच्छा असलेल्या सर्व भारतीय नागरिकांना भारतीय दूतावासाने जारी केलेल्या सूचनांचे (ॲडव्हायजरी) पालन करण्याचे आणि त्यानुसारच प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे.**

जायस्वाल यांनी पुढे सांगितले की, जे भारतीय नागरिक इराण सोडून परतू इच्छितात, त्यांना अझरबैजान आणि आर्मेनिया मार्गे बाहेर पडण्यासाठी मदत केली जात आहे.यासाठी भारतीय दूतावास त्यांच्या व्हिसा प्रक्रियेत सहाय्य करत असून स्थलसीमा (लँड बॉर्डर) पार करण्यासाठीही मदत पुरवली जात आहे. अनेक भारतीय नागरिकांनी दूतावासाशी संपर्क साधला असून त्यांना अझरबैजान आणि आर्मेनिया सीमेपार जाण्यास मदत करण्यात आली आहे. त्यानंतर तेथून व्यावसायिक विमानसेवांद्वारे ते भारतात परतत आहेत.

## साडेसहा लाखांची रोकड हिसकावून दोघांचे पलायन

### पोर्ले तर्फ ठाणे गावातील प्रकार

**कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)**

**गोल्ड लोन केलेली ६.६० लाखांची रोकड घेऊन निघालेल्या व्यक्तीच्या हातातील पिशवीला हिसडा मारून दुचाकीस्वारांनी रक्कम लंपास केली. बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. सचिन शिवाजी गौड (वय ४९, रा. फुलेवाडी) यांनी पन्हाळा पोलिसांत फिर्याद दिली आहे.**

गोल्ड लोन तारण केल्यानंतर सचिन गौड हे पोर्ले गावातील एका सहकारी पतसंस्थेतून बाहेर पडले. तेथून जात असताना चंद्रकांत मारुती शिंदे व कुमार कुऱ्हाडे (रा.पडळ,ता.पन्हाळा) या दोघांनी गौड यांच्या हातातील पैशाची पिशवी हिसकावून दुचाकीवरून पलायन केले.संशयित ओळखीचे असल्याने मस्करीतून त्यांनी असा प्रकार केला असावा म्हणून त्यांनी त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. सचिन गौड यांनी याबाबत रात्री साडेआठ वाजता पन्हाळा पोलीस ठाण्यात चोरीची फिर्याद दाखल केली आहे.

* कोल्हापूर,ता.१२-

**कोल्हापूर महानगरपालिका परिवहन समितीच्या सभापतीपदी निवड झाल्यानंतर युवा उद्योजक सत्यजित चंद्रकांत जाधव यांनी तात्काळ कामाला सुरुवात करत परिवहन विभागाचा सविस्तर आढावा घेतला. परिवहन विभागाला उर्जितावस्था देत केएमटी सेवा अधिक सक्षम आणि स्वयंपूर्ण करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

# नियमाबाहेर बोलण्याचा अधिकार नाही-बिर्ला

(पान १ वरून )

आहे, कारण बोलण्याने लोकशाहीचा संकल्प मजबूत होतो. सभागृहाला विचारांसाठी एक चैतन्यशील व्यासपीठ म्हणून वर्णन करताना ते म्हणाले की,गेल्या दोन दिवसांत सर्व सदस्यांचे विचार गांभीर्याने ऐकले गेले.ते प्रत्येक सदस्याचे, जरी ते टीकाकार असले तरी, आभारी होते. हे सभागृहाचे वैशिष्ट्य आहे, जिथे प्रत्येक आवाज ऐकला जातो. ही जागा कोणत्याही व्यक्तीची नाही; ती लोकशाहीच्या महान आत्म्याचे प्रतिनिधित्व करते.

ओम बिर्ला यांनीही विरोधी पक्षाच्या तक्रारींना उत्तर दिले.काही सदस्यांनी असा दावा केला की, विरोधी पक्षनेत्याला बोलण्यापासून रोखण्यात आले आहे. ते म्हणाले, नियमांनुसार कोणालाही सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे हे मी स्पष्ट करू इच्छितो. काही लोकांचा असा विश्वास होता की सभागृहनेता सर्व नियमांपेक्षा वर आहे. मी हे स्पष्ट करू इच्छितो की असे नाही. मला हे नियम वारशाने मिळाले आहेत आणि त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. जरी ते पंतप्रधान असले तरी, नियम ३७२ अंतर्गत, त्यांनी प्रथम सभापतींची परवानगी घ्यावी. जेव्हा कोणताही सदस्य या सभागृहाच्या शिष्टाचाराचे उल्लंघन करतो तेव्हा मला कठोर निर्णय घेण्यासाठी एक यंत्रणा प्रदान करावी लागते. नियमांनुसार, कोणत्याही सदस्याला सभागृहात बोलण्याचे स्वातंत्र्य आहे, पण नियमांच्या मर्यादेत. चर्चेदरम्यान काही लोकांनी त्यांच्यावर मायक्रोफोन बंद केल्याचा आरोप केला. सभापतींकडे मायक्रोफोन बंद करण्यासाठी बटण नाही. विरोधी पक्षातील अनेक सदस्य या खुर्चीवर बसतात; त्यांना याची जाणीव आहे.

महिला सदस्यांना कमी संधी दिल्याचे आरोपही महिला सदस्यांवर करण्यात आले. पण ते म्हणाले, मला अभिमान आहे की माझ्या कार्यकाळात सर्व महिला सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान काही महिला सदस्यांनी ट्रेझरी बाकांकडे जाऊन घोषणाबाजी करण्याचा प्रयत्न केला. ही एक अनपेक्षित घटना होती, म्हणून मी सत्ताधारी पक्षाच्या नेत्याला सभागृहात प्रवेश न करण्याची विनंती केली. मी नेहमीच सर्वांनी बोलल्यानंतरच सभागृह सोडण्याचा प्रयत्न करतो, जरी मला रात्री उशिरापर्यंत बसावे लागले तरी. एका वर्षाच्या आत, मी सभागृहात बोलू इच्छिणाऱ्या सर्वांना तसे करण्याची संधी दिली आहे याचा मला आनंद आहे.

## धनुष्यबाण कोणाचा?

(पान १ वरून )

ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला आहे की, निवडणूक आयोगाचा निर्णय लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या निकालाचा दाखला देत, शिंदे गटालाही त्यांचे चिन्ह तात्पुरते असल्याचे जाहीर करावे लागते का? यावरही चर्चा सुरू आहे. राज्यातील आगामी राजकीय समीकरणे आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत कळीचा ठरणार आहे. आता न्यायालय लेखी युक्तिवादाचा अभ्यास करून नेमकी कोणती तारीख देते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## अमेरिकेच्या मागण्या न मानल्यास नव्या सर्वोच्च नेत्याला संपवणार-ट्रम्प

**वॉशिंग्टन,ता.१२-**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे नवे सर्वोच्च नेते मुजतबा खामेनेई यांच्याबाबत म्हटले आहे की,जर मुजतबा यांनी अमेरिकेच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर त्यांच्या हत्येला ते समर्थन देतील.**

अमेरिकेची प्रमुख मागणी अशी आहे की,इराणने आपला अण्वस्त्र कार्यक्रम पूर्णपणे बंद करावा.जर मुजतबा यांनी यास नकार दिला तर नव्या नेत्याला संपवण्यासाठी ट्रम्प तयार असल्याचे सांगितले जात आहे.अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, ही कारवाई इस्रायली लष्कराकडून केली जाऊ शकते. २८ फेब्रुवारी रोजी मुजतबा यांचे वडील अली खामेनेई यांच्या बाबतीत जे घडले, त्याप्रमाणेच ही घटना घडू शकते, असेही म्हटले जात आहे.

ट्रम्प यांनी सांगितले की, इराणने केलेल्या या निवडीबद्दल ते अजिबात समाधानी नाहीत.त्यांनी इशारा दिला की मुजतबा खामेनेई आता शांततेत राहू शकणार नाहीत. इराणच्या पुढील नेत्याची निवड करताना अमेरिकेचीही भूमिका असावी. त्यांनी याची तुलना व्हेनेझुएलामधील अमेरिकन हस्तक्षेपाशी केली.

अहवालानुसार, दिवंगत नेते अली खामेनेई यांनी आपल्या मृत्यूपत्रात स्पष्ट नमूद केले होते की, त्यांचा मुलगा त्यांचा उत्तराधिकारी बनू नये. तरीदेखील, इराणच्या शक्तिशाली इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) ने मुजतबा यांची या पदावर नियुक्ती केली.तज्ज्ञांच्या मते, अली खामेनेई यांनाच आपल्या मुलाच्या क्षमतेबाबत शंका होती.

५६ वर्षीय मुजतबा यांनी यापूर्वी कधीही कोणतेही अधिकृत सरकारी पद भूषवले नव्हते. ते नेहमी आपल्या वडिलांच्या निकटवर्तीय वर्तुळात राहून पडद्यामागून सत्ता नियंत्रित करत असल्याचे मानले जाते.अमेरिकन कागदपत्रांमध्ये त्यांना पडद्यामागील खऱ्या सत्ताकेंद्राचे रूप मानले गेले आहे.त्यांच्यावर यापूर्वी निवडणुकांमध्ये गैरप्रकार केल्याचे आरोपही झाले आहेत. दरम्यान, इस्रायली लष्कराने स्पष्ट केले आहे की, जो कोणताही इराणी नेता दहशतवादाला प्रोत्साहन देईल, तो त्यांच्या निशाण्यावर असेल.

## केरळचा युवक ठार

(पान १ वरून )

धान्य घेऊन पुरवठा विभागाचा ट्रक (एम.एच.०९ बीसी ७२८२) लक्ष्मी टेकडी मार्गे पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील कागल येथील शासकीय धान्य गोदामाकडे जाण्यासाठी हरीनाम स्टीलच्या अलीकडील डिव्हायडरमधून वळण घेत असताना औद्योगिक वसाहती कडून लक्ष्मी टेकडीकडे जाणाऱ्या दुचाकी (के.एल.६५ डब्ल्यू २६९) ची ट्रकला जोरदार धडक बसली. या धडकेत दुचाकी ट्रकच्या पुढील बाजूला अडकली. धडकेमुळे दुचाकीस्वार आगाश चंद्रू सी हा उडून रस्त्यावर आपटला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर घटनास्थळी गर्दी झाली होती. एमआयडीसीतून महामार्गाकडे जाणारी वाहतूक काही काळ ठप्प झाली. रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. माहिती मिळताच पोलीस हवालदार संग्राम पाटील, चिंतामणी बाबळे, प्रवीण मगदूम, सचिन परीट तसेच महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

## युध्द थांबवण्यासाठी इराणच्या तीन अटी

**तेहरान,ता.१२-**

**मध्य पूर्वेत इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युध्दाचा तेरावा दिवस आहे. ही लढाई प्रत्येक दिवसागणिक अधिक तीव्र होत चालली आहे.गुरूवारीही दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्र, बॉम्ब आणि तोफगोळ्यांचा मारा सुरू आहे.**

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील युध्द लवकरच संपण्याचे संकेत दिले आहेत. इराणमध्ये आता काहीही उरलेले नाही आणि अमेरिकेने आपली सर्व लष्करी उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. दुसरीकडे, इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी युध्द समाप्त करण्यासाठी तीन महत्त्वाच्या अटी मांडल्या आहेत.

इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील त्यांच्या अधिकृत हँडलवर पोस्ट करत म्हटले, रशिया आणि पाकिस्तानच्या नेत्यांशी संवाद साधताना मी प्रदेशात शांततेसाठी इराणची बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे.इस्रायल आणि अमेरिकेकडून सुरू करण्यात आलेले हे युध्द संपवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे,इराणच्या वैध अधिकारांना मान्यता देणे, नुकसानभरपाईचा भरणा करणे आणि भविष्यातील आक्रमणां विरोधात ठोस आंतरराष्ट्रीय हमी देणे.ट्रम्प यांनी म्हटले की इराणमधील लष्करी तळ आणि लक्ष्यांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले करण्यात आले असून त्यामुळे आता इराणमध्ये काहीही शिल्लक राहिलेले नाही.

त्यांच्या वायुसेनेपासून ते हवाई संरक्षण व्यवस्थेपर्यंत सर्व काही निष्प्रभ करण्यात आले आहे आणि अमेरिका जेव्हा इच्छितील तेव्हा हे युध्द संपवू शकते. मात्र, युध्द समाप्त करण्यासाठी अमेरिका नेमकी कोणती रणनीती अवलंबणार आहे, याबाबत त्यांनी स्पष्ट माहिती दिली नाही. तसेच त्यांनी असा आरोप केला की, इराणने गेल्या ४७ वर्षांत जगाला मोठे नुकसान पोहोचवले असून आता त्याची किंमत चुकवावी लागत आहे.

# आयुष्य इंडस्ट्रिजला आग; चौघे गंभीर

**हातकणंगले,ता.१२(प्रतिनिधी)**

**हातकणंताले लक्ष्मी औद्योगिक वसाहतीतील आयुष्य इंडस्ट्रीजच्या यंत्रमाग कारखान्यातील डीपीला शॉर्ट सर्किटने गुरुवारी दुपारी एक वाजणेच्या सुमारास भीषण आग लागली. आग विझवताना एकदम धागीचा भडका उडाल्याने यामध्ये भाजून चार कामगार गंभीर जखमी झाले आहेत. याबतची वर्दी आयुष्य इंडस्ट्रीजचे मालक आयुष दिनेश कुमार कालिया यांनी हातकणंगले पोलीसांत दिली असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.**

लक्ष्मी औद्योगिक वसाहतीत यंत्रमाग कारखान्याना वीज पुरवणाऱ्या यंत्रणेत बिघाड झाल्याने सर्व यंत्रणा शॉर्ट झाली. यामुळे मोठमोठे स्फोट होऊन भीषण आग लागली. ही आग विझवण्याचे काम करत असलेले कामगार राहूल पाटील (वय ३४), राम निवास बन्ना (वय ३५), अविनाश शिरगिरी गिरी (वय ३२), दिपक कांबळे (वय ४०) हे गेले असताना पुन्हा मोठे स्फोट झाले. यामध्ये या चारही कामगारांच्या हातपायांना व अन्य ठिकाणी भाजून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी इचलकरंजी येथील आयजीएम उप जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार करून पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलवण्यात आल्याचे समजते. कारखान्यात भीषण आग लागल्याने मोठ्या स्फोटांचे आवाज ऐकायला येत होते तर आगीमुळे आकाशात धुराचे प्रचंड लोळ पसरले होते. आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाच्या बंबांना पाचारण करण्यात आले होते. या घटनेने भितीचे वातावरण पसरले होते. या आगीने कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# भूमि अभिलेख विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर

## नवीन ९९४ पदांची भर पडणार

**मुंबई,ता.१२(प्रतिनिधी)**

**जमिनीच्या कायदेशीर नोंदी वेगवान होऊन जनतेला दिलासा देण्यासाठी राज्याच्या भूमिअभिलेख विभागाचा अभूतपूर्व कायापालट करण्याचा क्रांतिकारी निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला.**

राज्य सरकारच्या महसूल विभागाच्या अधिपत्याखालील भूमि अभिलेख विभागासाठी नवीन सुधारित आकृतीबंध जाहीर करण्यात आला आहे. भूमि अभिलेख विभागात यापूर्वी ९,६८९ पदे मंजूर होती. आता यामध्ये ९९४ नवीन पदांची वाढ करण्यात आली असून, विभागाचा एकूण आकृतीबंध आता १०,६८३ पदांचा झाला आहे. यामध्ये नियमित पदांसोबतच काही सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विभागातील कामाची वाढलेली व्याप्ती लक्षात घेऊन अतिरिक्त पदांच्या निर्मितीसाठी विशेष लक्ष दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आदेशानुसार, उच्चस्तरीय सचिव समितीच्या मंजुरीनंतर आता या सुधारित आकृतीबंधावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, तसा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

# पाईपलाईनद्वारे पुरवठा असणाऱ्या ग्राहकांना घरगुती सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता बंद

## जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिणी चव्हाण

कोल्हापूर, ता. १२ (प्रतिनिधी)–

**युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्यातील ज्या भागांमध्ये पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू चा पुरवठा सुरू आहे, त्या भागातील ग्राहकांना घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या माध्यमातून होणारा पुरवठा बंद करण्याबाबत सूचना देण्यात आल्याची सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिणी चव्हाण यांनी दिल्या आहेत.**

शहरात ज्या भागांमध्ये पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू चा पुरवठा उपलब्ध आहे, त्या भागातील ग्राहकांना पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू चा पुरवठा नियमित सुरू राहणार आहे तरी पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू पुरवठा चालू असताना देखील जे ग्राहक घरगुती सिलिंडर मिळण्याच्या अनुषंगाने अतिरिक्त बूकिंग करतील अशा ग्राहकांचे ऑनलाईन बूकींग तात्पुरते स्थगित करण्यात येणार आहे. त्यामुळे एलपीजी सिलिंडरचा पुरवठा हा प्रामुख्याने ज्या भागांमध्ये पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू सुविधा उपलब्ध नाही अशा ग्राहकांसाठी प्राधान्याने राखून ठेवण्यात येत असून, आपत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एलपीजीचा योग्य व नियोजित वापर होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू सुविधा असलेल्या ग्राहकांनी कोणताही गैरसमज न ठेवता पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू पुरवठ्याचा वापर करावा. पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा नियमितपणे व सुरळीत सुरू राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# सांगलीत तीन मोटारसायकल चोरटे गजाआड:तीन दुचाकी जप्त

सांगली, ता. १२(प्रतिनिधी )–

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या दोन पथकांनी तीन मोटरसायकल चोरट्यांना गजाआड केले आहे. हिरालाल हनुमंत भंडारी ( वय२१, रा. तुळजापूर नाका, सोलापूर), विशाल दिलीप कुंभार ( वय ३२, रा. कुंभारवाडा,कामेरी, ता. वाळवा, जि. सांगली ),अक्षय चंद्रकांत जावीर ( वय ३१, रा. भोसे, ता. मंगळवेढा,जि. सोलापूर) अशी त्या चोरट्यांची नावे असून त्यांच्याकडून अडीच लाख रुपये किमतीच्या तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.**

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सिकंदर वर्धन यांचे पथक वाळवा तालुक्यातील पेठ भागात गस्त घालत असताना दोन संशयित नंबर प्लेट नसलेल्या दुचाकी घेऊन थांबले असल्याची माहिती मिळाली.त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता ते दोघेही मोटरसायकल चोरटे निघाले. हिरालाल भंडारी आणि विशाल कुंभार या दोघांकडून पोलिसांनी त्यांनी चोरलेल्या दोन दुचाकी जप्त केल्या. दुसऱ्या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक महादेव पवार यांच्या पथकाने सांगलीतील मार्केट यार्ड नजिक नंबर नसलेली दुचाकी घेऊन थांबलेल्या अक्षय जावीर याला पकडले. त्याच्याकडची दुचाकीही त्याने चोरलेलीच होती.



इचलकरंजीतील विविध गॅस एजन्सी कार्यालयासमोर ग्राहकांनी केलेली गर्दी. (छाया.– मयूर चिंदे)

# इचलकरंजीत गॅस सिलिंडरसाठी धावपळ

## काळ्याबाजारने विक्रीचे प्रकार ; ग्राहकांना नाहक भुर्दंड

इचलकरंजी,ता.१२–

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक गॅसचा पुरवठा थांबवल्याने शहर परिसरात सिलेंडर गॅसची टंचाई निर्माण होऊ लागली आहे. त्याचा परिणाम शहरातील विविध खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांसह खानावळ ,हॉटेल, रेस्टॉरंट मधील किचन बंद करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे छोट्या –मोठ्या व्यावसायीकांतून होणारी लाखो रुपयाची उलाढाल ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान शहरातील विविध गॅस एजन्सीच्या कार्यालयात गॅस साठी गर्दी दिसून येत आहे.

अमेरिका इजराइल आणि इराण युद्धाच्या झळा स्वयंपाक घरापर्यंत पोहोचल्या आहेत. देशभरात एलपीजीची गॅसची टंचाई निर्माण झाल्याने व्यावसायिकासह सामान्य ग्राहकातही या गॅस कोंडीमुळे अस्वस्थता पसरली आहे.

गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी गॅस एजन्सी बाहेर गर्दी दिसून येत आहे. विशेषता व्यावसायिक गॅस सिलेंडर चा पुरवठा ठप्प झाल्याने त्याचा फटका हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स व्यवसायला बसला आहे.

गॅस तुटवडायच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी अनाधिकृतपणे गॅस रिफ्लिंग करणाऱ्या ठिकाणी चढ्या दराने अवैधरित्या गॅस भरून देत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. अनेक छोट्या मोठ्या खानावळ, विविध प्रकारचे खाद्यपदार्थांचे हातगाड्या चालताना वेळेत गॅस उपलब्ध मिळत नसल्याने आपला व्यवसाय बंद करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही.

> गॅसपुरवठा बाबत प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी तसेच उपाययोजना राबवल्या जात असताना काही मंडळीकडून विनाकारण गैरसमज, अफवा पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे .अशा मंडळींच्या विरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.






# विक्रमनगरमध्ये रास्ता रोको

इचलकरंजी,ता.१२ –

**इचलकरंजी येथील विक्रमनगरच्या मुख्य रस्त्यावर ३२ केव्हीची जमिनीखालून जाणारी विद्युत लाईन टाकण्याचे काम सुरू असून हे काम मक्तेदाराकडून मनमानी पद्धतीने केले जात असल्याचा आरोप करत परिसरातील नागरिकांनी गुरुवारी सायंकाळी रास्ता रोको आंदोलन केले.**

नियमांनुसार विद्युत लाईन किमान तीन फूट किंवा त्यापेक्षा अधिक खोलीवर टाकणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात एक फूटापेक्षा कमी खोलीवर विद्युत वायर टाकण्याचे काम सुरू असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. तसेच काँक्रीटचे ब्लॉक टाकणे गरजेचे आहे ते सुद्धा टाकले नाहीत. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन विक्रमनगर परिसरातील व्यापारी व नागरिकांनी गुरुवारी सायंकाळी मुख्य रस्त्यावर रास्ता रोको केला. दरम्यान, महावितरणचे कर्मचारीही घटनास्थळी येऊन परिसराची पाहणी केली. त्यानंतर नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात सुनील इंगळे, रमाकांत साळी, सागर गोंदकर, मोहन माधव, कमलाकर नाईक, फिरोज बागेवाडी, सुरेश गोंदकर, अकबर आलासे, सचिन सूर्यवंशी, अय्याज बारगिर आदी नागरिक सहभागी झाले होते.




# स्थायी समितीच्या सभेत वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा



इचलकरंजी,ता.१२–

**इचलकरंजी महानगरपालिकेचे सन २०२६–२७ चे वार्षिक अंदाजपत्रकातील काही बाबींवर स्थायी समितीच्या सभेत वाढ सुचविण्यात आली तर काही ठिकाणी कपात करण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार सूचित बाबींवर निर्णय होऊन हे वार्षिक अंदाजपत्रक व सन २०२५–२६ चे दुरुस्ती अंदाजपत्रक महासभेसमोर सादर करण्यात येणार आहे.**

प्रशासनाकडून सन २०२६–२७ सालचे वार्षिक आणि सन २०२५–२६ सालचे दुरुस्ती अंदाजपत्रक स्थायी समिती सभापती सतिश मुळीक यांच्याकडे सादर करण्यात आले होते. स्थायी सभापती सतिश मुळीक यांनी गुरुवारी पदभार स्विकारल्यानंतर स्थायी समितीची पहिलीच बैठक अंदाजपत्रक संदर्भात घेतली. सभापती सतीश मुळीक यांच्या अध्यक्षतेखाली आणि आयुक्त पल्लवी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.

या बैठकीत मुख्य लेखा व वित्त अधिकारी विकास खोळपे यांनी अंदाजपत्रकाची सविस्तरपणे सर्व माहिती विषद केली. सदर अंदाजपत्रकावर सविस्तरपणे चर्चा करण्यात आल्यानंतर स्थायी समिती सदस्याकडून अंदाजपत्रकातील काही बाबींवर वाढ सुचवताना काही ठिकाणी कपात करण्याची मागणी करण्यात आली. त्यावर झालेल्या चर्चेअंती सूचनेनुसार आवश्यक त्या दुरुस्तीनंतर स्थायीच्या मंजुरीनंतर वार्षिक आणि दुरुस्ती अंदाजपत्रक महासभेपुढे सादर करण्यात येणार आहे. या बैठकीस तानाजी पोवार, मनोज हिंगमिरे, सुशांत कलागते, रवी रजपुते, सौ. वैशाली मोहिते, प्रदीप धुत्रे, नितेश पोवार, सौ. ध्रुवती दळवाई, सौ. किरण खवरे, सौ. विजया महाजन, रवींद्र माने, सौ. संगीता आलासे, परवेझ गैबान व सौ. रुपाली कोकणे आदी सदस्य व अधिकारी उपस्थित होते.










**WALK-IN-INTERVIEW**

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इलास्टिक टेप उत्पादन करणाऱ्या कंपनीमध्ये काम करण्याची मोठी संधी

**आमच्या मॅन्युफॅक्चरिंग युनिटमध्ये खालील पदे त्वरित भरणे आहेत :**

- **Production Supervisor:** BE / Diploma in Textile – किमान १ ते ५ वर्षांचा अनुभव आवश्यक
- **Assistant Supervisor:** BE / Diploma in Textile पदवी किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक / उमेदवारही अर्ज करू शकतात
- **QA / QC / LAB :** पदवी / १० वी / १२ वी / BE / Diploma in Textile
- **Machine Operators :** १० वी / १२ वी किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक jacquard machines
- **Technical staff :** पदवी /BE / Diploma in Textile

मुलाखतीसाठी अर्ज व बायोडाटा घेऊन खालील पत्त्यावर उपस्थित राहावे किंवा ई-मेलद्वारे अर्ज करावा.
E-mail : gaurish.salgaonkar@spica-group.com, Contact : 9822115582

पहिली मुलाखत : १४/०३/२०२६ आणि १५/०३/२०२६ सकाळी १०:०० ते सायं. ०५:००

पत्ता : महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिट्यूट इचलकरंजी, कल्पना टॉकीज समोर, मराठा मंडळ बिल्डिंग, इचलकरंजी



■ संपादकीय ■

# ...मरणाने केली सुटका!

प्रख्यात ब्रिटिश नाटककार विल्यम शेक्सपियर याने आपल्या लोकप्रिय 'हॅम्लेट' या नाटकामध्ये 'टू बी ऑर नॉट टू बी' म्हणजेच 'जगावे की मरावे हाच खरा प्रश्न आहे' हा संवाद लोकप्रिय केला. बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाबाबत एक लँडमार्क निकाल देताना शेक्सपियरच्या या नाटकाचा आणि या संवादाचा संदर्भ दिला आहे. हरियाणातील ३३ वर्षीय हरीश राणा या युवकाला पॅसिव्ह पद्धतीने इच्छामरण देण्यात यावे अशी परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे भारतातील हा पहिला निकाल ठरला आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच आपल्या एका निकालामध्ये मरण हा मूलभूत हक्क असल्याचे मान्य केले होते. इच्छा मरणाबाबत गाईडलाईन्स तयार कराव्यात असे आदेशही सरकारला दिले होते. पण त्यानंतर इच्छा मरणाबाबत सुप्रीम कोर्टाने किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाने अशा प्रकारचा निकाल दिला नव्हता. पण या केसमध्ये मात्र सर्वोच्च न्यायालयाने हरीश राणा याचे सर्व वैद्यकीय उपचार थांबवून त्याला एक शांत मरण द्यावे, असे सुचवले आहे. वयाच्या विसाव्या वर्षी शिक्षण घेत असताना इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून ब्रेन डेड झालेल्या हरीश राणावर गेल्या १३ वर्षांपासून उपचार सुरू होते. त्याचे वयोवृद्ध आई-वडील त्याची संपूर्णपणे काळजी घेत होते. पण त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नव्हती. नाका तोंडाला नळ्या लावूनच त्याच्या आहाराची काळजी घेतली जात होती. हरीशवर अजून कितीही उपचार केले तरी त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होणार नाही, अशा प्रकारचा अहवाल मेडिकल बोर्डाकडून आल्याने आणि हरीशच्या आई-वडिलांनीच इच्छामरणाला परवानगी देण्याची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सर्व गोष्टींचा विचार करून हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालाच्या निमित्ताने केंद्र सरकारने पॅसिव्ह युथेनेशिया म्हणजेच पॅसिव्ह पद्धतीचे इच्छामरण देणे याबाबत आणखी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत असेही सांगितले आहे. रुग्णावर उपचार करणाऱ्या कोणत्याही डॉक्टरचे प्रथम ध्येय जरी रुग्णाचा जीव वाचवणे हेच असले तरी, डॉक्टर जे उपचार करत आहेत त्याचा फायदा होणार नसेल तर काय करावे हा प्रश्न नेहमीच निर्माण होतो. हरीशला तेरा वर्षे अशाच प्रकारे जगवले जात होते. रुग्णाने दुःखात जगावे की शांतपणे मरावे हा प्रश्न त्याच्या नातलगांनाच पडलेला असतो. या प्रकरणामध्येही हरीश राणाच्या आई-वडिलांनीच पुढाकार घेऊन इच्छामरणाची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला हा महत्त्वाचा निर्णय द्यावा लागला. रुग्णाचे सर्वोच्च हित हा एकमेव विषय समोर ठेवून सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत आहे असे निकाल पत्रात न्यायालयाने म्हटले आहे. म्हणजेच जर एखाद्या रुग्णाची प्रकृती सुधारण्याची शक्यता असेल तर त्याला कधीच इच्छामरणाला परवानगी दिली जाणार नाही. पण उपचाराला अजिबात प्रतिसाद मिळत नसेल तर लाइफ सपोर्ट सिस्टीम काढून घेऊन आणि वैद्यकीय उपचार थांबवून अशा रुग्णाला शांतपणे मरण्याची परवानगी दिली जाऊ शकते असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात सुचवले आहे. गेल्या अनेक वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने आतापर्यंत जे लँडमार्क निकाल दिले त्यापैकी हा एक अत्यंत महत्त्वाचा निकाल मानावा लागेल. आगामी कालावधीमध्ये याबाबत चर्चा होणे अपेक्षित आहे आणि या निमित्ताने केंद्र सरकारने आपल्या पातळीवर हालचाली करून इच्छामरणाबाबत काही आदर्श मार्गदर्शक तत्त्वे तयार करणेसुद्धा महत्त्वाचे आहे. अर्थात हा विषय नेहमीच सर्वोच्च न्यायालयासमोर जाणार आहे. २०१८ च्या महत्त्वपूर्ण खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मरण स्वीकारणे हा मूलभूत हक्क मानला होता. तेव्हाही देशात इच्छामरणाची चर्चा सुरू झाली होती. पण आता त्याआधारे पहिलाच निर्णय झाला असल्यामुळे आगामी कालावधीमध्ये हा विषय अधिक स्पष्ट करावा लागणार आहे. इच्छामरणाला सरसकट परवानगी दिली असती तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता अधिक होती. भारत असो किंवा इतर कोणताही देश असो, रुग्णाच्या मालमत्तेवर लक्ष ठेवून इच्छामरणासारखे शस्त्र चुकीच्या पद्धतीने वापरले जाऊ शकत होते. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने आतापर्यंत भारतात हा विषय अत्यंत काळजीपूर्वक पद्धतीने हाताळला आहे. देशातील पहिला इच्छामरणाला परवानगी देणारा निर्णय देतानासुद्धा सर्वोच्च न्यायालयाने भावपूर्ण शब्दात हा विषय स्पष्ट केला आहे. तब्बल तेरा वर्षे लोळागोळा होऊन पडलेल्या हरीश राणासारख्या तरुणाच्या प्रकृतीमध्ये कोणतीही सुधारणा होण्याची शक्यता नसल्यानेच मरण हाच त्याच्या समस्येवर उपचार उपाय असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. प्रसिद्ध गझलकार सुरेश भट यांची एक लोकप्रिय कविता आहे,'मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते.' यातील आशयाप्रमाणे जीवंत देहाचे पार्थिव बनलेल्या हजारो जणांना न्यायालयाच्या या निर्णयामुळे सुटकेचा मार्ग मोकळा करून दिला आहे.

# 'आम आदमी' गॅसवर

**आखाती देशात युद्धाची आग धुमसत असल्याने भारताला होणारा खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायू पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती गॅस, व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. हॉटेल व्यवसाय तर बंद पडण्याच्या मार्गावर आहे.**



व्यावसायिक गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याने मुंबईतील २० टक्के हॉटेल्सचे शटर्स खाली आले आहेत. दोन-तीन दिवसांत हे प्रमाण ५० टक्क्यांवर जाईल अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा लक्षात घेता केंद्र सरकारने देशभरात 'एस्मा' म्हणजेच आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायदा लागू केला आहे. देशात गॅसअभावी उद्योग ठप्प होत चालले आहेत, हॉटेल व्यवसाय संकटात आहे, खाद्य तेल महाग होत आहे तसेच इंटरनेट सेवाही ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. एस्मा कायद्याच्या कक्षेत सार्वजनिक संरक्षण, स्वच्छता, जल पुरवठा, रुग्णालये आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या संबंधित सेवा येतात.पेट्रोलियम,कोळसा, वीज, पोलाद आणि खनिज उत्पादन तसेच वितरणाशी निगडीत संस्था आणि कंपन्या या कायद्याच्या कक्षेत येतात. याशिवाय बँकिंग सेवाही एस्माच्या कार्यकक्षेत येते. सार्वजनिक वाहतूक, दळणवळण आणि खाद्यपुरवठा खरेदी आणि वितरण संबंधित संस्थांना 'एस्मा' कायद्याचे पालन करणे अनिवार्य असते. गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने केंद्र सरकारने 'एस्मा' कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे आता देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळाबाजार करण्यावर बंधन राहील. देशात कच्च्या तेलाप्रमाणे एलपीजीचा साठा कमी होत चालला आहे. २ ते ३ आठवडेच पुरवठा होऊ शकेल असा अंदाज आहे. गॅस तुटवड्याची झळ हॉटेल्स आणि सर्वसामान्यांना बसू लागली आहे. युद्धामुळे खाद्य तेलाचे दरही वाढत चालले आहेत. आठवडाभरात तेलाच्या दरात मोठी भाववाढ होऊ शकेल. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने हॉटेल आणि खानावळ व्यावसायिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. हे व्यवसाय नियमित गॅस पुरवठ्यावर अवलंबून असल्याने व्यवसाय कसा करावा असा प्रश्न व्यावसायिकांना पडला आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने जागतिक इंधन पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. जागेचे भाडे, कर्मचाऱ्यांचे पगार, वीज बिल आणि इतर खर्च कायम असताना गॅस पुरवठा कमी झाल्याने व्यवसाय चालवणे अवघड झाले आहे. काही जण इलेक्ट्रिक इंडक्शन, चुली किंवा अन्य पर्यायांचा विचार करत आहेत. मात्र, हे पर्याय महाग असल्याने उत्पादन आणि नफ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. खानावळीत प्रामुख्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी जेवतात. खानावळी बंद झाल्यास या विद्यार्थ्यांना अडचण येऊ शकते. काही खानावळी कमी पदार्थ देणे किंवा चुली-कोळशाचा वापर करून सेवा सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, यामुळे शहरातील वायुप्रदूषण वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हॉटेल व्यवसायासाठी गॅस अत्यावश्यक आहे. काही दिवस एजन्सीकडून पुरवठा झाला. मात्र, पुढे तो सुरू राहील याची खात्री नाही. इलेक्ट्रिक शेगडीचा पर्याय असला तरी वीज खर्च मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. कच्च्या तेलाचे भाव गगनभरारी मारत असून, ही कळ आणखी काही काळ सोसावी लागेल असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. आजवर त्यांनी दिलेली अनेक आश्वासने फोल ठरली आहेत. जगातील करोडो लोकांना ट्रम्प यांनी प्रथम व्यापारी युद्धात आणि नंतर प्रत्यक्ष युद्धात लोटले आहे. त्याची जबर किंमत सामान्य माणसांना सोसावी लागत आहे. घरगुती

दैनंदिनी

गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने घेतला आहे. जागतिक स्तरावर ऊर्जेची किंमत वाढल्यामुळे ही वाढ आवश्यक असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत अद्याप वाढ होणार नसल्याचे सांगण्यात येत असले तरी आज ना उद्या ते दर वाढवावेच लागतील. या साऱ्या गोष्टींमुळे हॉटेलमधील दर वाढणार असून भाज्या, फळे आणि अन्य सर्व प्रकारच्या वस्तूंची महागाई वाढणार आहे. युद्धपरिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय वाहतुकीवर परिणाम झाला असून भारताच्या खतपुरवठ्याला देखील फटका बसू शकतो. भारत अन्नधान्याबाबत तेलबिया आणि डाळींचा अपवाद वगळता स्वयंपूर्ण आहे. परंतु खतपुरवठ्याबाबत तसे म्हणता येणार नाही. गतवर्षी भारताने एक कोटी टन युरिया आणि ६० लाख टन डीएपी खतांची आयात केली होती. ओमान, कतार, सौदी अरेबिया, यूएई आणि बहरीन येथून भारत युरियाची ७५ टक्के गरज भागवतो. डीएपी प्रामुख्याने सौदी अरेबियातून आणले जाते. भारताला दरवर्षी ३० लाख टन एमओपी(पोटॅश) आयात करावे लागते. कृषी उत्पादनासाठी खतांची मोठी गरज असते आणि त्याबाबत आपली शेती भूराजकीय स्थितीवर अवलंबून असते हे या युद्धामुळे लक्षात येते. युद्धस्थिती आणखी गंभीर झाल्यास शेती उत्पादनावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

# राज्यात बोगस लग्ने लावणाऱ्या टोळ्यांचा धुमाकूळ



**विधिमंडळात नुकताच ग्रामीण भागातील तरुणांच्या लग्नाचा प्रश्न अत्यंत परखडपणे मांडला गेला. अनेक गावांमध्ये १५० हून अधिक तरुण लग्नाविना असून त्यांच्याकडे कोणीही मुलीचे सोयरीक घेऊन येत नाही, अशी विदारक परिस्थिती आहे. यामुळे ग्रामीण भागातील तरुणांमध्ये नैराश्य निर्माण होऊन व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढले आहे. मुलींची संख्या कमी असल्याने ग्रामीण भागातील तरुणांना फसवून बोगस लग्ने लावणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या असून, अशा टोळ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज आहे.**

मुलींची कमी होत असलेली संख्या आणि त्यातून उद्भवणारे सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी बालविवाह रोखणे आणि मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. विशेषतः ऊसतोड कामगार महिलांच्या समस्या आणि त्यांच्या मुलांच्या लग्नाबाबत निर्माण होणाऱ्या अडचणींवरही विचार व्हायला हवा. या प्रश्नामुळे ग्रामीण भागात सामाजिक असंतुलन निर्माण होत असल्याची भीती व्यक्त केली जात असून सरकारने यावर ठोस उपाययोजना करायला हव्या. शेतीतील अनिश्चिततेमुळे मुलींचे पालक नोकरी करणाऱ्या मुलालाच प्राधान्य देत असून, शेतकरी मुलांना मुलगी मिळणे कठीण झाले आहे. ग्रामीण भागात लग्नासाठी मुली मिळत नसल्याच्या हतबलतेचा फायदा घेऊन तरुणांची आणि त्यांच्या कुटुंबांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक केली जात आहे. या संदर्भात काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. काही दलाल टोळ्या ग्रामीण भागातील गरजू तरुणांना हेरतात. ते गरिबांच्या किंवा परप्रांतीय मुलींना 'बनावट नवरी' म्हणून उभे करतात आणि लग्नाचे आमिष दाखवून तरुणांकडून २ ते ५ लाख रुपये उकळतात. फसवणूक करणाऱ्या या टोळ्या अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने काम करतात. एकाच मुलीचा वापर करून वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये ३ ते ४ वेळा बनावट लग्ने लावून दिली जातात. लग्नानंतर काही दिवसांतच (कधी कधी अवघ्या काही तासांत) ही नवरी दागिन्यांसह फरार होते. लग्नाची कायदेशीरता दाखवण्यासाठी ही टोळी बनावट आधार कार्ड, शाळा सोडल्याचे दाखले आणि इतर ओळखपत्रांचा वापर करते. लग्नानंतर ही नवरी 'आजारी असल्याचे' किंवा 'माहेरी जायचे आहे' असे कारण सांगून घरातून दागिने आणि पैसे घेऊन गायब होते. अनेकदा या प्रक्रियेत दलाल आणि नवरीचे बनावट नातेवाईक सामील असतात. ग्रामीण तरुणांना आता विवाह संकेतस्थळांवरूनही लक्ष्य केले जात आहे. जोडीदाराच्या शोधात असलेल्या पुरुषांना लग्नाची स्वप्ने दाखवून लाखो रुपये लुबाडल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. बीड जिल्ह्यात अलिकडेच एका नवरीने लग्नानंतर अवघ्या काही तासांत पळून जाण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश झाला. धुळे व यवतमाळ या जिल्ह्यांतही अशाच प्रकारे ३ ते ४ लाखांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांनो अनोळखी दलालांवर आंधळा विश्वास ठेवू नका, लग्नापूर्वी मुलीच्या घरच्यांची आणि कागदपत्रांची स्वतः खात्री करून घ्या, मुलाच्या विवाहासाठी मोठी रक्कम मागणाऱ्या मध्यस्थांपासून सावध रहा आणि फसवणूक झाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधायला हवा.

## ग्रामीण भागाचे भयावह चित्र

ग्रामीण भागात अनेक तरुणांचे विवाह वेळेवर होत नाहीत किंवा ते अविवाहित राहतात. यामुळे नवीन कुटुंब तयार होत नाहीत आणि परिणामी गावात जन्माला येणाऱ्या मुलांचे प्रमाण घटत आहे. शाळेत प्रवेश घेण्यासाठी पुरेशी मुलेच उपलब्ध नसल्याने मराठी माध्यमाच्या शाळांची पटसंख्या घटत आहे. ग्रामीण भागात शेतीतील अनिश्चिततेमुळे मुलींचे पालक 'नोकरीवाला' मुलगा शोधताहेत. यामुळे अनेक ग्रामीण तरुण नोकरीच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करतात. लग्नानंतर हे तरुण शहरातच स्थायिक होतात आणि त्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांत जातात, ज्यामुळे गावच्या मराठी शाळा ओस पडत आहेत. ज्या शाळांची पटसंख्या २० पेक्षा कमी आहे, अशा शाळा बंद करण्याच्या किंवा समूह शाळा योजनेत समाविष्ट करण्याच्या हालचालींमुळे ग्रामीण शिक्षणासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. थोडक्यात,बेरोजगारी, लग्नास अडथळा, सामाजिक समस्या, घटता जन्मदर आणि स्थलांतर, शाळांची कमी पटसंख्या असे हे दुष्टचक्र सुरू झाले आहे.

काही वर्षांपूर्वी बीडसारख्या जिल्ह्यामध्ये लिंग गुणोत्तर ६२८ पर्यंत खाली आले होते. आरोग्य विभागाच्या अहवालानुसार, आता बीड जिल्ह्यात मुलींचे प्रमाण ९६५ वर पोहोचले असून, काही अहवालात हे प्रमाण ९३८-९६१ च्या दरम्यान दाखवले आहे. हे प्रमाण आणखीन सुधारण्यासाठी गर्भलिंग चाचणी करणाऱ्या केंद्रांवर आणि अशा प्रवृत्तींवर कठोर जरब बसवण्याची गरज आहे. शेती करणाऱ्या मुलांना समाजात प्रतिष्ठा मिळावी यासाठी सरकारने जनजागृती मोहीम राबवावी. मुलींना आणि त्यांच्या पालकांना शेती ही केवळ कष्टाची नसून सन्मानाची नोकरी आहे हे पटवून देण्यासाठी प्रोत्साहनपर कार्यक्रम राबवायला हवेत. शेतकरी तरुणाशी लग्न करणाऱ्या मुलींच्या कुटुंबाला आर्थिक मदत किंवा विशेष सवलती देण्याबाबत विचार व्हायला हवा. सरकारने शेतीमालाला हमीभाव आणि शाश्वत सिंचन सोयी उपलब्ध करून दिल्यास शेतकरी तरुणांची आर्थिक स्थिती सुधारेल, ज्यामुळे विवाहासाठी ते पात्र ठरतील.

■ सुरेश मंत्री

## महाराष्ट्राचे कर्ज ११ लाख कोटींवर

राज्याचा २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प नुकताच विधानसभेत सादर करण्यात आला. त्यात एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रावर केवळ ५.७६ लाख कोटीचे कर्ज होते. ते वाढत वाढत आता २०२६ मध्ये तब्बल ११ लाख कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. या कर्जामुळे आपण विकासावर जास्त खर्च करू शकत नाही.लोकोपयोगी योजना जाहीर करून लोकप्रियता मिळविणे व निवडणुका जिंकणे हेच काम देशातील सर्वच पक्ष करत आहेत. कालच पंजाबमध्ये लाडकी बहीण सारखी एक योजना जाहीर करण्यात आली त्यानुसार त्या राज्यातील महिलांना दरमहा रक्कम मिळणार आहे. पंजाबमध्ये निवडणूक लवकरच होणार आहेत त्याचे हे सूचक आहे काही दिवसापूर्वी सुप्रीम कोर्टाने या लोकप्रियतेच्या योजनेवर टीका केली होती.देशातील अनेक राज्ये निवडणुकांअगोदर लोकप्रियतेच्या योजना जाहीर करून मते मिळवीत आहेत. त्यामुळे राज्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे. अशा लोकप्रिय योजनेमुळे लोकांची क्रयशक्ती कमी होत चालली आहे. विधानसभेत जयंत पाटील यांनी राज्याच्या कर्जावर टीका केली आहे. हे कर्ज कसे कमी होणार? त्यासाठी सरकारची काय योजना आहे ? हे प्रश्न सामान्य माणसाला पडत आहेत.

■ शांताराम वाघ

## वाचकांचा पत्रव्यवहार

### तेल वाहतुकीला ब्रेक; जगावर अभूतपूर्व संकट

जगाची दैनंदिन तेल, इंधन वाहतुकीची गरज १० कोटी बॅरल्स एवढी आहे. त्यातील सुमारे २० टक्के खनिज तेलाचा पुरवठा होमुर्झ सामुद्रधुनीतून होतो. होमुर्झ सामुद्रधुनीतून होणारा निम्म्याहून अधिक तेलसाठा भारत,चीन, जपान आणि दक्षिण कोरिया या देशांना होतो. यामध्ये अडथळा आल्यास या चार महत्त्वाच्या देशांचा तेल पुरवठा ठप्प होतो आणि त्या देशांच्या अर्थव्यवस्थांवर अनेक बाजूंनी ताण पडून त्या अर्थव्यवस्था सुरळीत करण्याची जबाबदारी त्या देशाच्या अर्थव्यवस्थापकांवर येऊन पडते. इतिहासात मागे वळून पाहिल्यास सन १९७८-७९ मध्ये इराण क्रांतीच्यावेळी ५० ते ६० लाख बॅरल्सचा प्रतिदिन फटका बसत होता.तर इराण-इराक युद्धात दररोज ४० लाख बॅरल्स तेल पुरवठ्याचा फटका बसून तेल वाहतूक ठप्प झाली होती,त्यावरून सध्या होमुर्झ सामुद्रधुनीतून होणारा २ कोटी बॅरल्स प्रतिदिन तेलपुरवठ्याचा किती गंभीर परिणाम होत असेल याची कल्पना न केलेली बरी. भारताच्या दररोजच्या ५२ ते ५४ लाख बॅरल्स तेलपुरवठ्याचा मार्ग होमुर्झ सामुद्रधुनीतून होतो. युद्धापूर्वी सुमारे २१/२२ लाख बॅरल्स तेल पुरवठा बहुतांशी होमुर्झ सामुद्रधुनीतून होत असे त्यामुळे भारताची परिस्थिती किती चिंताजनक झाली असेल यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मध्य पूर्वेतील युद्ध परिस्थितीत काही फरक पडेल असे वाटत नसल्याने तेल पुरवठा करणाऱ्या कंपन्यांमधील करारांनुसार इंधन दरांत वाढ होण्याची शक्यता असून एक-दोन दिवसांत तेलाच्या किंमती प्रति बॅरल ११० डॉलर्सच्यावर गेल्या आहेत याच कारणांनी इंधन दर आणि त्याचा पुरवठा यांच्यात मोठे फरक घडून येतील,असे अंदाज वर्तवले जात आहेत, त्याचा परिणाम भारतीयांना इंधन खरेदी आणि महागाई यांचा मिलाफ करणे कठीण होऊन बसणार आहे.

■ स्नेहा राज

## अंतिम सामन्यावर कोट्यावधींचा सट्टा

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना अहमदाबाद गुजरात येथे झाला. भारत विश्वविजेता ठरला ही अभिमानाची गोष्ट आहे. या सामन्यात विजेता, उपविजेता संघाला, खेळाडूंना आणि क्रिकेट बोर्डाला हजारो रुपये मिळाले पण त्याचवेळी अनेक जणांना आर्थिक फटका बसला. या सामन्यासाठी अंदाजे दहा हजार कोटी रुपयांचा सट्टा लावला गेल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. सट्टा लावण्यास भारतात बंदी आहे पण भारताबाहेर सट्टा लावणारे बुकी सट्टा लावून पैशाचा व्यवहार करतात. भारतीय क्रिकेटच्या विश्वात यापूर्वीही सट्टेबाजीची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत याचे कारण म्हणजे सर्व वयोगटांमध्ये असलेले क्रिकेटचे वेड. महिला संघ निर्माण झाल्यामुळे तरुणी-महिला यांच्यातही हे वेड वाढल्याचे दिसून येते. भारतीय संघाचा कोणताही सामना हा मैदानावर जाऊन, टीव्ही, मोबाईलवर पाहिला जातो. या वेड्याचा अपलाभ सट्टा लावणारे बुकी घेतात आणि मोठ्या रकमांची आमिषे दाखवून सर्वांना या गैरप्रकारात ओढतात.

प्रत्यक्ष प्रक्षेपण आणि टीव्ही, मोबाईलवर ते दिसणे यात असलेल्या काही सेकंदांचा फरक हेरला जातो आणि त्यानुसार सट्टा लावला जातो. या गैरप्रकाराची रचनाच अशी केलेली असते की, अधिकाधिक लोक हरतात, लाखो रुपये काही सेकंदांमध्येच गमवतात. हा सट्टेबाजीचा भुलभूल्लैया व्यसनाप्रमाणे लोकांना पछाडतो आणि पोखरतो. परिणामी कर्जबाजारीपणा, निराशा आणि आत्महत्या पर्यंत याचा परिणाम दिसतो. सट्टेबाज आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत क्लोज सर्किट ॲप्स,पासवर्ड प्रोटेक्टेड संकेतस्थळे आणि पीच स्लाइडिंग यासारख्या क्लुप्त्या वापरून सर्वसामान्यांची लूट करतात. व्यवहारांसाठी हवाला आणि क्रिप्टो करन्सीचा चलनाचा वापर होत असल्याने अन्वेषण यंत्रणानाही चकवा देणे सहज सोपे झाले आहे.आणखीन महत्त्वाचे म्हणजे येणारे आणि जाणारे पैसे विविध खात्यात खोटी खाती उघडून त्याद्वारे व्यवहार केला जात असल्याने तेही पकडले जात नाही. क्रिकेट हा आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे सहज अनुमान वर्तवू शकतो आणि एक मोठी रक्कम पदरात पाडून घेऊ शकतो असा आशावाद असल्याने लोक पैसे लावतात आणि फसतात.

■ लीना गाडगीळ

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)

| | | |
|---|---|---|
| शुक्र शनि नेपच्यून १२ | रवि मंगळ बुध राहू ११ | प्लूटो १० |
| १ | हर्षल २ | ८ |
| | ५ केतू | ९ चंद्र |
| गुरु ३ | ४ | ६ |
| | | ७ |

**शुक्रवार,ता.१३.३.२०२६,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसु नाम संवत्सरे, उत्तरायणे,शिशिर ऋतो, फाल्गुन मासे, कृष्ण पक्षे, दशमी तिथी,अहोरात्र,पूर्वाषाढा नक्षत्र २७.०३ नंतर उत्तराषाढा नक्षत्र, धनु रास, व्यतिपात योग १०.३२ नंतर,वरियान योग,वणिज करण १९.२४ नंतर,विष्टी करण,दिनमान ११.५३,सुर्योदय ६.४६,सुर्यास्त १८.३९ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी १०.३० ते १२,दशमीची वृद्धी,रुई ऊरुस, भद्रा १९.२४ नंतर, घबाड २७.०३ पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**-अचानक तुम्हाला पैशाची आवश्यकता असू शकते आणि तुमच्या जवळ पर्याप्त धन नसेल. सहकाऱ्यांशी व्यवहार करताना चतुराईने वागा. अचानक पाहुण्यांचे आगमन होईल त्यामुळे घरातील वातावरण आनंदीत होईल.

**वृषभ**-आज तुमचे सहकर्मी तुमच्या कामाचे कौतुक करतील आणि तुमचा बॉस ही तुमच्या कामाने आनंदी होईल. आज व्यवसायात नफा होईल. कामाच्या ठिकाणी सहकार्यामुळे तुम्हास आर्थिक फायदा होईल.

**मिथून**-प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. काही महत्त्वाच्या योजना मार्गी लागल्यामुळे आपणास नव्याने अर्थसहाय्य उपलब्ध होईल. तुम्हाला भावाचे आर्थिक सहकार्य लाभेल.

**कर्क**- तुमचे व्यक्तीमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. आपल्या पैशाची बचत करा.नवीन गोष्टी शिकण्याकडे तुमचा कल असेल. कठीणप्रसंगी तुम्हाला कुटुंबाचे सहकार्य लाभेल.

**सिंह**- पाहुण्यांच्या आगमनाने तुम्हाला आर्थिक लाभ होऊ शकतो. कुटुंबातील सदस्य तसेच मित्रमंडळी यांच्यासाठी खर्च करून मजा लुटाल.

**कन्या**-तुमच्या नवीन योजना, प्रकल्प याविषयी तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन ते यशस्वी कराल.कार्यालयीन काम फत्ते होईल कारण सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**तुळ**- घरात काही कार्यक्रम असण्याने आज तुम्हाला खूप धन खर्च करावे लागू शकते ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

**वृश्चिक**- भागीदारी तत्त्वावर नवीन व्यवसाय सुरू करायला चांगला दिवस. सर्वांनाच चांगला फायदा होऊ शकतो. वेळेचा सदुपयोग करा. लांबचा प्रवास टाळा.

**धनु**-चांगल्या कामामुळे लोकांमध्ये नावलौकिक वाढेल. रागावर नियंत्रण ठेवा.अडखळलेली कामे तुमच्या परिश्रमाने पूर्ण होतील. येणे वसूल होईल.

**मकर**-देणगी आणि धर्मादाय कामामध्ये स्वत:ला गुंतवा,मुलाकडून आर्थिक लाभ होईल.व्यावसायिक स्तरावर जबाबदारीत वाढ होण्याची शक्यता.

**कुंभ**-मनासारख्या गोष्टी न घडल्याने त्रासून जाल. रागावर नियंत्रण ठेवा. ज्या लोकांनी गुंतवणूक केली होती. त्याचा त्यांना फायदा होईल. आनंदवार्ता समजेल.

**मीन**- मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च होईल. महत्वाच्या कामात यशस्वी व्हाल. नोकरीच्या ठिकाणी वरिष्ठांकडून तुमचे कौतुक होईल. त्यामुळे उत्साही रहाल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# गॅस टंचाईच्या अफवांमुळे नागरिकांची तारांबळ

## ई-केवायसी धारकांनाच गॅस मिळणार असल्याचे वितरकांकडून स्पष्टीकरण

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

**इराण व इस्त्रायल युद्धामुळे देशात दरवाढीबरोबरच एलपीजी गॅस सिलिंडरची मोठी टंचाई निर्माण होणार असून निपाणी शहरात गॅस मिळणार नाही, अशी चर्चा सुरू झाल्यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



अनेक ठिकाणी गॅस एजन्सीजबाहेर सिलिंडर बुक करण्यासाठी आणि मिळवण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मात्र आता यापुढील काळात ई-केवायसी असणारे कनेक्शन तसेच बुकींगनंतर ओटीपी आल्याशिवाय गॅस मिळणार नाही, असे स्पष्टीकरण गॅस वितरकांकडून दिले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून व्हॉट्सअॅप आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर गॅस टंचाई होणार असल्याचे सांगितले जात आहे.येत्या काही दिवसांत गॅसचा पुरवठा पूर्णपणे ठप्प होणार आहे, त्यामुळे लवकरात लवकर गॅस भरून घ्या, असा दावा या मेसेजेसमध्ये केला जात आहे. याची धास्ती घेत अनेक नागरिकांनी एकाच वेळी गॅस बुकिंग करण्यासाठी गर्दी केल्यामुळे यंत्रणेवर अचानक ताण आला आहे.

### गॅस एजन्सीबाहेर नागरिकांची गर्दी

या वाढत्या गोंधळाची दखल घेत जिल्हा पुरवठा विभागानेही सर्व गॅस एजन्सींना नियमितपणे पुरवठा होत असल्याची पुष्टी केली आहे. गोदामांमध्ये पुढील दिवसांसाठी पुरेल एवढा साठा उपलब्ध असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

**ई-केवायसी बंधनकारक**

यापूर्वी कोणत्याही मोबाईलवर गॅस बुकींग करता येत होते. तसेच बुकींग न करता केव्हाही ग्राहकांना गॅस मिळत होता. या माध्यमातून काळा बाजार मोठ्या प्रमाणात होत होता. हा प्रकार रोखण्यासाठी शासनाने बुकींग करून ओटीपी आल्यानंतरच ग्राहकांना गॅसचे वितरण केले जावे, असा नियम जारी केला आहे.त्यामुळे सध्या ओटीपी आलेल्या ग्राहकांनाच गॅस पुरवठा केला जात आहे.त्याशिवाय एकाच नोंदणीकृत मोबाईल वरून बुंकींग करता येणार आहे.त्यामुळे ईकेवायसी नसलेल्या ग्राहकांनी लवकरात लवकर ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन गॅस वितरकांकडून केले आहे.यापूर्वीचा क्रमांक बदलायचा झाल्यास तो एजन्सीशी संपर्क साधून बदलता येणार आहे.नवीन बुकींग २५ दिवसानंतरच करावे लागणार आहे.

**गॅसचा जपून वापर आवश्यक**

सध्याची स्थिती लक्षात घेता देशातील मोठ्या शहरात मोठ्या प्रमाणात गॅस टंचाई निर्माण झाली आहे.त्यामुळे ग्रामीण भागात गॅस पोहोचण्यासाठी काही दिवस उशीर लागू शकतो.त्यामुळे ग्राहकांनीही गॅसचा जपून वापर करणे आवश्यक आहे.

### उज्ज्वला योजनेतील ४ सिलेंडरची कपात

केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजनेच्या माध्यमातून गोरगरीबांना मोफत गॅस कनेक्शनचे वितरण केले आहे.वर्षाकाठी या लाभार्थींना १२ सिलेंडर मिळत होते.मात्र गेल्या आठवड्यापासून यामध्ये ४ सिलेंडरची कपात करण्यात आली आहे. त्यामुळे आता या ग्राहकांना केवळ ८ सिलेंडरच मिळणार आहेत.



बेनाडी येथे पॅचवर्कचे काम रखडले असताना सुरु असलेले साईड पट्ट्याचे काम.

# बेनाडी-आडी येथील रस्त्याचे पॅचवर्क रखडले

## बाजू पट्ट्याच्या कामामुळे प्रवासी वर्गातून आश्चर्य

कोगनोळी,ता.१२(प्रतिनिधी)-

**वर्षभरापासून बेनाडी ते आडी रस्त्यावर खड्ड्यांची मालिका निर्माण झाली होती. याबाबत सचित्र वृत्त प्रसिद्ध करुन सार्वजनिक बांधकाम खात्याला जागे करण्यात आले होते.**

या वृत्ताची दखल घेऊन दोन महिन्यांपूर्वी रस्त्यावरील खड्डे मुजविण्यासाठी पॅचवर्कचे काम सुरु केले होते. पण केवळ एक ते दीड किलोमीटर अंतराचे पॅचवर्क होताच काम बंद करण्यात आले. त्यानंतर पंधरा दिवसानंतर आता काम रखडले असताना बाजू पट्ट्याचे काम सुरु झाल्याने प्रवासी वर्गातून आश्चर्य व्यक्त होत आहे.

रस्त्याच्या पॅचवर्कचे काम सुरु झाल्याने वाहनधारकांतून समाधान व्यक्त करण्यात येत होते. पण हे समाधान काही काळच टिकले. पॅचवर्कचे काम बंद झाल्याने वाहनांच्या वर्दळीमुळे पुन्हा खड्ड्यांच्या आकारात वाढ होत आहे. या उन्हाळ्यात हे काम न झाल्यास पावसाळ्यात पुन्हा रस्त्यावर खड्ड्यांची मालिका निर्माण होण्याची भीती आहे. तरी बाजू पट्ट्याच्या कामाऐवजी पहिल्यांदा पॅचवर्क करुन रस्त्यावरील खड्डे मुजवावेत. अन्यथा रास्ता रोको करण्याचा इशारा नागरिकांसह वाहनधारकांनी दिला आहे.

तरी सार्वजनिक बांधकाम खात्याने याबाबत ठोस निर्णय घेऊन तात्काळ रस्त्यावरील खड्डे मुजविण्याची मागणी होत आहे.

## महिलांनी शिक्षण आणि स्वावलंबनाकडे लक्ष द्यावे-नीता गुडे

एकसंबा,ता.१२(वार्ताहर)-

**आजच्या काळात महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि प्रशासन अशा प्रत्येक क्षेत्रात महिला आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. मुलींनी मोठी स्वप्ने पाहावीत, ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत.**



आत्मविश्वास आणि जिद्द असेल तर यश नक्की मिळते. म्हणून महिलांनी शिक्षण आणि स्वावलंबनाकडे लक्ष द्यावे असे प्रतिपादन मलिकवाड गावच्या सुकन्या, आणि कर्नाटक पोलिस दलातील पीएसआय नीता गुडे यांनी व्यक्त केल्या.त्या मलिकवाड येथे आयोजित जागतिक महिला दिन आणि हळदी कुंकू समारंभ कार्यक्रमात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत अध्यक्षा अनिता इंगळे या होत्या.तर प्रमुख पाहुण्या म्हणून सुलोचना कोळी, अंगणवाडी पर्यवेक्षिका ज्योती शिंगे, रूपा कोळी,पल्लवी पाटील उपस्थित होत्या.यावेळी रांगोळी स्पर्धा पार पाडण्यात आल्या.यावेळी कार्यक्रमास मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून चालना देण्यात आली. त्यानंतर गावातील वयोवृद्ध महिला व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. यावेळी महिला दिनानिमित पार पडलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन भारती बाकळे यांनी तर गीता वडगांवे यांनी आभार मानले.

# हदनाळ गावच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध

## खास.प्रियांका जारकीहोळी ; रस्ता कामाचा शुभारंभ

कोगनोळी,ता.१२(प्रतिनिधी)-

**कर्नाटक राज्यातील सत्ताधारी काँग्रेस सरकारने निपाणी तालुक्याच्या विकासासाठी भरीव निधी मंजूर केला आहे. प्रत्येक गावात काँग्रेस सरकारचे काम दिसून येत आहे.येथील नागरिकांच्या मागणीनुसार श्री भावेश्वरी मंदिर ते स्मशानभूमी रस्त्यासाठी २० लाखांचा निधी मंजूर केला आहे. यापुढील काळातही हदनाळ गावच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन खास.प्रियांका जारकीहोळी यांनी केले.**

हदनाळ (ता. निपाणी) येथे श्री भावेश्वरी मंदिर ते स्मशानभूमी रस्ता कामाच्या शुभारंभप्रसंगी त्या बोलत होत्या.प्रारंभी माजी ग्रामपंचायत सदस्य संभाजी पाटील यांनी स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व कुदळ मारुन या कामाचा शुभारंभ करण्यात आला.



हदनाळ येथे रस्ता कामाच्या शुभारंभप्रसंगी खास.प्रियांका जारकीहोळी शेजारी लक्ष्मण चिंगळे, सुजय पाटील, रोहन साळवे, पंकज पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

यावेळी चिकोडी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मण चिंगळे, निपाणी ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष राजेश कदम, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष रोहन साळवे, माजी जिल्हापंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील, युवा नेते सुजय पाटील, बेडकिहाळ ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष बसवराज पाटील, माजी ग्रामपंचायत अध्यक्षा रुक्मिणी पाटील, राजाराम पाटील, दिलीप यादव, मधुकर पाटील, राजाराम कांबळे, दिलीप पाटील, संजय कांबळे, अर्जुन पाटील, अरुण कांबळे, प्रकाश पाटील, किरण कांबळे, विलास पाटील, सिद्धार्थ शेटके, सुखदेव पाटील यांच्यासह अन्य मान्यवर, महिला, काँग्रेस प्रेमी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. वैभव पाटील यांनी आभार मानले.




## प्रत्येक स्त्रीमध्ये अफाट सुप्त अंतरीक शक्ती असते-पद्मा कुलकर्णी

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

**'प्रत्येक स्त्रीमध्ये अफाट सुप्त अंतरीक शक्ती असते.तिने स्वत:वरील विश्वास, आरोग्य आणि स्वप्नांना प्राधान्य देऊन या शक्तीची जाणीव ठेवावी व जोपासना करावी, असे प्रतिपादन पद्मा कुलकर्णी यांनी केले.**

केएलई संस्थेचे जी.आय बागेवाडी महाविद्यालयात, आयोजित जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी बेळगाव येथील नाट्य कलाकार आणि शिक्षण तज्ञ पद्मा कुलकर्णी प्रमुख पाहुण्या या नात्याने त्या बोलत होत्या.प्रा. डॉ. एम.एम.हूरळी यांनी कार्यक्रमाचा आढावा घेतला.सृष्टी डोनवाडे हिने स्वागत केले. राजश्री दिवटे हिने प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.आर मोनिका आणि नमिता नाईक यांनी सूत्रसंचालन केले तर श्रेया दंडीनावर यांनी आभार मानले. यावेळी प्रा.हेमा चिकमठ, बसवराजेश्वरी उळेगड्डी, डॉ.अतुलकुमार कांबळे, के.एन शंकरमूर्ती,बसवराज जनगौडा, एस.बी.पाटील, मंजुळा नंदी आदी उपस्थित होते.



निपाणी: विजेत्या स्पर्धकांना बक्षिस देताना मान्यवर.

## चित्रकला स्पर्धेमध्ये मॉडर्न इंग्लिश स्कूलचे सुयश

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)-

**सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त युनिव्हर्सल टेक्नॉलॉजी कॉम्प्युटर एज्युकेशन सेंटर निपाणी यांच्यातर्फे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**

या स्पर्धेत मॉडर्न इंग्लिश स्कूलमधील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी स्नेहल पाटील आणि इयत्ता आठवीचा विद्यार्थी वेदांत कुंभार यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांना युनिव्हर्सल टेक्नॉलॉजी कॉम्प्युटर एज्युकेशन सेंटर निपाणी यांच्यावतीने सर्टिफिकेट व मेडल देण्यात आले. स्पर्धेत सहभागी होण्याकरीता मराठा मंडळाच्या अध्यक्षा राजश्रीजी नागराजू , मुख्याध्यापिका स्नेहा घाटगे, चित्रकलेचे शिक्षक अजित सुलतान्नवर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# फार्मर आयडी काढा, मगच पीएम किसान योजनेचा लाभ


मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)-

**प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत मिळणारा लाभ शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढल्याशिवाय मिळणार नाही . फार्मर आयडीसाठी आता शेतकऱ्यांना वेठीस धरण्यात आले आहे .**

यापूर्वीही ई-केवायसी करताना सामान्य शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागला होता. पी.एम. किसान योजनेचा लाभ जे शेतकरी घेत आहेत त्या शेतकऱ्यांनी महाविस्तार अॅपला फार्मर आयडी लिंक करून घ्यावा अन्यथा येणारा पुढील पीएम किसान योजनेचा हप्ता आपल्याला मिळणार नाही,असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. फार्मर आयडी काढणे हे अशिक्षित शेतकऱ्यांना त्रासाचे आहे.

### कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

अनेक शेतकऱ्यांकडे अॅन्ड्रॉईड मोबाईल नाहीत.ज्यांचे आहेत त्यांना हे महाविस्तार अॅप कसे ओपन करायचे हे माहित नाही. प्रयत्न झालाच तर सर्व्हर डाऊन किंवा त्याचा पासवर्ड मिळत नाही.त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांसमोर हे आव्हानच आहे. अनेक शेतकऱ्यांना याची माहिती नाही.अनभिज्ञ शेतकऱ्यांना हा वेठीस धरण्याचाच प्रकार आहे या संदर्भात शेतकऱ्यांतून संताप व्यक्त होत आहे.अशा जाचक अटीतून शेतकऱ्यांना मुक्त करण्याची मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.




# स्त्री ही समाज घडवणारी महाशक्ती

## अर्चना कुलकर्णी

चिकोडी,ता.१२(प्रतिनिधी)-

**''स्त्रीमध्ये समाज निर्माण करण्याची अफाट शक्ती आहे.जेव्हा एक स्त्री शिकते, तेव्हा संपूर्ण कुटुंब प्रकाशमान होते. महिलांची स्वप्ने आणि जिद्दच समाजाचे भविष्य घडवणार आहेत,'' असे प्रतिपादन हुक्केरी येथील शासकीय रुग्णालयाच्या आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ.अर्चना कुलकर्णी यांनी केले.**

येथील के.एल.ई. संस्थेच्या चिदानंद बी.कोरे पॉलिटेक्निकमध्ये आयोजित जागतिक महिला दिन सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.महाविद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य व्ही.ए.खोत म्हणाले की, धैर्य, संयम आणि सातत्य ही महिलांची खरी ताकद आहे. महिला विभाग प्रमुख प्रा. श्वेता उत्तूरे यांनी महिला सक्षमीकरणाची गरज आणि समाजाच्या सर्वांगीण विकासात महिलांच्या भूमिकेवर सविस्तर प्रकाश टाकला.



चिकोडी : येथील केएलई पॉलिटेक्निकमध्ये कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ.अर्चना कुलकर्णी, प्रा.व्ही.ए.खोत व अन्य मान्यवर.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. स्मिता वैगुडे यांनी स्वागत केले तर प्रा.प्रीती पाटील यांनी आभार मानले.अनुश्री आणि सुप्रीता या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संकेश्वर: किरण कमते याच्या सत्कारप्रसंगी डॉ.शिवलिंगेश्वर स्वामी व इतर प्रमुख मान्यवर.

## किरणचे युपीएससीतील यश प्रेरणादायी-शिवलिंगेश्वर स्वामी

संकेश्वर,ता.१२(वार्ताहर)-

**येथील किरण कमते यांनी युपीएससी परिक्षेत मिळविलेले यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरल्याचे निडसोसी मठाचे पंचम श्री डॉ.शिवलिंगेश्वर महास्वामीजींनी सांगितले.**

निडसोसी मंडळातर्फे युपीएससी साधक किरण कमते दांपत्याचा सन्मान करुन स्वामीजींनी गौरवोद्गार काढले.यावेळी बोलताना किरण कमते म्हणाले, वडिलांनी पाहिलेले युपीएससीचे स्वप्न आपण साकारले आहे.श्रींचा आशीर्वाद आपणास सरकारी उत्तम सेवा बजावण्यास प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी आई रुक्मिणी कमते, वडील डॉ.एस.सी.कमते, पत्नी लोचना कमते उपस्थित होते.

## मोफत सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

बेडकिहाळ,ता.१२(वार्ताहर)-

**बेडकिहाळ येथील कै. बसवंत नागू शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने एप्रिल महिन्यात मोफत सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.विवाह इच्छुकांनी आपली नावे १० एप्रिलपर्यंत ट्रस्टकडे नोंदवावीत, असे आवाहन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विक्रम शिंगाडे यांनी केले आहे.**

ट्रस्टच्या वतीने बेडकिहाळ (ता.निपाणी) येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत वधू-वरांचा विवाह सोहळा पार पडणार आहे. या विवाह सोहळ्याचा संपूर्ण खर्च ट्रस्टकडून करण्यात येणार आहे.विवाहासाठी नाव नोंदणी करताना वधू-वरांचे आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, दोघांचे ८ फोटो, जातीचा दाखला आदी आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. इच्छुक जोडप्यांनी १० एप्रिलपर्यंत कै.बसवंत नागु शिंगाडे ट्रस्ट कार्यालयात नाव नोंदविण्याचे आवाहन ट्रस्टकडून करण्यात आले आहे.

# शिवसेना पदाधिकारी व प्रशासन अधिकाऱ्यांमध्ये बैठक

## बैठकीत कागल टोल नाका संदर्भात विविध ठोस निर्णय; १६ मार्चच्या आंदोलनावर शिवसेना ठाम

कागल,ता.१२(प्रतिनिधि)-

**येथील महामार्गावरील सीमा तपास नाक्याजवळ वारंवार अपघात होतात. त्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. याबाबत शिवसेनेने (उबाठा) या प्रश्नासंदर्भात आंदोलने केली होती.त्यावर मंगळवारी सीमा तपासणी नाका प्रतिनिधी, पोलीस प्रशासन, शिवसेनेचे (उबाठा) पदाधिकारी, रस्ते विकास महामंडळाचे प्रतिनिधी व प्रादेशिक परिवहनचे अधिकारी यांच्यात बैठक संपन्न झाली.**

त्यानुसार दोन्ही बाजूचे महामार्ग खुले करणे, वेगळ्या दिशेने मालवाहू वाहने सीमा तपासणी नाक्याकडे घेणे, इतर वाहनाला मार्ग खुला करणे हे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. कागल पोलीस ठाण्यात झालेल्या या बैठकीत ठोस निर्णय घेण्यात आले असले, तरी नाका कायमस्वरूपी बंद व्हावा यासाठी १६ मार्च रोजी आंदोलन करण्याच्या निर्णयावर शिवसेनेचे (उबाठा) पदाधिकारी ठाम राहिले आहेत.



कागल पोलीस ठाण्यात आयोजित बैठकीप्रसंगी उपस्थित शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संजीव भोर सोबत पो.नि.गंगाधर घावटे.

गत आठवड्यात कर्नाटकात जाणाऱ्या महामार्गावर सीमा तपासणी नाक्याजवळ नाका प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे दोन तरुणांना जीव गमवावा लागला होता. त्यावेळी शिवसेनेने(उबाठा) महामार्गावरील वाहतुकीस अडथळे ठरणारे झिगझ्याग काढून टाकून रस्ता मोकळा केला होता. परंतु नाका प्रशासनाने पुन्हा अडथळे लावले होते .तरीही अपघात झाले. त्यामुळे शिवसेना (उबाठा), स्थानिक नागरिक, शेतकरी यांनी पुन्हा आंदोलन केले. त्यावेळी या प्रश्ना संदर्भातच्या पार्श्वभूमीवर बैठक लावण्यात आली होती.

महामार्गाच्या दोन्ही बाजूस रमलरचे पांढरे पट्टे २०मार्चच्या आत मारणेचे आहेत. कर्नाटकात जाणारी मालवाहू वाहने डाव्या बाजूने घेणे .त्याच ठिकाणी महामार्गावरील इतर वाहनांना मोकळा रस्ता करण्याचे ठरले असले, तरी नाका कायमस्वरूपी बंद करण्यासाठी १६मार्च रोजी आंदोलन करण्याचा ठाम निर्धार केला आहे .

प्रादेशिक परिवहन विभागाचे संजीव भोर, प्रादेशिक परिवहन निरीक्षक सागर भोसले, संदीप गडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे चंद्रकांत आयरेकर, रस्ते सुरक्षा समिती सदस्य प्रवीण भालेराव, कागलचे पोलीस निरीक्षक गंगाधर घावटे, उबाठाचे उपजिल्हाप्रमुख संभाजी भोकरे,कागल तालुका प्रमुख जयसिंग टिकले, कागल शहर प्रमुख अजित मोडेकर, नाका प्रतिनिधी वैभव पवार, रमेश तोडकर, अमर शिंदे,शिवसेनेचे(उबाठा) म्हाळू करीकट्टे, वैभव मोडेकर,अमर संकपाळ, सुधाकर चव्हाण, गणेश लांबतुरे, नगरसेवक अमित पिष्टे, प्रशांत घाटगे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# सै.टाकळी–चंदूर रस्त्यावर सातत्याने वाहतूक कोंडी

**सै.टाकळी,ता.१२ (प्रतिनिधी)–** **महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांना जोडणाऱ्या सैनिक टाकळी ते चंदूर दरम्यानच्या नव्याने सुरू झालेल्या पुलामुळे या मार्गावर वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली आहे. मात्र, पुलाला जोडणारा महाराष्ट्र हद्दीतील रस्ता अत्यंत अरुंद आणि खराब असल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून, परिसरातून संताप व्यक्त केला जात आहे.**

कर्नाटक राज्यातील मांजरी, येडूर आणि चंदूर मधून इचलकरंजी आणि कुरुंदवाड यांसारख्या व्यापारी शहरांकडे जाण्यासाठी हा सर्वात जवळचा आणि सोयीस्कर मार्ग ठरत आहे. यामुळे खासगी वाहने, अवजड वाहतूक आणि ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांची या मार्गावर २४ तास ये-जा सुरू असते. खिद्रापूर, नृसिंहवाडी साठी येणाऱ्या भाविक व पर्यटकांची वर्दळ याच मार्गावरून होत आहे. वाढत्या वाहतुकीच्या तुलनेत रस्ता अत्यंत अरुंद असल्याने दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. शेतशिवारातून जाणाऱ्या या मार्गावर धुळीचे लोट उसळत असल्याने वाहन चालकांसह शेतकऱ्यांचेही आरोग्य धोक्यात आले आहे. पुलामुळे अंतर कमी झाले असले तरी, खराब रस्त्यामुळे अपघातांची टांगती तलवार कायम आहे.सध्या उन्हाळ्यातच या रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर या कच्च्या आणि खराब रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होईल, ज्यामुळे हा मार्ग पूर्णपणे ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने गांभीर्य ओळखून पावसाळा सुरू होण्यापूर्वीच या रस्त्याची उंची न वाढवता रुंदीकरण आणि डांबरीकरण करावे, अशी आग्रही मागणी प्रवासी आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे. नव्या पुलामुळे आमचा वेळ वाचतोय खरा, पण खराब रस्त्यामुळे वाहनांचे नुकसान होत आहे आणि तासनतास कोंडीत अडकून पडावे लागत आहे. सरकारने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

# गॅसचा तुटवडा भाजपा सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे-सपकाळ

**मुंबई,ता.१२ (प्रतिनिधी)–** **आखाती युद्धामुळे देशभरात एलपीजी गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा आहे त्याला भाजपा सरकारचे चुकीचे धोरण व नाकर्तेपणामुळे झाला आहे. आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्याचे भाजपा सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही त्याचा फटका सर्वसामान्य जनतेला भासत आहे. इंग्रजांनी मीठावर कर आकारला त्यावेळी महात्मा गांधी यांनी आजच्याच दिवशी १९३० साली दांडी मार्च काढून ब्रिटिश सत्तेला हादरवून सोडले होते, त्याची प्रेरणा घेऊन जनतेने आज आंदोलन करून सरकारला धारेवर धरले पाहिजे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.**

त्र्यंबकेश्वर येथे काँग्रेसच्या लोकप्रतिनिधी कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, देशात स्वातंत्र्य चळवळ सुरु असताना महायुद्धाला सामोरे जावे लागले, स्वातंत्र्यानंतरही जगाच्या अनेक भागात अशा प्रकारच्या प्रसंगाला सामोरे जावे लागले पण त्यावेळी काँग्रेस सरकारने, तत्कालीन पंतप्रधान यांनी राष्ट्र म्हणून सर्वांशी संवाद साधत ठोस धोरण, योग्य नियोजन यामुळे गॅस वा इंधनाच्या तुटवड्याची गंभीर परिस्थिती निर्माण होऊ दिली नाही. पण आज भाजपा सरकारकडे अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी कोणतेही धोरण नाही, संवाद नाही, सरकारने सर्व घटकांशी संवाद साधून त्यातून मार्ग काढला पाहिजे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. फडणवीस यांच्याबद्दल बोलताना सपकाळ पुढे म्हणाले की, माझ्यावर फडणवीस व भाजपाचे नेते अत्यंत खालच्या पातळीवरची टिका करतात. त्याचे आश्चर्य वाटत नाही कारण फडणवीस व भाजपा विचार हा बहुजनांचे हक्क नाकारणारा आहे. हजारो वर्षापासूनचा हा संघर्ष आहे, त्यांची मानसिकता बहुजनविरोधी आहे. याच विचाराचा सामना आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनाही करावा लागला, मी तर पामर आहे. त्र्यंबकेश्वरच्या भूमीतून मी फडणवीस यांच्यासाठी परमेश्वराकडे सुबुद्धी देवो, अशी प्रार्थना करतो आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्या दोन ओळी सांगतो, छोटे दिल से कोई बडा नही होता, तुटे दिल से कोई खडा नही होता, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.विधानभवनात बॉम्ब असल्याचा ई मेल आला हे ऐकून राज्यातील कायदा सुव्यवस्था किती ढासळली आहे याचा प्रत्यय येतो.

## कोल्हापूरात १६ मार्चला डाक अदालत

**कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)–** **प्रवर अधीक्षक डाकघर, कोल्हापूर कार्यालयात येत्या १६ मार्च रोजी दुपारी ३ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.**

कोल्हापूर डाकघर विभागाशी संबंधित पोस्टाच्या सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतीध्ये दखल घेतली जाईल. विशेषत: टपाल वस्तू, मनीऑर्डर, बचत खाते, प्रमाणपत्र याबाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा. (उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठविली असेल त्याचे नाव, हुद्दा इ.) संबंधितांनी डाक सेवेबाबतची आपली तक्रार वैभव वाघमारे, प्रवर अधीक्षक डाकघर, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर ४१६००३ यांच्या नावे दोन प्रतींसह १४ मार्च पर्यंत अथवा तत्पूर्वी पोहचेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या तक्रारींची डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाणार नाही.

## डी.वाय.पाटील अभियांत्रिकीच्या संतोष पाटीलचे यूपीएससीमध्ये यश

**कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)–** **येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागाचे माजी विद्यार्थी अथर्व संतोष पाटील यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संयुक्त संरक्षण सेवा परीक्षेत देशात ३२ वा क्रमांक मिळवत यश संपादन केले. भारतीय नौदलात सब लेफ्टनंट पदावर त्याची निवड झाली आहे.**



संतोष हे २०२४ बॅचचे विद्यार्थी आहेत. अत्यंत स्पर्धात्मक आणि कठीण मानल्या जाणाऱ्या यूपीएससी सीडीएस परीक्षेत मिळवलेले हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेत असतानाच त्यांनी शिस्तबद्ध तयारी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही संरक्षण क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता,प्राचार्य डॉ. संतोषकुमार चेडे, रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे तसेच एआयएमएल विभागप्रमुख डॉ. सिद्धेश्वर पाटील यांनी अथर्व पाटील यांचे अभिनंदन केले.

## सिलिंडर टंचाईने इलेक्ट्रिक उपकरणांवर भर

**पुणे,ता.१२–**गॅस सिलिंडर मिळत नसल्याने नागरिकांनी पर्यायी उपकरणांचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक वस्तूंच्या दुकानांमध्ये विविध उपकरणे आणि संबंधित साहित्यांना मागणी वाढली आहे. यात इंडक्शन शेगडी आणि त्यासाठी आवश्यक कूकर, इलेक्ट्रिक कॉइल शेगडी, ओव्हन आणि इतर उपकरणांची मागणी वाढली आहे. यात इंडक्शनला मोठी मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

## पूर्ववैमनस्यातून एकास मारहाण

**सांगली,ता.१२( प्रतिनिधी)–** **पूर्वीच्या भांडणातून एकाने सेंट्रिग काम करणाऱ्या मजुराला दगडाने मारहाण केली. याप्रकरणी जखमी प्रकाश शामराव वडर (वय ४०) यांनी विश्रामबाग पोलीसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सुशांत महादेव वडर (वय १९, रा.वडर कॉलनी) याच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.**

फिर्यादी प्रकाश वडर आणि संशयित सुशांत वडर याचे काही दिवसांपूर्वी भांडण झाले होते. याचा राग सुशांत याच्या मनात होता. मंगळवारी सायंकाळी ४ च्या सुमारास फिर्यादी प्रकाश हे घरगुती कारणातून त्यांचा मुलगा सोहम यास रागवत होते. त्यावेळी अचानक सुशांत हा त्याच्या घरातून बाहेर आला. रस्त्यावर पडलेला दगड घेवून त्याने प्रकाश यांच्या डोक्यात आणि कपाळावर मारुन त्यांना जखमी केले. तसेच प्रकाश यांची पत्नी भाग्यश्री आणि मुलगा सोहम यांना शिवीगाळ करुन तुमचे हातपाय तोडतो अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

## डोंबीवलीकरांचा लेझीममध्ये जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड

**डोंबीवली,ता.१२–** **जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९ हजार १११ महिला आणि विद्यार्थीनीनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.**

भाजप प्रदेशाध्यक्ष,आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला. या आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी सांगितले. याआधी ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन तो रेकॉर्ड रचला होता, मात्र तो डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले.साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी हा रेकॉर्ड केला. त्यावेळी स्वप्नील डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या पत्नी सुहासिनी रविंद्र चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे सर्टिफिकेट व पदक देण्यात आले. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानत लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे असेही ते यावेळी म्हणाले.

## राजधानीत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी दिल्ली,ता.१२–** **आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी कोपर्निकस मार्ग येथील जुने महाराष्ट्र सदन येथे त्यांच्या प्रतिमेस आणि कस्तुरबा गांधी मार्ग येथील महाराष्ट्र सदनातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.**

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे आणि महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या महाराष्ट्राच्या विकासातील आणि देशाच्या जडणघडणीतील ऐतिहासिक योगदानाचा परिचय करून दिला.


### जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. १७ पैकी क्षेत्र हे.०.०९.०० आर खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस –नायकवडे व पाटील यांची मिळकत, पश्चिमेस– सदर गट नं. पैकी शिल्लक मिळकत, दक्षिणेस– रस्ता, उत्तरेस– पवळे यांची मिळकत . येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत विलासमती बाबगोंडा पाटील, रेखा रामगोंडा पाटील व प्रदिप बाबगोंडा पाटील रा. कोरोची यांचे सामाईक कब्जेमालकीची असुन त्यातील विलासमती बाबगोंडा पाटील व रेखा रामगोंडा पाटील यांचे वाटणीस येणारा संपूर्ण हिस्सा त्यांनी आमचे अशिलांशी निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन १५ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही ता. १२/०३/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**
**पत्ता– गाळा नं.३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो. ७८२०९०९७०५**

### जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. १०१ पैकी क्षेत्र हे . ०.१०.० आर खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – १५ फुट रस्ता व वसंत चौगुले यांची मिळकत, पश्चिमेस – वसंत चौगुले यांची मिळकत, दक्षिणेस – वसंत चौगुले यांनी सोडलेला २० फुट रस्ता, उत्तरेस – महादेव चौगुले यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही वसंत शिवाप्पा चौगुले यांचेकडुन राजेंद्र शिवा सुळकुडे रा. शहापूर यांनी करारपत्राने घेतलेली असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ.वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही.

ता.१२ / ०३ / २०२६.

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**
**पत्ता– गाळा नं.३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो. ७८२०९०९७०५**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन– जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मौजे चंदुर येथील क.ग.नं.४१३ पैकी भुखंड क्रमांक १२ क्षेत्र ०.००.४१ हे.आर.चौ.मी.ची खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – सरकारी रस्ता. पश्चिमेस सावंत यांची मिळकत. दक्षिणेस –याच गट पैकी मिळकत. उत्तरेस– याच गट पैकी मिळकत. चतु:सिमेतील मिळकत ही सौ. शबाना जमीर डांगे रा.चंदुर यांचे मालकी हक्काची आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जीत असलेचा निर्वाळा सौ.डांगे यांनी आमचे मित्रांना देऊन संचकार दाखल रक्कम स्विकारुन सदर मिळकत खरेदी देणेचे ठरवीले आहे. सदर मिळकतीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क, तारण, गहाण, बोजा वगैरे हितसंबंध असलेस नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत लेखी खुलासा करावा मुदतीनंतर कोणाची कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.म्हणून दिली जाहीर नोटीस. दि.१३/०३/२०२६

**श्री.कुमार उर्फ संतोष रायगोंडा पाटील**
**(स्टॅम्प व्हेंडर)**
**राजवाडा चौक,इचलकरंजी ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर जाधव पेट्रोल पंपाजवळ.**

### जाहीर नोटीस

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स नंबर ६८५ हिस्सा क्र.१ ड व रि.स नंबर ६८५ हिस्सा क्र. ४ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर १२ चे क्षेत्र ३०६-२५ चौरस मिटरची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस– साळुंखे यांची मिळकत, पश्चिमेस – ३० फुट रूंदीचा रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नंबर ११ पैकी गाडगीळ यांची मिळकत, उत्तरेस – प्लॉट नंबर १३ ची मिळकत . सदरची मिळकत ही सौ सुनिता बाहुबली मुरगुंडे रा इचलकरंजी यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी सदर मिळकतीचा आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही ता. १२/०३/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**
**३/१५३, देवमोरेवाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर मो.नं.९८८१०१४७२५**

### जाहीर नोटीस

१)मिळकतीचे वर्णन:- जिल्हा कोल्हापूर, पोट तुकडी इचलकरंजी ता.व ता. पं. स. हातकणंगले पैकी मौजे कबनूर हद्दित समाविष्ठ झालेली प्लॉट मिळकत असून ती मा. सह – दुय्यम निबधंकसो, वर्ग –२ इचलकरंजी यांचे अधिकारातील क गट नंबर ६७९ क्षेत्र हे. आर.३.६८.०० आकार ५.३७ रूपये पैसे या पुरे गट नंबर पैकी अंदाजित १० गुंठे जागा यासी चतु:सिमा पूर्वेसः सुर्वे यांचा कारखाना,पश्चिमेस : ३० फुट रुंदीचा रस्ता,दक्षिणेस : दशरथ मलकापूरे यांची मिळकत उत्तरेस : शिरगुप्पे यांची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमीन मिळकत, तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह, यास यापुढे मिळकत असे संबोधले आहे.वर नमूद मिळकत ही श्री. मनोहर दादू शिरगुप्पे व श्री मधुकर दादू शिरगुप्पे यांचे मालकी वहिवाटीची असून सदरची मिळकत ही त्यांनी आमचे अशिलांना खरेदी करारपत्राने देवु केलेली आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणतेही स्वरूपाचा कायदेशीर हक्कसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसामध्ये खालील नमूद पत्त्यावर लेखी, कायदेशीर कागदपत्रासह कळवावे म्हणून प्रसिध्द केली जाहीर नोटीस ता.१२.३.२०२६

**ॲड.भरत देवराज जोशी**
**नोटरी भारत सरकार**
**१५/६९८, देवपुष्प, कलानगर, इचलकरंजी. मो.नं. ९४२२४१७१७७**

### जाहीर नोटीस

ता. हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील क.ग.नं. १९२/ प्लॉट नं/२१ क्षेत्र १-५४.२० आर. चौ.मी. ची बिगरशेती प्लॉट नंबर २१ याचे क्षेत्र १५४-२० चौरस मीटर ची खुली जागा मिळकत सर्व. यासी चतु:सिमा पूर्वेस– प्लॉट नंबर २३ ची मिळकत, पश्चिमेस– ९ मिटर रुंदीचा सोडलेला रस्ता, दक्षिणेस– प्लॉट नं. २२ ची मिळकत व उत्तरेस–प्लॉट नं. २० ची मिळकत.येणेप्रमाणे चतु:सिमेतील बिगरशेती खुली जागा मिळकत सर्व ही सुनिलकुमार कांतीलाल बोरा रा. इचलकरंजी यांचे स्वसंपादीत मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे मित्र यांना खरेदी देणेचे ठरवुन आमचे मित्र यांना करारपत्र करुन देवुन भरीव संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदर वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा श्री. बोरा यांनी आमचे मित्र यांना दिलेला आहे.

सदर वरील मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान,बक्षीस, करार,लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलाही हक्क,अधिकार, वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रासह समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे मित्र वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण करुन घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

दि.१२/०३/२०२६

**श्री.भाऊसाहेब कुबेर पाटील**
**(स्टॅम्प रायटर)**
**पत्ता–राजाराम स्टेडियम, गाळा नं.२४, इचलकरंजी मो.नं. ९९२१६०२७००**

### जाहीर नोटीस

**मौजे यड्राव येथील गट नंबर ९१ पैकी क्षेत्र हे.०.२७.५० आर** ची शेत जमिन मिळकत यासि चतु:सिमा- पुर्वेस - ओढा, पश्चिमेस - सरकारी रस्ता, दक्षिणेस–गट नंबर ९८ ची मिळकत, उत्तरेस - श्री. लोहिया यांची मिळकत. सदर ची मिळकत **श्री. जयंतीलाल भिमजी छाबैया व श्री. कमलेश भिमजी केसराणी. रा. दोघे. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत त्यांनी सदर मिळकतीचे तोंडीकरारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.११/०३/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं.९४२०७७६४८६**

### जाहीर नोटीस

**१) मिळकतीचे वर्णन :** इचलकरंजी महानगरपालीका हद्दीतील नव्याने शहापूर हद्दीतील क.ग.नं. २४१ व २४२ याचा प्लॉट नं. ३ व ४ याचे एकत्रित क्षेत्र १५३० चौ. फुट म्हणजेच १४२ चौ.मी., याची मोजमापे प्लॉट नं. ४ पैकी पश्चिम बाजूची पुर्वपश्चिम २ फुट, दक्षिणोत्तर ८५ फुट, तसेच प्लॉट नं. ३ पैकी पुर्व बाजूची पुर्वपश्चिम १६ फुट, दक्षिणोत्तर ८५ फुट या मापाची बिगरशेती प्लॉट मिळकत. याचा कलेक्टरसो कोल्हापूर यांचेकडील नं. डीईएसके/।।।/आर.बी./एलएनएएसआर ९२१/दि.१२/०९/१९८५ ने बिगरशेती झालेली प्लॉट मिळकत. यासी एकत्रित चतुः सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ४ पैकी मांगूरे व गवंडी यांची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. ३ मधील उर्वरीत मिळकत, दक्षिणेस– गट नं. २४९ ची मिळकत व उत्तरेस– २० फुट रुंदीचा रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट मिळकत ही **श्री रामचंद्र जसकरण शर्मा उर्फ जांगीड रा.इचलकरंजी** यांचे स्वकष्टार्जीत मालकी व कब्जा वहिवाटीची असून सदरची मिळकत आमचे अशिलांना विक्री करणेची ठरवून आमचे अशिलांचे लाभात खरेदीपुर्व करारपत्र करुन देवून संचकार दाखल भरीव रक्कम उचल केली आहे.

२) तरी सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही हक्कसंबंध, करार, मदार वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावरती लेखी खुलासा करावा. मुदतीनंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस तारीख १२/०३/२०२६.

**ॲड.प्रदीप जयसिंग भातमारे**
**मु.पो.इंगळी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर मोबा.नं. ९८५०३१९०१५.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीसाठी प्रसिध्द करणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन–** मौजे जांभळी येथील मिळकत गट नं.४६३ याचे एकूण क्षेत्र हे.१.७७ आर आकार रु.८=५० पैसे यापैकी क्षेत्र हे. ०.५१ आर ची मिळकत यापैकी समजुतीचे नकाशा प्रमाणे भुखंड क्र.१ याची मोजमापे पुर्वबाजू- ६१.५'', पश्चिमबाजू-६५.९'',दक्षिणबाजू- १७८.९'',उत्तरबाजू- १८९.५'' याचे एकूण ११५९०.२४ चौ. फुट याचे चौ.मी.१०७७.१५ ची खुली जागा मिळकत याचे ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे. ०.१०.७७ आर व त्यामधील असणारे ५ खोल्यांची बंदिस्त सिमेंट पत्र्याची घर मिळकत सर्व यासी चतुः सिमा- पुर्वेस - लिहून देणार यांनी विक्री केलेली मिळकत, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - समाईक वहिवाटीचा रस्ता,उत्तरेस - गट नं. ४६३ पैकी वंदना श्रीकांत कांबळे वगैरे यांची मिळकत.

२)वर नमूद मिळकत ही मुळची श्री. भरत कल्लू घाट, रा. तोरणानगर, शहापूर यांचे असून त्यांनी करारपत्राने श्री.नागेश मधुकर मुदगल यांना दिली असून, सदर मिळकतीचे पश्चिम बाजूस रस्ता असून त्याचे दक्षिण बाजूस समाईक वहिवाटीचा रस्ता असलेचे नमूद केले असून श्री. नागेश मुदगल यांनी सदरची मिळकत निर्वेध, निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून, मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारा दाखल भरीव रक्कम स्विकारुन आमचे अशिलांचे लाभात रजि.खरेदीपुर्व करारपत्र लिहून दिले आहे.

३) सबब,वर नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, तारणगहाण, दान, हिस्सा, इजमेंट ,ॲटॅचमेंट, कोर्ट हुकूम, वाटणी, कर्जबोजा वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत सर्व अस्सल कागदपत्रासह खालील पत्त्यावर लेखी कळवावा. मुदतीत कोणाची तक्रार अगर हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीपत्राचा व्यवहार पुरा करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींचा व हरकतींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता.१०/०३/२०२६

**ॲड. राजकुमार पांडुरंग निर्मळ**
**( ॲड. व नोटरी भारत सरकार) ३/३११/१, अवधुत आखाडा, इचलकरंजी मो.नं.९८६०४४११५२**

### जाहीर नोटीस

**१) मिळकतीचे वर्णन :–** जि. व तु. कोल्हापूर पोट तु. ता. हातकणंगले मा. सह दुय्यम निबंधकसो, वर्ग २ इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. २/अ याचे क्षेत्र १ हे. ६७.०० आर यापैकी इचलकरंजी नगरपरीषद इचलकरंजी यांचे कडील गुंठेवारी विकास नियमाधिन क्र.८४ दि. २८/०६/२००७ ने गुंठेवारी नियमित झालेली असून मा.उपविभागीय अधिकारीसो इचलकरंजी विभाग इचलकरंजी यांचे कडील आदेश क्र. गुंठेवारी अ.आ. आ / एस. आर ४४० दि. २०/०७/२००७ ने निवासी कारणासाठी बिगरशेती झालेली असून त्यास भूखंड क्र. ३ ब असा दिला असून त्याचे क्षेत्र ५४९.७२ चौ. मी. याचे चौ. फुट ५९१५, याची मोजमापे पुर्व – पश्चिमउत्तर बाजू २१.६४ मी व दक्षिण बाजू २१.६४ मी व दक्षिणउत्तर पूर्व बाजू २५.४० मी. व पश्चिमबाजू २५.४० मी ची खुली मिळकत यांसी चतु:सिमा, पुर्वेस – श्री मगदूम यांची मिळकत, पश्चिमेस –२० फुट रूंदीचा रस्ता, दक्षिणेस – २० फुट रूंदीचा रस्ता, उत्तरेस – भूखंड नं. ३ अ ची मिळकत, येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत व तदंगभुत वस्तुसह सर्व.

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही **सौ. भाग्यश्री सुहास आकीवाटे** यांचे मालकी कब्जेवहीवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशील यांना विक्री करणेचे ठरविले असून त्यांनी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून आमचे अशिलांशी साक्षीदाराने समक्ष तोंडी व्यवहार ठरविला असून संचकार दाखल रक्कम स्विकारली आहे.

३) सबब, वर नमुद मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, दावा वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून सात (७)दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. तसे मुदतीत न घडलेस आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण करून घेतील. मुदतीनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार आलेस ती आमचे अशिलांचेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहिर नोटीस. ता.१२/०३/२०२६.

**ॲड. विशाल व्ही.जाधव**
**ऑफिस:कलश गिफ्टस् ॲन्ड वॉचेस, सिध्द साई बिल्डींग,धान्य ओळ, इचलकरंजी. मो.बा.९६३७४७९००९**

# शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळणे महत्त्वाचे

## बाबासाहेब वनकोरे

दत्तवाड,ता.१२(वार्ताहर)–

**विविध शासकीय योजना सांगणे, वाचून दाखवणे, यापेक्षा प्रत्येक लाभार्थ्यांना प्रत्यक्ष या योजनांचा लाभ मिळणे हे महत्त्वाचे असल्याचे मत दत्तवाड पंचायत समिती सदस्य बाबासाहेब वनकोरे यांनी व्यक्त केले.**



दत्तवाड येथे आयोजित महाराजस्व समाधान शिबिर अभियान प्रसंगी बोलताना बाबासाहेब वनकोरे व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

ते दत्तवाड (ता.शिरोळ) येथे महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या योजनेअंतर्गत ''छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान'' टप्पा क्र.२ च्या येथील कुबेर हॉल येथे आयोजित शिबिरात बोलत होते.ते पुढे म्हणाले की, याप्रसंगी दत्तवाड मंडळ परिक्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित केलेल्या विविध अडचणी व समस्या यांची नोंद घेऊन आमदार साहेबांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय विविध अधिकाऱ्यांची बैठक घेऊन या समस्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे तरच या अभियानाचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

याप्रसंगी नायब तहसीलदार क्रांती पाटील, उप कृषी अधिकारी, महिला बचत गट संबंधित अधिकारी, एकात्मिक बाल विकास विभाग, भूमी अभिलेख अधिकारी, दत्तवाडच्या मंडळ अधिकारी, महसूल विभाग अधिकारी, आरोग्य विभाग अधिकारी आदींनी आपापल्या विभागासंदर्भात शासनाच्या वतीने नागरिकांच्या सोयीसाठी मिळणाऱ्या विविध योजना व सवलती तसेच केली जाणारी शासकीय कामे यासंदर्भात माहिती दिली.यावेळी बबन चौगुले, राजगोंडा पाटील, आदिनाथ हेमगिरे, विवेक चौगुले आदींनी दत्तवाड मधील महत्त्वाच्या समस्या मांडल्या. याबाबत शासनाने ही सतर्कता दाखवून हे प्रश्न मार्गी लावावे, असे आवाहन करण्यात आले.सदर अभियानाप्रसंगी तहसीलदार अनिलकुमार हेळकर, जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार तेजस्विनी पाटील, नायब तहसीलदार क्रांती पाटील, उत्तरादेवी शिंदे, बाबासो वनकोरे, अविनाश पाटील, दत्तवाड सरपंच सौ.अनिता कडाके, सी.डी. पाटील आदीसह ग्रामस्थ, शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वावलंबनातूनच महिला कुटूंबाची भरभराट करेल

## विजयालक्ष्मी आबिटकर; सुळंबी येथे महिला मेळावा,भेटवस्तूंचे वाटप

राधानगरी,ता.१२(प्रतिनिधी)–

**एकविसाव्या शतकात महिलांना प्रत्येक क्षेत्रात करिअरची दारे उघडी आहेत त्यामुळे त्यांनी फक्त चुल आणि मुल एवढंच आपलं कार्यक्षेत्र न पहाता शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय करावा स्वत:च्या पायावर उभे रहावे.म्हणजे खऱ्या अर्थाने नारीशक्तीची ताकद समाजात दिसून येईल .**



सुळंबी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना विजयालक्ष्मी आबिटकर,सोबत सरपंच सुरेखा गुरव व इतर महिला मान्यवर.

स्वालंबनातूनच महिला खऱ्या अर्थाने कुटुंबाची भरभराट करू शकेल,असे प्रतिपादन ताराराणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विजयालक्ष्मी आबिटकर यांनी केले.त्या सुळंबी (ता.राधानगरी) येथील लोकनियुक्त सरपंच सुरेखा प्रदीप गुरव युवती व महिला मंचच्या वतीने आयोजित महिला मेळावा, हळदीकुंकू व भेटवस्तू वाटप कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. स्वागत व प्रास्ताविक सरपंच सुरेखा गुरव यांनी केले.याप्रसंगी गावातील विविध तरुण शासकीय सेवेत रुजू झालेबद्दल व निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून बोलताना शितल फराक्टे म्हणाल्या, आधुनिक काळात महिलांनी कुटुंबात व समाजात जुनाट चुकीच्या रुढी परंपरांना फाटा देऊन आधुनिकतेचा स्विकार करून स्वतः जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

यावेळी दिप्ती चौगले, वैशाली डवर,सोनाली कदम, शुभांगी डवरी, नंदिनी खरात, नंदिनी घाटगे, सोनाबाई पाटील, उज्वला मोरे, ग्रामस्थ,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सुत्रसंचालन प्रा.आर.एस.पाटील यांनी केल. आभार शुभांगी बरगे हिने मानले.



इचलकरंजी येथील आपटे वाचन मंदिरमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

# आपटे वाचन मंदिरमध्ये जागतिक महिला दिन संपन्न

इचलकरंजी,ता.१२–

**आपटे वाचन मंदिर व श्री.स.सौ.गंगामाई महिलालय, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम प्रमुख पाहुण्या प्रा.डॉ.ज्योती जाधव यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

कार्यक्रमाचा शुभारंभ पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आला. स्वागत गंगामाई महिलालय अध्यक्षा सौ.मीना रानडे यांनी व प्रास्ताविक आपटे वाचन मंदिर अध्यक्ष सौ.सुषमा दातार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय कार्यवाह प्रा. मोहन पुजारी यांनी करून दिला. प मा. ॲड.जिया शेख (आयर्न वुमन), श्रद्धा गोडसे (महिला कीर्तनकार), ॲड.प्रीती पटवा (विधी शैक्षणिक मार्गदर्शन),सुषमा पाटील (व्यवसायिक), शैलजा शिंदे (संचालक, श्रेय केअर सेंटर), आसावरी सातपुते (वृद्धाश्रम, चोकाक) अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.आभार अश्विनी मराठे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.प्रा.सुजित व सौ.पूर्वा सौंदत्तीकर यांनी केले. या कार्यक्रमास दोन्हीही संस्थांचे पदाधिकारी, संचालक, पत्रकार, सभासद, नागरिक उपस्थित होते.

# राज्यस्तरीय डिपेक्स स्पर्धेमध्ये केआयटी प्रथम

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)

**छ.संभाजीनगर येथे नुकत्याच झालेल्या सृजन,कौशल्य विभाग मंत्रालय, महाराष्ट्र राज्य व एम.आय.टी.कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय डिपेक्स–२६ या प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये येथील केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वागत) महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी वेस्ट मॅनेजमेंट या विभागात सर्वोत्कृष्ट प्रोजेक्टचा बहुमान मिळवला.**



राज्यभरातून आलेल्या जवळपास ७० महाविद्यालयांशी स्पर्धा करत हा बहुमान केआयटीने पटकावला आहे.'वॉल माऊंटेड वेस्ट श्रेडिंग मशीन' या प्रोजेक्टच्या माध्यमातून घरामध्ये दररोज निर्माण होणाऱ्या किचन वेस्ट साठी एक छोटे व सहज वापरण्यायोग्य मशीन बनवलेले आहे.ज्यातून एखाद्या अपार्टमेंटमध्ये निर्माण होणारे किचन वेस्ट सुद्धा अगदी थोड्या वेळात कंपोस्ट बेड साठी इनपुट मटेरियल म्हणून वापरले जाऊ शकते.या प्रोजेक्ट टीम मध्ये सुयश तुपे, सोहम बिरंजे,स्वानंद शिंदे आणि सायली कांबळे या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.प्रा.अमित वैद्य यांनी या प्रोजेक्टचे मार्गदर्शक म्हणून काम केले. विजेत्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ.मोहन वनरोट्टी यांनी मनोगत व्यक्त केले.डॉ.उदय भापकर,साजिद हुदली, सचिन मेनन, सचिव श्री दीपक चौगुले यांचे मोलाचे प्रोत्साहन यासाठी मिळाले.

# कौलव येथे ग्रामरत्न पुरस्कारांचे वितरण

भोगावती,ता.१२(प्रतिनिधी)–

**कौलव(ता.राधानगरी) येथे चंद्रकांतदादा पाटील कौलवकर फौंडेशनच्यावतीने ग्रामरत्न पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.**

कोल्हापूर जिल्ह्यात विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा कोल्हापूर जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक ए. वाय. पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे स्वागत चंद्रकांतदादा पाटील यांनी बुके देऊन केले.ग्रामरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्यांमध्ये संभाजी भगवान यादव (हास्यसम्राट) यांचा समाजप्रबोधनपर व्याख्यानांद्वारे केलेल्या कार्याबद्दल गौरव करण्यात आला. आशासेविका म्हणून समाजसेवा करणाऱ्या सौ.वंदना बाबुराव जाधव यांना पुरस्कार देण्यात आला. वनपाल सुरेश बाबुराव चरापले यांना तारा वाघीणीच्या संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल गौरवण्यात आले. ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या लोहपुरुष स्पर्धेत यशस्वी सहभाग नोंदविल्याबद्दल प्रेम राठोड यांचा सन्मान करण्यात आला.



याचबरोबर पी.एस.आय.पदावर निवड झाल्याबद्दल सचिन भोपळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.अजित पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे ए.वाय.पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सागर चौगले,राजू मेटेके यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमास विशाल कुंभार,रामचंद्र कुंभार,संभाजी पाटील, नामदेव लोहार,बाबासो पाटील, संदीप चरापले, अजित पाटील, अक्षय चरापले,विश्वास पाटील, दीपक चरापले, आण्णाप्पा चौगले, प्रकाश कांबळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.सूत्रसंचालन आनंदराव चरापले यांनी केले.आभार मनोज पाटील यांनी मानले.



# गणित प्राविण्य,सैनिक स्कूल प्रवेश परिक्षेत छ.शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

सैनिक टाकळी,ता.१२(प्रतिनिधी)

**कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षा आणि सातारा सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत छ.शिवाजी हायस्कूलच्या दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

मुख्याध्यापक संघातर्फे घेण्यात आलेल्या व कठीण समजल्या जाणाऱ्या गणित प्राविण्य परिक्षेत ऋग्वेद प्रदीप पाटील याने १५० पैकी १५० गुण मिळवून गणितावर आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. याच परिक्षेत शिवराज राजाराम पाटील याने १५० पैकी १४२ गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले. या दोन्ही परीक्षांमधील यशाबद्दल ऋग्वेद आणि शिवराज यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# गुरुदत्त शुगर्सच्या कार्यस्थळावर औद्योगिक सुरक्षा सप्ताह संपन्न

दत्तवाड,ता.१२(वार्ताहर)–

**५५ व्या राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा सप्ताहाचे औचित्य साधून राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त श्री गुरुदत्त शुगर्स येथे विविध उपक्रमांनी सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. कारखान्याचे सीईओ आर. रंगाप्रसाद यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

सेफ्टी ऑफिसर अझरूद्दीन काझी यांनी सर्वांना सुरक्षिततेची शपथ दिली.कारखान्याचे चेअरमन माधवराव घाटगे व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे, धीरज घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना सीईओ रंगाप्रसाद म्हणाले, सर्व कामगार व अधिकारी यांनी कारखान्यात काम करीत असताना अपघात होऊ नये यासाठी हेल्मेट, सेफ्टी बुट यासह सर्व सेफ्टी साधनाचा वापर करावा. तसेच कामगारांनी दिलेल्या नियमावली प्रमाणे व सुरक्षा साहित्याचा वापर केल्यास अपघात रोखण्यासाठी मदत होते.सुरक्षा सप्ताह निमित्त कामगारांमध्ये सेफ्टी निबंध, कविता, स्लोगन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कारखान्याचे सर्व खातेप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

# उद्योजकांनी देशाच्या आत्मनिर्भरतेत योगदान द्यावे

## काशिनाथ देवधर

इचलकरंजी,ता.१२–

**भारताने संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाचा ध्यास घेत आज जगात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. एकेकाळी शस्त्रास्त्रांच्या आयातीवर अवलंबून असलेला भारत आज संरक्षण साहित्याची निर्यात करणारा देश बनला आहे. उद्योजकांनीही संरक्षण उत्पादन क्षेत्रात पुढे येऊन देशाच्या आत्मनिर्भरतेत योगदान द्यावे, असे आवाहन संरक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांनी केले.**



रोटरी व्यावसायिक पुरस्कार वितरण समारंभप्रसंगी डॉ.काशिनाथ देवधर, संजय घायतिडक, राजू पाटील व इतर.

रोटरी क्लबच्यावतीने आयोजित रोटरी व्यावसायिक सेवा पुरस्कार (रोटरी व्होकेशनल अवॉर्ड) वितरण समारंभात प्रमुख पाहुणे तसेच 'संरक्षण, विज्ञान व नेतृत्व' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमास रोटरी प्रांत ३१७० चे उपप्रांतपाल सुदर्शन कदम, व्होकेशनल सर्विस डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी यतीराज भंडारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रोटरी व्यावसायिक सेवा पुरस्कार विजय रामचंद्र मेटे, सौ.स्वाती अश्विन कुराडे, विवेक चंद्रकांत हासबे, जयदत्त ॲल्युमिनियम प्रा.लि.दत्तात्रय उघडे आणि लघु उद्योग भारती(संस्था) याने प्रदान करण्यात आला. संजय घायतिडक यांनी स्वागत केले. प्रास्ताविक सुनील यळरुटे यांनी केले तर पाहुण्यांची ओळख महेश दाते यांनी करून दिली. यावेळी सुदर्शन कदम व यतीराज भंडारी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सौ.शर्मिला पाटील यांनी तर आभार सागर पाटील यांनी मानले. यावेळी प्रकाश गौड, नेमिनाथ कोथळे, रवींद्र नाकील,संजय खोत, मुकुंद माळी, मुकेश जैन, अभय यळरुटे यांच्यासह निमंत्रित, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांचे शिक्षण उपसंचालक कार्यालयसमोर मुंडन आंदोलन

हेरले,ता.१२(प्रतिनिधी)–

**१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियक्त विनाअनुदानित, अंशतः अनुदानित व त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनीच पेन्शन मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन कोअर कमिटीचे कार्याध्यक्ष सुरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली २७ फेब्रुवारी २०२६ पासून शिक्षण उपसंचालक कार्यालय समोर बेमुदत साखळी आमरण उपोषण सुरू आहे. या आंदोलनात मुंडन आंदोलन करण्यात आले.**

यावेळी भगवानराव साळुंखे, दादासाहेब लाड, सर्जेराव लाड, राहुल पवार,सचिव आर.वाय.पाटील,उदय पाटील,विजय जाधव,जयसिंग पवार, शिवाजीराव लोंढे, एम.एन.पाटील आदी उपस्थित होते. या आंदोलनामध्ये सुदेश जाधव, प्रकाश स्वामी, बाळासो संकपाळ, बळीराम पाटील, कुलदीप पाटील, शंकर पाटील निवास कळके, यशवंत तळेकर, विकास पाटील, सुभाष पाटील या मंडळींनी मुंडन करून प्रोत्साहनपर योगदान दिले.



श्रीहरी
शुक्रवार, ता. १३/०३/२०२६ पासून
दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिन्दी इचलकरंजीत प्रथमच
यौवन
प्रौढांसाठी
रोज २ खेळ- ४ व ७ वा.
A रात का किस्सा A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १३ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
चेंबर ऑफ व्होर्स
A फक्त प्रौढांसाठी A


गुरु
शुक्रवार ता.१३ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३०*३.३०*६.३० व *९.३० वा.
महिलांच्या प्रचंड गर्दीचा ६ वा विक्रमी आठवडा


रुबाब
(मराठी चित्रपट)

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
गर्दीचा २ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
bookmyshow
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.
कॉलेज युवती व महिलांचा वाढता प्रतिसाद


द केरला स्टोरी-२ (हिंदी)
ॲडव्हान्स बुकींग सुरु- धुरंधर-२ (हिंदी)

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता. १३ पासून
रोज ३ खेळ *११.४५ *३.१५ *६-३० वा.
BOOK YOUR TICKETS NOW


धुरंधर (हिंदी)

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow



" धुरंधर 2" - हिंदी (A)
From 18th March, 2026
05:30 PM, 10:00 PM
" द केरला स्टोरी 2 " (हिंदी)
01:00 PM, 04:00 PM
07:15 PM, 10:15 PM
" ओ' रोमियो " (हिंदी)
12:30 PM, 06:30 PM
" तेरे नाम " (हिंदी)
04:00 PM, 10:00 PM
आता कोणताही शो पहा 80/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11
द केरला स्टोरी २ (HIN) (U/A) 03.00, 05.30, 08.00, 10.30pm
ओ रोमियो (HIN) (A) 11.45am
ADVANCE BOOKING OPEN
DHURANDHAR 2 THE REVENGE
(A) (HIN)
Paid Preview Show 18-03-2026
06.00pm, 10.30pm
कोणताही शो फक्त 80 रु. पासून पुढे.

# जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलसह सिलिंडरचा पुरेसा साठा

## जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची माहिती; काळाबाजार रोखण्याचे आवाहन

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)–

**मध्यपूर्व आशियात सध्या सुरु असलेल्या युध्द परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याबाबत जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात कार्यरत असलेल्या भारत पेट्रोलियम (बी.पी.सी. एल), हिंदुस्थान पेट्रोलियम (एच.पी.सी.एल.) इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड (आय.ओ.सि.एल.) या तीनही कंपन्यांच्या विक्री अधिकारी तसेच जिल्ह्यातील संबंधित कंपन्यांचे गॅस व पेट्रोल वितरक यांची बैठक आयोजित केली होती.**




सातारा जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल, तसेच एल.पी.जी.घरगुती गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा करण्यात येईल, असे संबंधित गॅस वितरकांकडून सांगण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने यांनी दिली.गॅस कंपन्यांकडून घरगुती एल.पी.जी. सिलिंडरचे ऑनलाईन बुकिंग करणे बंधनकारक केले असून, पहिला सिलिंडर घेतलेपासून २६ दिवस झालेशिवाय दुसरा गॅस सिलिंडर बुकिंग करता येणार नाही, असे बदल प्रणालीमध्ये केलेले आहेत. त्यामुळे २५ दिवसानंतरच दुसऱ्या सिलेंडरचे नोंदणीकृत मोबाईल नंबरवरून नोंदणी करणे आवश्यक आहे. तरी नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, जिल्ह्यात घरगुती गॅस तसेच पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने पेट्रोल पंपावर, गॅस वितरक यांचे कार्यालयात अनावश्यक गर्दी टाळावी तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच गॅस सिलिंडरचा अनावश्यक वापर व साठा करू नये. गॅस कंपन्याकडूनच वरीलप्रमाणे प्रणालीत बदल केले असलेने गॅस वितरण करणारे व्यक्ती अथवा ड्रायव्हर यांच्याशी अकारण वाद घालू नये.

सदर युध्दजन्य परिस्थितीमुळे निर्माण होऊ शकणारी इंधन टंचाई आणि घरगुती एलपीजी गॅसचा होणारा काळाबाजार रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने विशेष निर्देश निर्गमित केले आहेत. या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यामध्येही घरगुती गॅसच्या अनधिकृत वापराला पायबंद घालण्यासाठी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तालुकास्तरावर धडक मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष दक्षता पथके तैनात करण्यात आली आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा वापर हॉटेल, ढाबे, व्यावसायिक आस्थापना किंवा औद्योगिक कारणांसाठी करता येणार नाही. अशा ठिकाणी पथकांमार्फत अचानक तपासणी करून सिलिंडर जप्त करण्याची कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींनाही त्यांच्या वितरणात पारदर्शकता ठेवण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या असून,त्यांच्या साठ्याची नियमित तपासणी तालुका पथकांकडून केली जाईल. घरगुती गॅसचा अवैध साठा किंवा व्यावसायिक वापर करताना आढळल्यास संबंधित व्यक्तीवर जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

घरगुती गॅसचा वापर केवळ विहित कारणांसाठीच करावा. गॅसचा काळाबाजार किंवा अवैध वापर होत असल्याचे आढळल्यास तात्काळ स्थानिक तहसील कार्यालय किंवा जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. गॅसची बचत हाईल अशा पध्दतीने जपून वापर करावा तसेच अन्य पर्याय जसे की सौर तसेच विद्युत उर्जेच्या उपकरणांचा वापर करावा,असे आवाहनही जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती राजमाने यांनी केले आहे.

## व्ही.पी. इन्स्टिट्यूटमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

मिरज,ता.१२(प्रतिनिधी)–

**वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सांगली येथे शनिवार ता.१४ मार्च रोजी बिझनेस एन्व्हायर्नमेंट इन नेक्स्ट जनरेशन ए.आय.(बीइंग ए.आय.)या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.**

यावेळी आयआयटीयन डॉ. अच्युत गोडबोले मुख्य बीजभाषक म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांची मार्गदर्शनपर भाषणे होणार आहेत. या परिषदेचा मुख्य उद्देश शैक्षणिक समुदाय, बहुविद्याशाखीय प्रवाहातील संशोधक आणि उद्योगपती यांना एकत्र आणून विविध व्यवसाय कार्यामध्ये ए.आय.च्या भूमिकेवर आधारित माहिती, अनुभव आणि संशोधन निकालांची देवाणघेवाण करणे हा आहे, अशी माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. ए. ए.सत्तीकर यांनी दिली.या परिषदेसाठी भारत तसेच परदेशातून ७५ शोधनिबंध प्राप्त झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ.आर.ए.शिंदे आणि प्राचार्य डॉ.आर.एम.यल्लट्टी यांच्या मार्गदर्शनाने या परिषदेचे आयोजन केले आहे.

## मलकापूरसाठी ११ कोटींचा निधी मंजूर–मनोहर शिंदे

कराड,ता.१२(प्रतिनिधी)–

**मलकापूर शहरातील दळणवळण सुविधा सुधारण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून एकूण ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. कराड दक्षिणचे आमदार डॉ.अतुल भोसले यांच्या शिफारशीने ढेबेवाडी फाटा ते राज्य मार्ग क्र.१४४ (कराड मार्केटयार्ड मार्ग) जोडणाऱ्या २४ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी १० कोटी रुपये तर शहरातील अंतर्गत रस्त्यांसाठी १ कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती मलकापूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मनोहर शिंदे यांनी दिली.**

मलकापूर शहर विकास योजनेअंतर्गत ढेबेवाडी फाटा ते कराड मार्केटयार्ड रोड जोडणारा २४ मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात आला होता. या रस्त्यासाठी यापूर्वीच भूसंपादनासाठी निधी मंजूर झाला असून सुमारे ९० टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. या रस्त्यामुळे ढेबेवाडी खोरे, आगाशिवनगर, तसेच परिसरातील नागरिकांना कराड शहर व विद्यानगर परिसरात जाण्यासाठी पर्यायी व सोयीस्कर मार्ग उपलब्ध होणार आहे. तसेच कोल्हापूर नाका परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मलकापूर शहरातील अंतर्गत रस्त्यांच्या कामांसाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी मंजूर झाल्यामुळे मलकापूर शहराच्या विकासाला चालना मिळणार असून दळणवळण व्यवस्था अधिक गतिमान होणार असल्याचे श्री.शिंदे यांनी सांगितले.

## सातारा नगरपरिषदेत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)–

**जागतिक महिला दिनानिमित्त सातारा नगरपरिषद व आयएमए वुमन्स विंग यांचे संयुक्त विद्यमाने नगरपरिषदेच्या महिला कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते.सदर शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष अमोल मोहिते, महिला व बालकल्याण समितीचे सभापती सौ. मोनिका घोरपडे, उपसभापती सुजाता गिरी गोसावी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.**

सदर शिबिरामध्ये रक्त तपासणी, गर्भाशय मुख तपासणी करण्यात आली. नगरपरिषदेच्या आरोग्य विभागातील जवळपास शंभर महिलांनी या शिबिरात तपासणी करून घेतली.डॉ.दीपक थोरात, डॉ.संदीप आठवले, डॉ.आशा बर्गे, डॉ.अपर्णा जगताप, डॉ.रसिका गोखले, डॉ.राजश्री देशपांडे, डॉ.वंदना घोरपडे, डॉ.अपर्णा भाकरे,डॉ. अमृता बोकील,डॉ.स्नेहांजली सुतार, डॉ.वैशाली चव्हाण आदी डॉक्टरांनी शिबिरात सहभाग घेऊन महिलांची आरोग्य तपासणी व महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. सदर शिबिराचे उद्घाटनवेळी आरोग्य सभापती धनंजय जांभळे व नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होत्या.

## सांगलीवाडीत अंध मुलांच्या क्रिकेट सामन्याचे आयोजन

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)–

**जिद्द असेल तर आभाळही ठेंगणे असते, याचा प्रत्यय सांगलीकरांना लवकरच येणार आहे. जिल्ह्याच्या क्रीडा इतिहासात प्रथमच १४ मार्च रोजी दिव्यांग अंध मुलांच्या क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन जिल्हाधिकारी अशोक काकडे, आर्किटेक्ट प्रमोद चौगुले आणि दिलीप शेलवंटे यांच्या हस्ते शनिवारी दुपारी होणार आहे. सांगलीवाडीतील चिंचबाग परिसरात हे सामने होत आहेत**

केवळ दृष्टी नाही म्हणून या मुलांच्या स्वप्नांना मर्यादा येऊ नयेत, हा या उपक्रमाचा मुख्य विचार आहे. सांगलीवाडी येथील ऐतिहासिक चिंचबाग मैदानावर दोन बलाढ्य संघांमध्ये हा सामना खेळवला जाईल. धाव घेतानाचा वेग, आवाजाच्या जोरावर होणारी क्षेत्ररक्षण आणि बॅटमधून निघणारे चौकार–षटकार पाहणे हा प्रेक्षकांसाठी एक थक्क करणारा अनुभव ठरणार आहे. या सामाजिक कार्यात अनेक मान्यवरांनी खांद्याला खांदा लावून सहभाग नोंदवला आहे. सांगलीकरांनी आपल्या सहकुटुंब उपस्थित राहून टाळ्यांचा कडकडाट करून खेळाडूंच्या जीवनात नवी उमेद निर्माण करावी. या खेळाडूंचे कौशल्य पाहण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## महाराजा मल्टिस्टेट सोसायटीची निवडणूक बिनविरोध

फलटण,ता.१२(वार्ताहर)–

**फलटण येथील महाराजा मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटीची पंचवार्षिक निवडणुकीत विद्यमान चेअरमन दिलीपसिंह भोसले यांच्या कुशल नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला असून, सलग चौथी निवडणूक बिनविरोध केली आहे.**

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी कांबळे, नायब तहसीलदार अनिल जाधव, सहाय्यक निबंधक राहुल देशमुख आदी अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सभासदांच्या उपस्थितीत संचालकांची नावे जाहीर केली.महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यात विस्तारलेल्या आणि सुमारे ५ हजार सभासद असलेल्या या मल्टीस्टेटची सलग चौथी पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडण्याचा करिष्मा विद्यमान चेअरमन दिलीपसिंह भोसले आणि व्हाईस चेअरमन रणजितसिंह भोसले यांनी केला आहे. सुमारे ८०० कोटीची आर्थिक उलाढाल असलेल्या महाराजा मल्टीस्टेटला विद्यमान चेअरमन दिलीपसिंह भोसले यांनी पारदर्शक कारभार, काटकसर,सभासदांचे व ठेवीदारांचे हित जोपासत महाराजा मल्टीस्टेटला प्रगतीपथावर नेऊन ठेवले आहे. सन २०२६–२७ ते सन २०३१–३२ या कालावधीकरिता नव्याने निवडून आलेले संचालक मंडळ असे, दिलीपसिंह भोसले, रणजितसिंह भोसले, ॲड सौ.मधुबाला भोसले, सौ.प्रियदर्शनी भोसले, तुषार गांधी, हेमंत फुले, अमोल सस्ते, कुमार भट्टड, विलास रसाळ, दिपराज तावरे, सुभाष आढाव. महाराजा मल्टीस्टेटच्या संचालक पदी निवडून आल्याबद्दल सर्व स्तरातून दिलीपसिंह भोसले व त्यांचे सहकारी यांचे अभिनंदन होत आहे.



दिलीपसिंह भोसले यांचा सत्कार करताना जिल्हाधिकारी संतोष पाटील व इतर.



शुभांगी घाटगे यांचा गौरव करताना तेजश्री बोंडे,उपायुक्त स्मृती पाटील,वैभव शिंदे,नगराध्यक्ष विशाल शिंदे व मान्यवर.

## आष्टा पालिकेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा गौरव सोहळा

आष्टा,ता.१२(प्रतिनिधी)–

**मळे भागातील महिलांना एकत्रित करीत त्यांना महिला बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक हातभार देण्याचे धडे देत महिलांना स्वावलंबी बनवणाऱ्या, व स्वतःच्या शेतीत राबत कुटुंबाला शेतीमध्ये साथ आधार देणाऱ्या शुभांगी नागनाथ घाटगे यांना आष्टा नगरपालिकेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त कृषी क्षेत्रातील विशेष गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

यावेळी सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेच्या उपायुक्त स्मृती पाटील, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे, नगराध्यक्ष विशाल शिंदे, उपनगराध्यक्ष दिलीपराव वग्यानी, महिला बालकल्याण समितीच्या सभापती सारिका मदने, वैष्णवी शिंदे,स्नेहा माळी, तेजश्री बोंडे, सविता वारे,स्नेहल मिरजकर,संगीता सूर्यवंशी, मंगलसिद्ध सावंत आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी आष्टा नगरपालिकेच्या वतीने शुभांगी नागनाथ घाटगे (कृषी), गीता महाजन (कृषी), कमल कोळी (उद्योग), फरीदा मकानदार (शिक्षण), डॉ.सुरेखा आडमुठे (आरोग्य), सोनाली कुरणे,(सामाजिक),अलका आवटी पाटील (कृषिरत्न), सोनल शिराळकर (कृषिरत्न), वैष्णवी शिंदे,(क्रीडारत्न), छबुताई ढोले (सामाजिक) यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.आष्टा नगरपालिकेकडून मिळालेल्या पुरस्काराबद्दल यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आष्टा पीपल्स बँकेचा ४२५ कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण

### दिलीपराव वग्यानी

आष्टा,ता.१२(२प्रतिनिधी)–

**दि आष्टा पीपल्स बँकेने सभासदांचे हित जोपासत ग्रामीण भागात ग्राहकांना बँकिंग क्षेत्रातील सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बँकेने ४२५ कोटींचा ठेवीचा टप्पा पूर्ण केला आहे, असे प्रतिपादन बँकेचे माजी चेअरमन तथा आष्टा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष दिलीपराव वग्यानी यांनी केले.**

येथील दि आष्टा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने आयोजित ग्राहक मेळाव्यात श्री.वग्यानी बोलत होते. यावेळी बँकेचे चेअरमन बबन थोटे, व्हा.चेअरमन विराज शिंदे, जयदीप थोटे,कौशिक वग्यानी हे प्रमुख उपस्थित होते.डॉ. मनोहर कबाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले.



पीपल्स बँकेच्या ग्राहक मेळाव्यात प्रतिमा पूजन करताना दिलीपराव वग्यानी,जयदीप थोटे,कौशिक वग्यानी,महावीर थोटे आदी.

बबन थोटे म्हणाले, 'फेब्रुवारी २०२६ अखेर बँकेचे भागभांडवल १७.१७ कोटी आहे. स्वनिधी ७०.३१ कोटी, राखीव व इतर निधी ५३.१५ कोटी, ठेवी ४२५.९२ कोटी, कर्ज वाटप २७०.६१ कोटी आहे.सुरेश आवटी, उपाध्यक्ष विराज शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी संचालक कौशिक वग्याणी, फंचू हालुंडे, अनिल चौगुले, सुरेश पाटील, राहुल पाटील,सुनील वाडकर, संदीप आवटी,अनिल पाटील, रामचंद्र सिध्द,विष्णू वारे, शुभदा चौगुले, सविता आवटी, विनोद पाटील,संपत देमाण्णा, नितीन झंवर, सुरेश कबाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी एस.एम. सरनाईक व सहाय्यक कार्यकारी अधिकारी ए.बी. मासाळ, पदाधिकारी उपस्थित होते. जयदीप थोटे यांनी स्वागत केले. संदीप आवटी यांनी आभार मानले.

## पंढरपुरात सोलापूर ग्रंथोत्सवाचे आयोजन

पंढरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर व तालुका ग्रंथालय संघ, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर ग्रंथोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, ता.१४ आणि रविवार, ता.१५ मार्च २०२६ रोजी रखुमाई सभागृह, नवीन बसस्थानकासमोर, पंढरपूर येथे हा ग्रंथ सोहळा संपन्न होणार आहे.**

### दोन दिवस विविध कार्यक्रम होणार

या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन आणि विविध सत्रांसाठी राज्याचे ग्रामविकास व पर्यटन मंत्री ना.गिरीश महाजन यांच्यासह खा. ओमराजे निंबाळकर, खा. धैर्यशील मोहिते–पाटील, आ.समाधान आवताडे, प्रशांत परिचारक, आणि आ. रणजितसिंह मोहिते–पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

शनिवारी सकाळी ९:३० वाजता नगराध्यक्षा सौ. प्रणिता भालके यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करून कार्यक्रम सुरू होईल. यावेळी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सचिन इथापे हे अध्यक्षस्थानी असतील.

दोन दिवसांच्या या महोत्सवात: परिसंवादात डॉ. रमेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा संवर्धन यावर चर्चा होईल. कवि संमेलन शिवाजी बंडगर यांच्या अध्यक्षतेखाली रंगणार आहे. नटसम्राट एकपात्री: फूलचंद गांगर्डे यांचा प्रयोग सादर होईल. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन संपन्न होईल.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे,अध्यक्ष श्रीमती श्वेता गोखले, सचिन जगताप, सुनील सोनटक्के, जोतिराम गायकवाड आणि साहेबराव शिंदे. प्रकाश शिंदे, किशोर गायकवाड, गुरुनाथ गोमिदे, दत्तात्रय मोरे आणि धोंडीराम जेऊरकर यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील विविध ग्रंथालयांचे ग्रंथपाल परिश्रम घेत आहेत.

या ग्रंथोत्सवात मोठ्या संख्येने पुस्तक प्रदर्शन आणि विक्रीचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील वाचक, विद्यार्थी आणि नागरिकांनी या अक्षरांच्या वारीत सहभागी व्हावे,असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



## राजारामबापूंच्या पुतळ्यास बहेच्या उपसरपंचांचे अभिवादन

ईश्वरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**बहे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ.धनश्री विष्णू थोरात यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. नूतन उपसरपंच सौ.धनश्री थोरात यांनी राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील, वाळवा तालुकाध्यक्ष विजयराव पाटील, बोरगावचे शिवाजीराव वाटेगावकर प्रामुख्याने उपस्थित होते. दिलीप देशमुख यांच्या राजीनाम्याने ही जागा रिक्त झाली होती.राजारामबापू साखर कारखान्याचे माजी संचालक माणिकराव पाटील,पंचायत समिती सदस्य मनोज पाटील, सरपंच संतोष दमामे, माजी सरपंच हणमंत पाटील,ॲड.कृष्णराव पाटील, सौ.वैशाली पाटील,भगवान पाटील,जालिंदर पाटील,अधिक मोहिते,विनायक पाटील, संदीप थोरात,अभिजित पाटील,निलेश थोरात, केशवराज थोरात,जयदीप थोरात, तसेच ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ईश्वरपूर येथे शनिवारी राज्यस्तरीय परिषद

ईश्वरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय यांच्यावतीने शनिवार ता.१४ मार्च रोजी विवेक वाहिनीची राज्यस्तरीय परिषद ईश्वरपूरमध्ये आयोजित केली आहे. आ.जयंतराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्रा. शामराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली केआरपी कॉलेजमध्ये सकाळी ११ वाजता उद्घाटन सोहळा होणार आहे. ही माहिती प्राचार्य डॉ.टी.जे. शिंदे, अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी दिली.**

अंनिसच्या पुढाकाराने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सुरू झालेल्या विवेक वाहिनी या उपक्रमास २५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने सकाळी १० ते सायंकाळी पाच या वेळेत ही एकदिवशीय परिषद आयोजित केली आहे.कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य आर.डी. सावंत,अँड. धैर्यशील पाटील,अंनिसचे राज्याध्यक्ष माधव बावगे,विवेक वाहिनीचे राज्य कार्यवाह प्राचार्य सविता शेटे, सहकार्यवाह डॉ.संतोष जेटीथोर, सहकार्यवाह डॉ.विठ्ठल घुले,कृष्णा स्वाती आदी मान्यवर उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

'समाज माध्यमे आणि तरुणाई' यावर विषयावर पत्रकार प्रशांत कदम (मुंबई), आणि ज्येष्ठ संपादक वसंत भोसले (सांगली) हे मार्गदर्शन करणार आहेत.तर 'वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी युवा' या विषयावर माहिती तंत्रज्ञान तज्ञ,नामवंत लेखक अच्युत गोडबोले,आणि खगोल अभ्यासक,विज्ञान लेखक प्राचार्य डॉ.नितीन शिंदे हे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. 'राज्यातील विवेक वाहिनीचा आढावा आणि भविष्य वेध'याबद्दलही चर्चा होणार आहे.

## महाबळेश्वर शहराचा चेहरामोहरा बदलणार

### नगराध्यक्ष शिंदे; विविध विकास कामांचा शुभारंभ

महाबळेश्वर,ता.१२(वार्ताहर)–

**'गेली अनेक वर्षे रखडलेल्या महाबळेश्वरच्या विकासाला आता खऱ्या अर्थाने चालना मिळाली आहे. राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या सहकार्याने महाबळेश्वर शहराचा चेहरामोहरा बदलण्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे स्वप्न असून, येत्या काही वर्षांत ते पूर्ण केले जाईल,' असा ठाम विश्वास नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी येथे व्यक्त केला.**

महाबळेश्वर शहरातील विविध प्रभागात नामदार मकरंद पाटील यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून विकासकामांचा शुभारंभ नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी योगेश पाटील,माजी नगराध्यक्षा विमलताई पार्टे, ॲड. संजय जंगम, संतोष शिंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



महाबळेश्वर येथे विकास कामांचा शुभारंभ करताना नगराध्यक्ष सुनिल शिंदे,समवेत नगरसेवक व इतर मान्यवर.

यावेळी पत्रकारांशी बोलताना नगराध्यक्ष शिंदे म्हणाले की, शहराच्या बहुतांशी सर्वच प्रभागांमध्ये विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने संरक्षक भिंतींचे बांधकाम, भूमिगत केबल टाकणे, समाज मंदिराच्या प्रांगणात पेव्हिंग ब्लॉक/फरशी बसवणे, रस्त्यांचे डांबरीकरण गटार व पदपथ (फूटपाथ) बांधणी प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करून प्रशासकीय राजवटीचा बॅकलॉग भरून काढणार आहे.पालिकेतील प्रशासकीय राजवटीपूर्वी असलेल्या लोकप्रतिनिधींना अपेक्षित विकासकामे करता आली नाहीत, त्यामुळे शहरात विकासाचा मोठा अनुशेष (बॅकलॉग) शिल्लक राहिला होता. प्रशासकीय काळातही म्हणावा तसा विकास झाला नाही, परिणामी नागरिकांच्या अपेक्षा सध्याच्या सत्ताधारी लोकप्रतिनिधींकडून वाढल्या आहेत. 'नागरिकांच्या या अपेक्षांचा भंग होणार नाही, याची पूर्ण जबाबदारी लोकनियुक्त नगराध्यक्ष आणि नगरसेवक घेत आहेत,' अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थित नगरसेवकांनी व्यक्त केली.

यावेळी नगरसेवक रोहित ढेबे, रवींद्र कुंभारदरे, सुनील आखाडे, संगीता वाडकर, रेश्मा ढेबे, स्मिता पाटील, राहुल पिसाळ, पल्लवी कोंढाळकर, नगरसेवक किसन शिंदे, अफजल सुतार, दत्ताजी वाडकर, अक्षय वायदंडे, संदीप काळे यांसह पालिका कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युद्धाच्या सावटाखाली गॅसचा काळाबाजार

## वितरकांकडून ग्राहकांची लूट आणि फसवणुकीचे प्रकार

रुकडी,ता.१२(वार्ताहर)-

जागतिक युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असतानाच,स्थानिक बाजारपेठेत गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून नफेखोरी करण्याचे प्रकार वाढले असल्याची चर्चा होत आहे.गॅस एजन्सी समोरील रांगा, ऑनलाईन फसवणूक आणि सिलिंडरचा काळाबाजार यामुळे सामान्य नागरिक संकटात सापडले आहेत.

**● कृत्रिम साठेबाजीवर कडक कारवाईची मागणी**

काही मोठ्या वितरकांकडून गॅसचा साठा करून तो जादा दराने विकण्याचे प्रकार होत असल्याची टिका नागरिकातून होत आहे.प्रशासनाने अशा साठेबाजांवर तातडीने कायदेशीर कारवाई करून साठवणुकीची



तपासणी करणे गरजेचे आहे. व्यावसायिक वापरासाठी घरगुती सिलिंडरचा सर्रास वापर होण्याची शक्यता आहे. सर्वात मोठी समस्या म्हणजे घरगुती वापराचे सिलिंडर हॉटेल आणि व्यावसायिक वापरासाठी वळवले जाऊ शकतात.

काही भ्रष्ट एजंट आणि एजन्सी जादा पैशांच्या मोहापायी घरगुती ग्राहकांचा कोटा व्यावसायिक कारणांसाठी वापरत आहेत. यामुळे प्रामाणिक ग्राहकांना वेळेवर सिलिंडर मिळेनासा झाला आहे.अशा एजन्सींचे परवाने रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे.

**● ई-केवायसीचा मनस्ताप**

गॅस एजन्सीबाहेर ई-केवायसीसाठी नागरिकांच्या मैलो न् मैल रांगा पाहायला मिळत आहेत.तासन्तास उभे राहूनही काम होत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने केवायसीसाठी पूर्णपणे सक्षम अशी ऑनलाइन व्यवस्था करावी, जेणेकरून ग्राहकांना घरबसल्या मोबाईलवरून प्रक्रिया पूर्ण करता येईल.

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

सध्या जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस टंचाई, दरवाढ आणि पुरवठा खंडित होण्याबाबत अनेक चुकीचे संदेश सोशल मीडियावर पसरवले जात आहेत. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.

### सावधान! गॅस बुकिंगच्या नावाखाली बँक खाते होऊ शकते रिकामे; सायबर भामट्यांचा नवा फंडा

सध्या जागतिक स्तरावर युद्धाच्या चर्चा आणि गॅस तुटवड्याच्या अफवांचा फायदा घेत सायबर गुन्हेगार सक्रिय झाले आहेत.गॅस बुकिंग,केवायसी अपडेट किंवा गॅस सबसिडी मिळवून देण्याच्या नावाखाली सर्वसामान्यांची ऑनलाइन फसवणूक करण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



अंगाची लाहीलाही होत असताना सकाळची शाळा आटोपून दुपारी नदीपात्रात पोहण्याचा आनंद लुटताना मुलांचे सिद्धनेर्ली (ता.कागल) येथे घेतलेले छायाचित्र. ( छाया:सागर लोहार,साके)

# सै.टाकळीतील स्ट्रीट पोलमुळे अपघातांना निमंत्रण

सैनिक टाकळी,ता.१२(प्रतिनिधी)-

**येथील स्मारक परिसरातील मुख्य चौकात असलेला स्ट्रीट लाईटचा पोल सध्या अपघाताला निमंत्रण देत आहे. नुकत्याच झालेल्या एका अपघातात एका वाहनाने या पोलला धडक दिली होती, ज्यामुळे पोलचे नुकसान झाले होते.**

संबंधित वाहनधारकाकडून दंड वसूल करून प्रशासनाने नवीन पोल तर बसवला आहे, मात्र या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा अभाव असल्याने पुन्हा अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. भर चौकामध्ये असलेल्या पोल मुळे रात्रीच्या वेळी किंवा वळण घेताना वाहनधारकांना याचा अंदाज येत नाही. त्यामुळे या



पोलभोवती भक्कम सिमेंटचा सुरक्षा कठडा बांधणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून पोल सुरक्षित राहील आणि भविष्यातील अपघात टळतील. स्मारक परिसर हा रहदारीचा मुख्य केंद्रबिंदू आहे.मात्र, सध्या येथील रस्त्याची मोठी दुरवस्था झाली असून जागोजागी खड्डे पडले आहेत.खडी उखडल्यामुळे दुचाकीस्वार घसरण्याचे प्रमाण वाढले आहे.

## एक हजारहून अधिक मोफत शस्त्रक्रियांचे नियोजन

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून आरोग्य विभाग कोल्हापूर व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्व शस्त्रक्रिया अभियान आणि जिल्हास्तरीय लसीकरण मोहिम राबविण्यात येत असून या अभियानांतर्गत उपक्रमाद्वारे जिल्ह्यातील ५ शासकीय रुग्णालयांमध्ये गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत.**

यामध्ये स्त्रीरोग, नेत्ररोग (मोतीबिंदू, काचबिंदू), बालरोग, कान-नाक-घसा (टॉन्सिल, थायरॉईड), मूत्ररोग (प्रोस्टेट), ऑर्थोपेडिक (सांधे रोपण), प्लास्टिक सर्जरी, हर्निया, अपेंडिक्सआदी शस्त्रक्रियांचा यात समावेश आहे.गारगोटी येथे या अभियानाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला, या कार्यक्रमास जिल्हा परिषद सरस्या रोहिणी आबिटकर, रेश्मा देसाई, अर्चना निकम, सारिका नांदेकर आणि आरोग्य उपसंचालक डॉ. दिलीप माने, पंचायत समिती सदस्य सुवर्णा ढेंगे,आरोग्य विभागाचे अधिकारी आणि रोटरी क्लबचे पदाधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## गोकुळच्या ११०८ दुध संस्थांच्या मताधिकारासाठी लढा देणार-तायशेटे

शिरगाव,ता.१२(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) सभासद असलेल्या १,१०८ संस्थांना मतदानापासून वंचित ठेवण्यासाठी न्यायालयात सुरू असलेला वाद हा त्या संस्थांवर व त्या संस्थांच्या दूध उत्पादकांवरही अन्याय करणारा ठरेल.**

म्हणूनच त्या संस्थांना गोकुळच्या संभाव्य निवडणुकीत मतदानाचा हक्कमिळवून देण्यासाठी गोकुळ दूध संघाचा संचालक या नात्याने लढा देणार असल्याचे ठाम भूमिका गोकुळ दूध संघाचे संचालक अभिजित तायशेटे यांनी व्यक्त केली ते पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडताना ते बोलत होते.

## कोंडोशीच्या निखिलची इस्रोमध्ये निवड

गारगोटी,ता.१२(प्रतिनिधी)-

**भुदरगड तालुक्यातील कोंडोशी या छोट्याशा खेडेगावातील निखिल नयना नारायण बेळणेकर याची भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या इस्रो अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटरमध्ये प्रकल्प सहाय्यक-१ पदावर निवड झाली आहे.**



निखिलचे प्राथमिक शिक्षण (इ. १ ली ते ७ वी) स्थानिक जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर ८ वी ते १० वीचे शिक्षण प. बा. पाटील हायस्कूल, मुदाळ येथे पूर्ण केले. पुण्याच्या राजीव गांधी ज्युनियर कॉलेज आणि स्पेस ॲकॅडमीतून ११ वी, १२ वीचे शिक्षण घेतल्यानंतर, त्याने डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, तळसंदे येथून बी.टेक. (ॲग्री) आणि युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चर अँड सायन्स, बेंगलोर येथून एम.टेक. (ॲग्री) ही पदवी संपादन केली. निखिल हा कोंडोशी येथील प्राथमिक शिक्षक नारायण बेळणेकर यांचा मुलगा आहे.त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# शिरोळ तालुक्यात गहु,खपलीच्या कापणी,मळणीस वेग

बुबनाळ,ता.१२(अनिल जासुद)

**शिरोळ तालुक्यात सद्या परिपक्व झालेल्या गहु, खपली पिकांच्या कापणीस वेग आला असुन शेतकरी एखाद्या अवकाळी पावसाच्या अगोदर गहु, खपली पिकांची मळणी करुन धान्य घरात आणण्याच्या लगबगीत दिसुन येत आहेत.**

यावर्षी बहुतांशी शेतकऱ्यांनी आंतरपिक म्हणुन गहु, हरभरा, खपली पिके घेतली होती. रब्बी हंगामात गहु,हरभरा, खपली पिकांना अति थंडीमुळे पोषक वातावरण तयार होवुन पिके जोमात आली .



१) थ्रेशर यंत्राद्वारे मळणी करताना २) कापणी केल्यानंतर एका सुरक्षित ठिकाणी धान्य साठवताना घेतलेले छायाचित्र (छाया: अनिल जासुद)

ती पिके परिपक्व होवुन सद्या कापणीस आली आहेत.यासाठी शेतकरी मळणी यंत्रासह आधुनिक हार्वेस्टर सारख्या यंत्राचा वापर करुन कापणी, मळणी करुन घेत आहेत.

शिरोळ तालुक्यात शिरढोण येथील प्रणव माणगांवे यांनी पंजाबमधुन धान्य हार्वेस्टर यंत्र आणले आहे.या यंत्राद्वारे गहु, खपली, भात पिके शेतकऱ्यांच्या शिवारात जावुन कापणी व मळणी करुन देत आहेत.पिकांची कापणीसह मळणी करण्याचे सर्व काम मशिनद्वारे होते. यासाठी एकरी सहा हजार रुपये आकारणी घेत आहेत.परिणामी शेतकऱ्यांचा कापणीसाठी करावा लागणारा मजुर खर्च, श्रम,वेळ आदीची बचत होत आहे.

दरम्यान ज्या क्षेत्रामध्ये असे हार्वेस्टर मशिन जाऊ शकत नाही, असे काही शेतकरीवर्ग मजुरांच्या-कडून गहु, खपली पिकाची कापणी करुन पेंड्या बांधुन एक-दोन दिवस उन्हात वाळवत आहेत.यानंतर थ्रेशर यंत्राने मळणी करुन धान्य घरी आणत आहेत. यासाठी शेतकऱ्यांना पोत्यांच्या नगावर मळणीयंत्राचा खर्च द्यावा लागतो.मात्र या मळणी यंत्रासाठी मजुरवर्गांचीही आवश्यकता लागते. उन्हाचा तडाखा वाढत आहे. यातच हवामान तज्ञ पंजाबराव डंख यांनी पुढील आठवड्यात १६ मार्चपासुन काही दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. यामुळे लवकरात लवकर परिपक्व झालेली पिके हार्वेस्टर मशिनद्वारा रास करुन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

यावर्षी गहु, खपली, हरभरा पिकांना पोषक थंडी पडल्यामुळे पिके जोमदार आली.गव्हाला सरासरी एकरी १२ ते १५ क्विंटल उतारा मिळत असल्याने शेतकरीवर्गातुन समाधान व्यक्त होत आहे.

### उतारा चांगला मिळत असल्याने शेतकरी समाधानी

यावर्षी पहिल्यांदाच गव्हाचे पीक घेतले होते. पाण्याचे,खताचे योग्य व्यवस्थापन व पोषक वातावरणामुळे आमचे २५ गुठ्यांत ८ क्विंटल गहु उत्पादन निघाले आहे.

– सुनिल मोरे ( गहु उत्पादक शेतकरी.)

### तावडे हॉटेल ते छत्रपती शिवाजी पुलापर्यंत

# उड्डाण पुल कामाला गती मिळावी-खास.महाडिक

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

**संसदेच्या अधिवेशनात खास. धनंजय महाडिक यांनी कोल्हापूर शहरातील तावडे हॉटेल ते छत्रपती शिवाजी पुलापर्यंत उड्डाण पुल उभारण्याच्या कामाला गती मिळावी, अशी मागणी केली. त्याला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत सकारात्मक प्रतिसाद देवून,या प्रकल्पांबद्दल सविस्तर माहिती दिली.**



शिरोली जवळचा सांगली फाटयापासून उचगावपर्यंत पिलरवरील उड्डाण पुल उभारला जाणार आहे. सुमारे ३.६ किलोमीटर लांबीचा हा उड्डाण पुल आणि त्याला जोडूनच कोल्हापूर शहरात प्रवेश करण्यासाठी होणारा बास्केट ब्रिज पुर्ण झाल्यानंतर, महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल.मात्र तावडे हॉटेल ते कोल्हापुरातील छत्रपती शिवाजी पुलापर्यंत उड्डाण पुल होण्यासाठी गतीमान हालचाली व्हाव्यात,हा उड्डाण पुल पन्हाळापर्यंत न्यावा,तर शहरातील उड्डाण पुलाची एक बाजू फुलेवाडीपर्यंत वाढवावी,अशी मागणी खासदार महाडिक यांनी केली.

त्याबद्दल केंद्रीय मंत्री नामदार नितीन गडकरी यांनी सविस्तर माहिती दिली. कोल्हापूर महापालिकेने युटिलिटी शिफ्टिंग आणि जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण केली,तर केंद्र सरकारकडून शहरातील उड्डाण पुलाचे काम करण्यासाठी पूर्ण सहकार्य असेल,असे गडकरी यांनी स्पष्ट केले.

कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत रस्ते विकासासाठी सुमारे २५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मंजूर झाला असून,अनेक महत्त्वाची कामे पूर्ण झाली आहेत किंवा पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. शिरोली ते उचगाव दरम्यानच्या उड्डाण पुलासाठी ९१३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.तर कागल शहराजवळ ३५८ कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पाला मंजुरी दिल्याचे नामदार गडकरी यांनी स्पष्ट केले. खासदार महाडिक यांनी पिलरवरील उड्डाण पुल, बास्केट ब्रिज या बरोबर आता कोल्हापूर शहरातील उड्डाण पुलासाठी पाठपुरावा सुरू केला आहे.

# व्यावसायिक शिक्षणातून रोजगाराच्या संधी

## आर.वाय.पाटील;यशवंतराव पाटील विद्यालयात सत्कार संपन्न

राधानगरी,ता.१२(प्रतिनिधी)-

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना केवळ पदवी नाही तर कौशल्य मिळणार आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी अशा प्रशिक्षणांची मोठी गरज आहे.असे प्रतिपादन राधानगरी पंचायत समिती सभापती आर.वाय.पाटील यांनी केले.**



सोळांकूर येथे नूतन सभापती आर.वाय.पाटील यांचा सत्कार करताना सुरेश संकपाळ व इतर.

सोळांकूर,( ता.राधानगरी )येथे यशवंतराव पाटील विद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शालेय व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता या विषयावर आयोजित तालुकास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने हा कार्यक्रम पार पडला.

श्री.पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.पंचायत समिती समन्वयक अशोक पाटील म्हणाले, 'शालेय स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचा समावेश झाल्यास विद्यार्थ्यांमध्ये उद्योगशीलता आणि आत्मविश्वास वाढेल. शिक्षकांनी या बदलत्या शिक्षण पद्धतीला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. प्रदीप पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

यावेळी शशिकांत बैलकर, विनायक पांढरे, मुख्याध्यापक संघाचे माजी चेअरमन सुरेश संकपाळ, आर. डी. कांबळे, जयसिंग पोवार, मुकुंद कुंभार, किशोर बरगे,एन.एस. सुतार, विश्वास डोंगळे उपस्थित होते. मुख्याध्यापक एच.जे.ननवरे यांनी आभार मानले.

# गडहिंग्लज पालिका सभेत प्रचंड गदारोळ

## सत्ताधाऱ्यांकडूनच प्रशासन धारेवर; बांधकाम सभापती आणि सत्तारूढ सदस्य आमने-सामने

गडहिंग्लज,ता.१२(प्रतिनिधी)-

**नगर परिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान अंतर्गत प्राप्त निधी वरून सत्ताधारी आघाडीच्या सदस्यातच विशेष सभेत जोरदार वादावादी होऊन एकमेकांना इशारा देत गडहिंग्लज नगरपालिकेची विशेष सभा प्रचंड गदारोळात पार पडली.या सभेत बांधकाम सभापती आणि सत्ताधारी सदस्य यांच्यासह मुख्याधिकारी यांच्यात मंजूर कामाचा निधी अन्यत्र वळवल्याच्या कारणावरून हमरीतुमरी झाली. विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष महेश तुरबतमठ होते.**

गडहिंग्लज नगरपालिकेची विशेष सभा अनेक कारणावरून गदारोळात पार पडली. करोडो रुपयांच्या विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांनी आत्मचिंतन करावे असा घरचा आहेर गटनेते नरेंद्र भद्रापूर यांनी दिला.ते म्हणाले, लोकप्रतिनिधी म्हणून घ्यायला आम्हाला लाज वाटते. विकासाच्या केवळ गप्पा होतात.विकास कामे मार्गी लावण्याऐवजी ती अडवली जात असतील तर आम्हाला विचार करावा लागेल असे गटनेते नरेंद्र भद्रापूर यांनी सभागृहाला सुनावले. सत्तारूढ आघाडीतूनच अशी विचारणा झाल्याने सत्तारूढ मधील लाथाळ्या विशेष सभेत चर्चेत सापडल्या. प्रशासनावर आरोपांची सरबत्ती करत सत्तारूढांनीच विरोधकांची भूमिका निभावली असल्याचे काहीसे चित्र सभागृहात दिसून आले.

बांधकाम सभापती रामगोंडा उर्फ गुंडोपंत पाटील यांनी मुख्याधिकारी ढेकळे यांना बांधकाम सभापतीच्या कामाबाबतअसलेली नियमावली व तरतुदी याबाबत विचारणा केली.सभागृहात बांधकाम सभापतींचा अपमान केला जातो असे देखील गुंडोपंत पाटील यांनी निदर्शनास आणले. विषय समितीच्या मंजूर कामासंदर्भात प्रशासनाकडून दिरंगाई होत आहे अशी विचारणा करून गुंडोपंत पाटील यांनी सत्ताधारी बाकावरून प्रशासनाला धारेवर धरले.या विषयावरून मुख्याधिकारी व बांधकाम सभापती पाटील यांच्यात वाद झाला. बांधकाम समिती सभापतींना विश्वासात घेतले जात नाही. मंजूर कामे मार्गी लावली जात नाहीत त्यावर निधी उपलब्ध करून दिला जात नाही याबद्दल गुंडोपंत पाटील यांनी विचारणा करीत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.या मुद्यावरून मुख्याधिकारी ढेकळे व पाटील यांच्यात जोरदार वादावादी झाली. बांधकाम विषय समिती वरून गटनेते नरेंद्र भद्रापूर व बांधकाम सभापती गुंडोपंत पाटील आक्रमक झाले होते. त्यांनी लिंगायत समाज दफनभूमी वरील मंजूर निधी अन्य प्रभागातील कामांकडे वळवल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

या प्रश्नावरून सदस्य अमर मांगले आणि बांधकाम सभापती गुंडोपंत पाटील यांच्यात खडाजंगी झाली. सदस्य रश्मिराज देसाई आणि गुंडोपंत पाटील व नरेंद्र भद्रापूर यांच्यात देखील वाद झाला. अखेर या वादावर नगराध्यक्ष महेश तूरबतमठ आणि उपनगराध्यक्ष महेश सलवादे यांनी हस्तक्षेप करीत पडदा टाकला.

सदस्य बसवराज खनगावे आणि विरोधी सदस्य स्वाती शिंदे कोरी यांच्यातदेखील मिळकत व अतिक्रमण विभागाच्या ठेक्यावरून जोरदार वादावादी झाली. गडहिंग्लज नगर पालिकेच्या इतिहासात ठेकेदारांकडून विरोध आणि प्रशासनाची नामुष्की यासह प्रशासक काळात झालेली विकास कामे, त्यांचा दर्जा,त्याला जबाबदार कोण? प्रसंगी ठेकेदारांना काळ्या यादीत टाका अशी मागणी सदस्य अमर मांगले, रश्मीराज देसाई यांनी लावून धरली.विशेष सभेत नगरसेविका बिनादेवी कुराडे, नितीन देसाई, संतोष चिकोडे यांनी चर्चेत सहभाग घेतला. प्रशासनाची बाजू मुख्याधिकारी देवानंद ढेकळे यांनी सांभाळली. अधीक्षक सारिका खोत यांनी नोटीसीचे वाचन केले. विशेष सभेस सर्व नगरसेवक उपस्थित होते.

# मुरगूड पालिका सभेत लिलाव प्रक्रियेवरून प्रशासन धारेवर

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)-

**मुरगूड शहरातील कापशी रोड परिसरातील वाढत्या नागरी वस्तीसाठी ७ लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधण्यास पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूरी देण्यात आली. पाच वर्षापूर्वी बांधलेल्या दुकान गाळ्यांच्या लिलाव प्रक्रियेस विलंब होत असल्याबद्दल या सभेत प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. तांत्रीक अडचणी बाजूला ठेवून दुकान गाळ्यांचा त्वरीत लिलाव काढण्याची सूचना सभागृहाने केली.**

### कापशी रोड वाढीव नागरी वस्तीसाठी ७ लाख लिटरचा जलकुंभ बांधण्यास मंजूरी

नगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात नगराध्यक्षा सौ सुहासिनी प्रविणसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा झाली.सभेच्या विषयपत्रिकेवर २० विषय होते.प्रामुख्याने नगरपालिका फंड तोकडा असल्याने या फंडातूनच अनेक खर्चाच्या तरतूदी कराव्या लागणार असल्याने प्राधान्यक्रम ठरवून हा फंड करण्यावर व पालिका फंडातील पूंजी वाढविण्यासाठी प्रशासनाने योग्य ती व्यवस्था करण्याच्या सूचना नगरसेवक शिवाजीराव चौगले व सुहास खराडे यांनी केली.बाजार बसक करात पालिका कर वसुली कर्मचाऱ्यांकडून दुजाभाव होतो तर काही कर्मचारी आपल्या मोबाईल नंबरवर ऑनलाईन पैसे वसूल करतात याकडे उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले व नगरसेवक सुनिल रणवरे यांनी लक्ष वेधले.याची मुख्याधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत याची चौकशी होईल व संबंधित कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल असे सांगितले.यावेळी इतर अनेक विषयावर झालेल्या चर्चेत नगरसेवक दत्तात्रय मंडलिक,बजरंग सोनुले, सत्यजित पाटील, रणजित भारमल,अनिल राऊत,राजेंद्र आमते, सुनिल मंडलिक, विजय राजीगरे,राहूल शिंदे नगरसेविका संजीवनी कांबळे,निकेलिन बारदेस्कर,सुरेखा लोकरे यांनी सहभाग घेतला. कार्यालय अधिक्षक स्नेहल नरके यांनी स्वागत केले मुख्य लिपिक रणजित निंबाळकर यांनी विषयपत्रिका वाचन केले. सभेस सर्व खातेप्रमुख अधिकारी नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते.

# गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसची निदर्शने

इचलकरंजी,ता.१२–

**आधीच महागाईने सर्वसामान्य जनतेचे जगणे कठीण बनले असताना केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने एलपीजी गॅसच्या किंमती वाढवून पठाणी लुट चालवली आहे. त्यामुळे घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात झालेली दरवाढ तात्काळ मागे घेण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन इचलकरंजी शहर काँग्रेस कमिटीतर्फे प्रांताधिकारी दीपक शिंदे यांना देण्यात आले. तत्पूर्वी दरवाढीच्या विरोधात जोरदार निदर्शने करत या संदर्भात सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.**



गॅस सिलिंडर दरवाढविरोधात प्रांत कार्यालयासमोर निदर्शने करताना काँग्रेसचे कार्यकर्ते.(छाया : अनंतसिंग)

निवेदनात, केंद्र सरकारने नुकतीच घरगुती गॅस सिलिंडर दरात ६० रुपये व व्यावसायिक गॅस सिलिंडर दरात ११४ रुपयांची भरमसाठ वाढ केलेली आहे. मुळातच आखाती देशातील युद्धाचे गंभीर परिणाम आपल्या देशास भोगावे लागत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे. डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकारने आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसच्या किंमती वाढल्या तरी त्याचा बोजा सामान्य जनतेवर पडू दिला नव्हता.

सबसिडी देऊन जनतेला महागाईचे चटके बसू दिले नाहीत. गॅस टंचाई नसल्याचे सरकार सांगत असले तरी वस्तु:स्थिती वेगळी असून सर्वसामान्य जनता तसेच हॉटेल्स, खानावळी, खाद्य पदार्थ बनवणारे व बनवून विकणारे छोटे व्यावसायिकांना सिलिंडर विनाअडथळा सहज उपलब्ध होईल याची व्यवस्था करावी तसेच सिलिंडरची दरवाढ कमी करावी,यासंदर्भात सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे म्हटले आहे.

आंदोलनात प्रदेश सचिव शशांक बावचकर, शहराध्यक्ष संजय कांबळे, बाबासाहेब कोतवाल, विद्या भोपळे, सावित्री हजारे, शुभांगी मुसळे, लक्ष्मी नलवडे, शुभांगी बोंगार्डे,युवराज शिंगाडे, प्रमोद खुडे, हारुण खलिफा, रविराज पाटील, सचिन साठे, अण्णा कांबळे, रवी वासुदेव, अनिल पचिंद्रे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# कोल्हापुरातील सुरक्षा व्यवस्था रामभरोसे!

## न्यायालयात मारहाण, मंदिरात पिस्तूल अन् व्हीआयपी कार्यक्रमात घुसखोरी

कोल्हापूर, ता. १२ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्ह्यात अलीकडील काही घटनांमुळे सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. जिल्हा व सत्र न्यायालय परिसरातील मारहाण प्रकरण, करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात पिस्तूल घेऊन प्रवेश केलेली घटना आणि मुख्यमंत्री उपस्थित असलेल्या कार्यक्रमात अनोळखी व्यक्ती व्यासपीठाजवळ पोहोचल्याचा प्रकार यामुळे पोलिसांच्या बंदोबस्त व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.**

७ मार्च रोजी कोल्हापूर जिल्हा व सत्र न्यायालयाच्या आवारात महिला पक्षकाराने एका महिला वकिलावर हल्ला केला. न्यायालय परिसरातच घडलेल्या या घटनेने न्यायालयीन सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला. या प्रकरणाची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने स्वतःहून (सुमोटो) याचिका दाखल केली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने न्यायालय परिसरातील सुरक्षा व्यवस्थेबाबत पोलीस प्रशासनाला जाब विचारला.

न्यायालय परिसरासारख्या ठिकाणी अशी घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. न्यायालयातच सुरक्षिततेचा भंग होत असेल तर इतर सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची सुरक्षा कितपत सक्षम आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर परिसरातही सुरक्षेतील त्रुटी समोर आल्या. २९ डिसेंबर २०२५ रोजी उत्तर (घाटी) दरवाजावर पोलीस बंदोबस्त असतानाच कमरेला पिस्तूल ठेवून एका व्यक्तीने मंदिरात प्रवेश केला. या प्रकरणात संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र मंदिर परिसरातील सुरक्षेच्या व्यवस्थेबाबत गंभीर चर्चा निर्माण झाली.

अंबाबाई मंदिर परिसरातील ड्युटी व्यवस्थेबाबतही अनेक बाबी पुढे आल्या आहेत. प्रवेशद्वारावर तैनात असलेले काही पोलीस कर्मचारी कर्तव्याच्या वेळेत परिसरातील यात्रिनिवासात जाऊन विश्रांती घेत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक वेळा मंदिराच्या अंतर्गत सुरक्षेसाठी नेमलेले खासगी सुरक्षा रक्षकच प्रवेशद्वारावर पहारा देताना दिसत आहेत.

ड्युटी नियोजनाबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका पोलीस कर्मचाऱ्याला सलग आठ महिन्यांपासून त्याच ठिकाणी ड्युटी देण्यात येत आहे.

बंदोबस्तासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या आणि रोटेशनबाबत अपेक्षित नियोजन होत नसल्याची नाराजी पोलीस दलात व्यक्त होत आहे. ड्युटीचे नियोजन करणाऱ्या 'त्या' हजेरी मास्तरांची पोलीस वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. या संपूर्ण व्यवस्थेकडे पाहणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारीही यानिमित्ताने अधोरेखित होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कोल्हापुरातील एका कार्यक्रमातही सुरक्षा कवच भेदण्याचा प्रकार घडला. कार्यक्रमस्थळी एक अनोळखी व्यक्ती थेट व्यासपीठाजवळ जाऊन पहिल्या रांगेत बसल्याचा प्रकार समोर आला. या घटनेमुळे व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड झाल्या.

अशा घटना घडूनही सुरक्षा व्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा होत नसल्याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. तसेच या प्रकारांसाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्यानेही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

राज्य गुप्तवार्ता विभागाकडून अंबाबाई मंदिर, जोतिबा मंदिर, विमानतळ आणि कारागृह यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांची नियमित सुरक्षा तपासणी केली जाते. या तपासणीत आढळणाऱ्या त्रुटी दूर करण्याबाबत सूचना दिल्या जातात. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक ठिकाणी ढिलाई दिसून येत आहे.

शहरातील पोलीस विभागाची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे, त्यांनी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले असून या बाबींवर वरिष्ठ पातळीवर कोणतीही कारवाई झालेली दिसून येत नाही.

# हुपरी पोलीस ठाणे आवारात दोन गटांत राडा

## जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांचा लाठीचार्ज

हुपरी, ता.१२(वार्ताहर)–

**अल्पवयीन मुलीचा पाठलाग केल्याच्या कारणावरून तक्रार देण्यासाठी आलेले दोन गट हुपरी पोलीस ठाण्याच्या आवारात एकमेकांना शिवीगाळ करत भिडले. या गटांना पांगवण्यासाठी पोलिसांना अखेर लाठीचार्ज करावा लागला.**

हातकणंगले तालुक्यातील एका गावातील दोन युवक गावातीलच एका अल्पवयीन मुलीचा सातत्याने पाठलाग करत होते. भयभीत झालेल्या या मुलीने गुरुवारी सायंकाळी हा प्रकार आपल्या घरी सांगितला. मुलीला संरक्षण मिळावे आणि संबंधित युवकांना अद्दल घडावी, या उद्देशाने मुलीच्या नातेवाइकांनी थेट हुपरी पोलीस ठाणे गाठले. ही माहिती मिळताच संशयित आरोपींचे काही नातेवाईकही तिथे पोहोचले आणि त्यांनी मध्यस्थी करून तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू केला. याच दरम्यान, पोलीस ठाण्याच्या आवारातच काही युवकांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत एकमेकांना बघून घेण्याची भाषा करत राडा घालण्यास सुरुवात केली. एकमेकांना बघून घेण्याची भाषा वापरली जाऊ लागली. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून पोलिसांनी थेट लाठीचार्ज करत या टवाळखोरांना पिटाळून लावले. यावेळी काही युवकांना पोलिसांनी चांगलाच पोलिसी खाक्या दाखवला. पोलीस ठाण्याच्या आवारातच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असतानाही, या घटनेची रात्री उशिरापर्यंत पोलिसांत कोणतीही नोंद करण्यात आली नव्हती. मात्र, अल्पवयीन मुलीचा पाठलाग करणाऱ्या त्या दोन युवकांवर रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# जोल्ले ग्रुप व हालसिध्दनाथ कारखाना ; कृषी उत्सवाला प्रतिसाद

## ढोल वादन स्पर्धेत उचगांवचा मंगराय्यासिदा वालंग मंडळ प्रथम

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)–

**आमदार शशिकला जोल्ले व जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी खासदार आण्णासाहेब जोल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली जोल्ले ग्रुप व श्री हालसिध्दनाथ सहकारी साखर कारखान्याच्यावतीने कृषी उत्सव सोहळा सुरू आहे.निपाणीतील हालसिध्दनाथ कारखाना कार्यस्थळावर तब्बल १८ एकर क्षेत्रामध्ये बुधवारी ११ पासून सहा दिवसांचा कृषी उत्सव सोहळा चालणार आहे. या कृषी उत्सवाला वाढता प्रतिसाद लाभत आहे. शर्यती, धनगर ढोल वादन स्पर्धा आणि मर्दानी खेळाच्या स्पर्धांनी सोहळा आणखीनच बहारदार होत आहे.**

भव्य धनगरी ढोल स्पर्धेत मंगराय्यासिदा वालंग उचंगाव मंडळाने प्रथम क्रंमाक पटकावून



श्री हालसिध्दनाथ कारखाना कार्यस्थळावर कृषी उत्सवात ढोल वादन स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी अदृश्य काडसिध्देश्वर स्वामी,माजी खास.अण्णासाहेब जोल्ले,आम. शशिकला जोल्ले, बसवप्रसाद जोल्ले व इतर मान्यवर.

रोख १५ हजाराचे बक्षिस मिळविले. व्दितीय क्रमांक संतुबाई वालंग मंडळ (हेरवाड) यांनी १२ हजाराचे बक्षिस पटकाविले. तृतीय क्रमांक म्हसोबा बिरदेव वालंग मंडळ (भुयेवाडी) यांनी पटकावून १० हजाराचे बक्षिस पटकाविले. तर चतुर्थ क्रमांक लक्ष्मी महालिंगराय्या वालंग मंडळ (ढोणेवाडी) यांना ७ हजार तर म्हसोबा वालंग मंडळ (यमगर्णी ) यांनी पाचव्या क्रंमाकाचे ५ हजाराचे बक्षिस पटकाविले. विजेत्यांना बीडीसी बॅकेंचे चेअरमन अण्णासाहेब जोल्ले, आमदार शशिकला जोल्ले, बसवप्रसाद जोल्ले यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

सायंकाळी ५.३० वाजता धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत पोवाडा झाला. त्यांनतर बंगळूरूच्या प्रल्हाद आचार्य व त्यांची मुले पूजा आणि प्रतिक यांनी सायकिक सिबलिंग्ज कार्यक्रमात मनातील ओळख करण्याची कला सादर केली.त्यानंतर स्पीकिंग शॅडोज कार्यक्रम झाला. कोल्हापूरच्या स्वप्नील यादव यांच्या मित्राय प्रोडक्शनच्या भजन रॉक्स कलाकारांनी सादर केलेल्या भजनाने कार्यक्रमाला रंगत आली.

कार्यक्रमास माजी खास. अण्णासाहेब जोल्ले, आम. शशिकला जोल्ले, ज्योतीप्रसाद जोल्ले, प्रिया जोल्ले, बसवप्रसाद जोल्ले, यशस्वीनी जोल्ले, चेअरमन एम.पी. पाटील, व्हा.चेअरमन पवन पाटील, आशिषभाई शाह, तृप्ती शाह, जयवंत भाटले, राजु गुंदेशा, बंडा घोरपडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# 'श्री दत्त -शिरोळ'कारखान्याकडून उसाची बिले एक रकमी आदा

## गणपतराव पाटील

शिरोळ,ता.१२–

**श्री दत्त कारखान्याने कायमच शेतकऱ्यांची ऊस बिले एकरकमी विना कपात आदा करून ऊस दराबाबतची विश्वासाहर्ता जोपासली आहे.यावर्षीच्या गळीत हंगामात साखर कारखान्याने ११ लाख ७८ हजार ७०५ मे.टन उसाचे गाळप केले आहे. या हंगामात १२.३५ टक्के साखर उतारा मिळाला आहे व १२ लाख ८५ हजार ९७० क्विंटल साखर उत्पादन केले आहे. कारखान्याने कमी दिवसात जास्तीचे गाळप केले आहे.**




केंद्र शासनाच्या एफआरपीच्या धोरणानुसार कारखान्यास या हंगामात गाळपास उपलब्ध होणाऱ्या उसास प्रतिटन ३,३७८ रुपये देय होती. परंतु कारखाना व्यवस्थापनाने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने गाळपास उपलब्ध होणाऱ्या उसास प्रति टन ३४५० रुपये देण्याचे धोरण निश्चित केले होते. त्यानुसार कारखान्यास हंगामात गाळपास उपलब्ध झालेल्या एकूण ११ लाख ७८ हजार ७०५ मे. टन उसाचे बिल एकूण ४०६ कोटी ६५ लाख ३२ हजार रुपये इतके शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केले आहेत. कारखान्याने या हंगामात गळीत केलेली सर्व उसाची प्रति टन रुपये ३४५० प्रमाणे देय होणारी रक्कम १००टक्के आदा केली आहेत, अशी माहिती कारखान्याचे संचालक उद्यान पंडित गणपतराव पाटील यांनी दिली.

कारखाना शेतकऱ्यांची ऊस शेती आर्थिक दृष्ट्या किफायतशीर व्हावी या हेतूने ऊस विकास योजनेअंतर्गत विविध उपक्रम हाती घेत असतो.या उपक्रमांतर्गत सहभागी क्षेत्राची एकरी उत्पादकता सर्वोत्कृष्ट आहे. पत्रकार परिषदेस कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, व्हा. चेअरमन शरदचंद्र पाठक, अनिलराव यादव, प्रमोद पाटील, शेखर पाटील, कार्यकारी संचालक एम. व्ही. पाटील उपस्थित होते

# ४० विद्यार्थ्यांना १ कोटीची शशिकला जोल्ले शिष्यवृत्ती-बसवप्रसाद जोल्ले

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)–

**स्पर्धात्मक परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळवावे या उद्देशाने, जोल्ले शैक्षणिक संस्थेच्या अण्णासाहेब जोल्ले स्वतंत्र निवासी पदवीपूर्व विज्ञान महाविद्यालय(निपाणी) यांनी घेतलेल्या 'शशिकला जोल्ले शिष्यवृत्ती' परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले असल्याची माहिती जोल्ले ग्रुपचे उपाध्यक्ष बसवप्रसाद जोल्ले यांनी दिली.**




अण्णासाहेब जोल्ले स्वतंत्र पदवीपूर्व महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बसवप्रसाद जोल्ले, बाजूस प्रशासक एम.एम. पाटील, प्राचार्य दीपक पाटील आदी.

श्री अण्णासाहेब जोल्ले स्वतंत्र पदवीपूर्व महाविद्यालयात पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, या शिष्यवृत्तीची एकूण रक्कम १ कोटी रुपये आहे आणि ही शिष्यवृत्ती वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या हुशार आणि पात्र विद्यार्थ्यांना दिली जाईल.

गेल्या वर्षी २० विद्यार्थ्यांना ६४ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली होती. यावर्षी ती १ कोटी रुपये करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती एकूण ४० विद्यार्थ्यांना लागू असेल. ते चार टप्प्यात विभागले गेले आहे, असे त्यांनी सांगितले. यामध्ये पहिल्या १० विद्यार्थ्यांसाठी १००टक्के फी माफी, ११ वी ते २० वी क्रमांकासाठी ७५ टक्के, २१ वी ते ३० वी क्रमांकासाठी ५०टक्के आणि ३१ वी ते ४०वी क्रमांकासाठी २५टक्के फी माफी असेल. ४ जानेवारी रोजी शैक्षणिक जिल्ह्यातील आठ केंद्रांवर झालेल्या परीक्षेत सहभागी झालेल्या पहिल्या १० विद्यार्थ्यांना १००टक्के शिष्यवृत्ती दिली जाईल, म्हणजेच दोन वर्षात एकूण ४ लाख रुपये. ११ वी ते २० वी क्रमांकासाठी येणाऱ्यांना ७५ टक्के शिष्यवृत्ती दिली जाईल, म्हणजेच पहिल्या वर्षी १.५० लाख रुपये आणि दुसऱ्या वर्षी ५० हजार रुपये. २१ वी ते ३०वी क्रमांकासाठी येणाऱ्यांना ५० टक्के शिष्यवृत्ती दिली जाईल, म्हणजेच दोन वर्षांत एकूण १ लाख रुपये दिले जातील.३१ व्या ते ४० व्या क्रमांकावर येणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ टक्के शिष्यवृत्ती म्हणजेच ५० हजार रुपये दिले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी प्रशासक एम.एम. पाटील, प्राचार्य दीपक पाटील उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे जखमी

टोप,ता.१२( प्रतिनिधी)–

पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर सांगली फाटा येथील हॉटेल पार्वतीसमोर अज्ञात वाहनाने दुचाकीस मागून जोराची धडक दिल्याने दोघेजण गंभीर जखमी झाले. अमित चौगुले(वय ४६) व प्रथमेश सोने (वय २१)अशी जखमींची नांवे आहेत.जखमींना कोल्हापूर येथील खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. हा अपघात गुरूवारी सायंकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास घडला. अमित व प्रथमेश हे पुण्याहून कोल्हापूरच्या दिशेने जात होते. शिरोली पुलाची येथील हॉटेल पार्वती समोर हायवेवर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दोघे जखमी झाले.जखमीना रूग्णवाहिकेतून उपचारासाठी खासगी रूग्णालयात दाखल केले आहे या अपघातात मोटरसायकलचा चक्काचूर झाल्याने या अपघाताची भीषणता दिसून येत आहे या अपघाताची नोंद रात्री उशिरापर्यंत शिरोली पोलिसात झाली नव्हती.

# लोखंडी रॉडने युवकास मारहाण

कोल्हापूर ता.१२(प्रतिनिधी) –

आपल्या विरोधकाला मदत केल्याच्या गैरसमजातून सचिन युवराज पाटील (वय ३३, रा. आमशी ता. करवीर) या तरुणाशी भांडण काढून त्याच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून गंभीर जखमी केले. आमशी (ता.करवीर) गावात हा प्रकार घडला. या प्रकरणी भिवा ज्ञानू पाटील, गौरव भिवा पाटील, संगीता भिवा पाटील (रा.आमशी) यांच्यावर करवीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हेड कॉन्स्टेबल धनवडे तपास करीत आहेत.

**कोल्हापूर महानगरपालिका**
**(शहर पाणी पुरवठा ड्रेनेज विभाग )**
**ई-जाहीर निविदा नोटीस क्र. १३६/२०२५-२६**

सर्व ठेकेदार यांना कळविणेत येते की, महानगरपालिका स्वनिधी अंतर्गत पंपसेट दुरुस्ती वार्षिक निविदा पध्दतीने करणे, बाहय यंत्रणेद्वारे कर्मचारी पुरवठा करणे, स्पॉट बिल अंतर्गत प्रिंटर काट्रेज पुरवठा करणे तसेच पाणी पुरवठा व ड्रेनेज अनुषंगाने इतर कामे या कामाकरीता महा ई-निविदा मागविणेत येत आहेत. या कामांची सविस्तर तपशिल www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

निविदा फॉर्म प्राप्त करणेचा, बयाणा रक्कम भरणेचा व निविदा फॉर्म सादर करणेचा कालावधी दि. १३-०३-२०२६ पासून दि. २०-०३-२०२६ अखेर आहे.

सही/-
जल अभियंता
कोल्हापूर महानगरपालिका

# भरधाव कारची बॅरीकेटसला धडक

## गाडीचे नुकसान : एकजण जखमी

हेरले,ता.१२(प्रतिनिधी)–

**पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर पुलाची शिरोलीत मदरसा जवळील वळण वाहनधारकांसाठी मृत्यूचा सापळा बनले आहे. या धोकादायक वळणावर गुरुवारी पहाटे तीनच्या सुमारास स्विफ्ट डिझायर कार सिमेंटच्या बॅरिकेटवर जोरात आदळली. हा अपघात इतका भीषण होता की सुमारे एक टनाचे बॅरिकेट १० फूट लांब सरकून कार बॅरिकेटवरच अडकून राहीली. या अपघातात गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तसेच कारमधील प्रवासी जखमी झाला आहे .**

शिरोली एमआयडीसी पोलिस ठाण्यात रात्री उशीरापर्यंत नोंद झाली नव्हती.

याच ठिकाणी मागील महिन्यात एका उद्योजकाच्या कारचा तसेच गडहिंग्लज येथील दुचाकीस्वाराचा असाच अपघात झाला होता. ज्यामध्ये दुचाकी बॅरिकेटवर अडकली होती.तर आलिशान कारचा चक्काचूर झाला होता.पण जीवित हानी झाली नव्हती. आता कारचाही तसाच अपघात झाल्याने परिसरातील नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या सथगतीने सुरू आहे. मात्र या कामामुळे सामान्य जनतेला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अपघातास कारणीभूत ठरणारे व वारंवार अपघात होवूनही अपघात स्पॉटच्या ठिकाणी वळणापूर्वी प्रवाशांना सावध करण्यासाठी आवश्यक असलेले दिशादर्शक कोणतेही फलक महामार्ग प्राधिकरणाने (रस्ते बांधणी विभागाने) लावलेले नाहीत. महामार्गावर वाहनांचा वेग प्रचंड असतो.

परंतु या वळणावर वेग मर्यादित करण्यासाठी रंमलर स्ट्रिप्स किंवा स्पीड ब्रेकर नाहीत. यामुळे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहन चालकांना वळणाचा अंदाज येत नसल्याने गाड्या थेट बॅरिकेट्सवर जाऊन आदळत आहेत.

**ग्रामपंचायत वाघापूर ता. भुदरगड जि. कोल्हापूर**
**जाहिर ई-निविदा सु.क्र.०१ सन २०२५-२६**

ग्रामपंचायत वाघापूर ता. भुदरगड जि. कोल्हापूर कडील पुर्नरचित राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना सन २०२५-२६ मुलभूत सुविधा (बांधकाम) योजनेअंतर्गत खालील दोन कामाची ई - निविदा ऑनलाईन http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.११.०३.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजले पासून प्रसिध्द करणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व योजना | निविदा रक्कम | निविदा संच फी | १.०० टक्के इसारा रक्कम | काम पूर्ण करावयाची मुदत | आवश्यक मक्तेदारांची नोंदणी वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौ. वाघापूर ता. भुदरगड येथे ग्रामपंचायत इमारत बांधकाम करणे. | १९९१६७६.०० | १०००.०० | १९९१७.०० | सहा महिने | जिल्हा परिषद कडील वर्ग-५-अ व त्यावरील नोंदणीकृत मक्तेदार |
| २ | मौ. वाघापूर ता. भुदरगड येथे नागरीसुविधा केंद्र खोली बांधकाम करणे. | ४९७९२३.०० | १०००.०० | ४९७९.०० | सहा महिने | जिल्हा परिषद कडील वर्ग-७- व त्यावरील नोंदणीकृत मक्तेदार |

सदर कामाची विस्तृत जाहीर निविदा सूचना अटी/शर्तीसह http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

**वरील निविदेच्या महत्त्वाच्या तारखा**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द व डाऊनलोड कालावधी | दि. ११/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० पासून | दि. १९/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० पर्यंत. |
| २ | ऑनलाईन निविदा व निविदा फॉर्म फी / इसारा रक्कम सबमिशन कालावधी | दि. ११/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० पासून | दि. १९/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडणेचा कालावधी | दि. २०/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० पासून | |

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत वाघापूर, ता. भुदरगड**

**सरपंच**
**ग्रामपंचायत वाघापूर, ता. भुदरगड**

**SHREE HALASIDHANATH SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD**
Shankaranandnagar, Nipani- 591237 Dist: Belagavi (Karnataka)
Ph:(08338): 220355,9036754226,9535370190 e-mail: hssksales@gmail.com

No:HSSK/SALES/SCRAP-TENDER/2025-26/4030 Date:12/03/2026

**TENDER NOTIFICATION**

Sealed tenders are invited from the scrap dealers for sale of following scrap materials

| SN | Name of Material | Quantity(Approx.) |
|---|---|---|
| 1 | M S Scrap Material (Heavy & Light) | 200 MT |
| 2 | S S Scrap Material | 1 MT |
| 3 | C I Scrap Material | 15 MT |
| 4 | Electric Motors | 20 NOS |
| 5 | Disk with Tyres Tube | 50 NOS |
| 6 | Tyres | 100 NOS |
| 7 | M S Tin Barrel | 50 NOS |
| 8 | Empty Plastic Barrel | 10 NOS |
| 9 | Plastic Empty Can | 120 NOS |
| 10 | Scrap Empty PP Bag Lime, Sulpher, Sugar | 5 MT |
| 11 | Nickel Screen | 50 KG |
| 12 | Rubber Goods | 1 MT |
| 13 | Electric Cable | 2 MT |
| 14 | Aluminum Material | 0.5 MT |
| 15 | Bearing | 0.5 MT |
| 16 | Nylon Rope | 0.5 MT |
| 17 | Cartoon Box | 60 KG |
| 18 | Wooden Box | 100 KG |

The Tenderers have to deposit an EMD amount of Rs. 15,00,000/-. The tender form for sale of above scrap materials will be issued during office hours on payment of non-refundable form fee of Rs. 1000/- each. The tender shall be submitted on or before 27/03/2026 along with EMD amount as mentioned above, in the form of E-payment/DD drawn in favor of the Karkhana and the date of negotiation will be intimated separately.

Sd/- (Appasaheb A.Shiragave)
Managing Director

# आयपीएल संघ नेट्स शेअर करू शकणार नाहीत

## बीसीसीआयची सराव सत्रासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी

मुंबई,ता.१२ –

**बीसीसीआयने आयपीएल संघांच्या सराव सत्रांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यानुसार, कोणताही संघ अशा नेट किंवा पिचवर सराव करू शकणार नाही, ज्यावर दुसऱ्या संघाने यापूर्वी सराव केला असेल. प्रत्येक संघाला सरावासाठी स्वतंत्र आणि नवीन नेट उपलब्ध करून दिले जातील.**

जर दोन संघ वेगवेगळ्या वेळी सराव करत असतील, तरीही पहिल्या संघाने वापरलेले नेट दुसऱ्या संघाला दिले जाणार नाहीत. जर एखाद्या संघाने लवकर सराव संपवला, तरीही दुसऱ्या संघाला त्याची रेंज-हिटिंग पिच वापरता येणार नाही.आयपीएलची सुरुवात २८ मार्चपासून होईल. पहिला सामना गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात बंगळूरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जाईल.

फ्लडलाइटमध्ये सराव सामन्याचा कालावधी जास्तीत जास्त साडेतीन तास असेल. प्रत्येक संघाला बीसीसीआयच्या परवानगीनंतर जास्तीत जास्त २ सराव सामने खेळण्याची परवानगी असेल. तथापि, हे सामने मुख्य खेळपट्टीवर खेळले जाणार नाहीत, तर बाजूच्या विकेटवर आयोजित केले जातील. फ्रँचायझीच्या पहिल्या घरच्या सामन्याच्या ४ दिवस आधीपर्यंत मुख्य खेळपट्टीवर कोणताही सराव सत्र किंवा सराव सामना होणार नाही, जेणेकरून खेळपट्टी हंगामासाठी तयार करता येईल. सराव सत्राची वेळ निश्चित करताना यजमान संघाला प्राधान्य दिले जाईल. जर दोन्ही संघांना एकाच वेळी सराव करायचा असेल आणि त्यांच्यात सहमती झाली नाही, अशा परिस्थितीत, हस्तक्षेप करून सरावासाठी वेगवेगळ्या वेळेचे स्लॉट निश्चित करेल.मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सराव सत्रादरम्यान केटरिंग, वैद्यकीय सेवा, सुरक्षा आणि इतर सुविधांची जबाबदारी यजमान फ्रँचायझीची असेल. तर पाहुण्या संघाला त्यांच्या पेयांची व्यवस्था स्वतः करावी लागेल.

**१) फ्लडलाइटमध्ये सराव सामन्याचा कालावधी जास्तीत जास्त साडेतीन तास असेल. प्रत्येक संघाला बीसीसीआयच्या परवानगीनंतर जास्तीत जास्त २ सराव सामने खेळण्याची परवानगी असेल. हे सामने मुख्य खेळपट्टीवर खेळले जाणार नाहीत, तर बाजूच्या विकेटवर आयोजित केले जातील.**

**२) फ्रँचायझीच्या पहिल्या घरच्या सामन्याच्या ४ दिवस आधीपर्यंत मुख्य खेळपट्टीवर कोणताही सराव सत्र किंवा सराव सामना होणार नाही. सराव सत्राची वेळ निश्चित करताना यजमान संघाला प्राधान्य दिले जाईल. जर दोन्ही संघांना एकाच वेळी सराव करायचा असेल आणि त्यांच्यात सहमती झाली नाही तर हस्तक्षेप करून सरावासाठी वेगवेगळ्या वेळेचे स्लॉट निश्चित करेल.**

**३) सराव सत्रादरम्यान केटरिंग, वैद्यकीय सेवा, सुरक्षा आणि इतर सुविधांची जबाबदारी यजमान फ्रँचायझीची असेल. तर पाहुण्या संघाला त्यांच्या पेयांची व्यवस्था स्वतः करावी लागेल.**

# राहुल द्रविडला मिळणार जीवनगौरव

नवी दिल्ली,ता.१२–

**भारतीय संघातील स्टार फलंदाज शुभमन गिलला आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेला सुरूवात होण्याआधी टी-२० संघातून बाहेर करण्यात आले होते. पण वनडे आणि कसोटी संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी गिलकडेच आहे. गिलने गेल्या वर्षात वनडे आणि कसोटी क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली होती. भारतासाठी सर्वाधिक धावा करणाऱ्या गिलचा बीसीसीआयकडून मोठा सन्मान केला जाणार आहे. गिलचा क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. तर भारतीय संघाला टी-२० वर्ल्डकप जिंकून देणारे आणि भारतीय क्रिकेटमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या राहुल द्रविड यांचा कर्नल सी.के. नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे.**

वृत्तानुसार, दिल्लीत १५ मार्चला बीसीसीआयकडून पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाणार आहे. बीसीसीआयकडून दरवर्षी दमदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना नमन पुरस्कार दिला जातो. भारताचा वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिलला क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कार दिला जाणार आहे. तर भारतीय संघाला अंडर-१९ वर्ल्डकप जिंकून देणारा कर्णधार आयुष म्हात्रेचा लाला अमरनाथ पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. तसेच भारताची माजी कर्णधार मिताली राजला देखील जीवनगौरव पुरस्कार दिला जाणार असल्याची चर्चा सुरू आहे. देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वोत्तम क्रिकेट असोसिएशनचा पुरस्कार हा मुंबई क्रिकेट असोसिएशनला दिला जाणार आहे.

राहुल द्रविड यांने आपल्या काळात मैदान गाजवले आहे. भारतीय क्रिकेटमधील टॉप ४ फलंदाजांचा यादीत राहुल द्रविड यांचा देखील समावेश आहे. गोलंदाज गोलंदाजी करून करून थकून जायचा पण राहुल द्रविड काही विकेट फेकत नव्हते. मोठी खेळी करण्याची क्षमता असल्यामुळे त्यांना भारताची भिंत असं नाव दिलं गेलं होतं. राहुल द्रविड यांच्या नावे १० हजारांहून अधिक धावा करण्याची नोंद आहे.

राहुल द्रविड यांने २०१२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची

### शुभमनचा क्रिकेटर ऑफ द इयरने होणार सन्मान

घोषणा केली होती. त्यानंतर काही वर्ष समालोचन केले. त्यानंतर त्यांने प्रशिक्षकाची भूमिका बजावली. राहुल द्रविड याने पृथ्वी शॉ, यशस्वी जैस्वाल आणि शुभमन गिलसारखे फलंदाज घडवले.

भारतीय संघाला अंडर- १९ वर्ल्डकप जिंकून देण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली. २०२४ मध्ये राहुल द्रविड याच्या मार्गदर्शनाखाली भारताने टी-२० वर्ल्डकप जिंकण्याचा मान पटकावला होता. तर २०२३ मध्ये वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला होता.

# सोनाली मंडलिककडून दिक्षा सिंह ढाक डावावर चितपट

## इचलकरंजीतील मैदानात ५० वर अधिक रंगतदार कुस्त्या

इचलकरंजी,ता.१२–

**येथील व्यंकोबा मैदान येथे झालेल्या मुलींच्या कुस्ती मैदानात राष्ट्रीय विजेती पै.सोनाली मंडलिक (अहिल्यानगर) हिने ढाक डावावर हरियाणाची विश्व चॅम्पियन पै.दीक्षा सिंह हिला आस्मान दाखवत मैदान जिंकले.**

इचलकरंजी महापालिकेच्यावतीने महिला दिनानिमित्त मुलींच्या कुस्ती मैदानाचे आयोजन केले होते. मैदानात ५० हून अधिक कुस्त्या झाल्या. अति.आयुक्त सुषमा शिंदे, उपमहापौर अनिल डाळ्या, महाराष्ट्र श्री अजिंक्य रेडेकर, किरण कोळी, स्थायी सभापती सतीश मुळीक, सभापती अरुणा बचाटे, रुपाली सातपुते, विद्या साळुंखे, उपसभापती प्रमिला जावळे, नगरसेविका अलका स्वामी, तेजश्री भोसले, मेघा भोसले, पूनम माळी, ज्योती पाटील, रुपा बुगड, रुपाली कोकणे, नगरसेवक शिवाजी पाटील, राजू पुजारी, पै.अमृत भोसले, माजी नगरसेवक अब्राहम आवळे, भाऊसो आवळे आदींच्या प्रमुख उपस्थितीत कुस्त्यांना प्रारंभ झाला.



**पै.सोनाली मंडलिक हिला पारितोषिक देताना अति.आयुक्त सुषमा शिंदे शेजारी तेजश्री भोसले,पूनम माळी,रूपाली सातपुते, अमृत भोसले व इतर. (छाया–छोटूसिंग)**

पहिल्या क्रमांकासाठी झालेल्या अटीतटीच्या कुस्तीत पै.सोनाली व पै. दीक्षा आक्रमक होत एकमेकांवर पकड घेण्याचा प्रयत्न करीत होत्या. पै.सोनालीने पटाला डावावर तर पै. दीक्षा हिने खेमी डावावर कब्जा घेण्याचा प्रयत्न केला. काही मिनिटातच ढाक डावावर पै.सोनालीने पै.दीक्षाला चितपट केले. यावेळी कुस्ती शौकीनांनी जल्लोष केला.

दुसऱ्या क्रमांकासाठी महिला महाराष्ट्र केसरी पै.प्रतीक्षा बागडी व उपमहाराष्ट्र केसरी पै.वेदिका पोवार यांच्यात लढत झाली. दोघींमध्ये खडाखडी खुप वेळ सुरू होती. पै.प्रतिक्षाने पै.वेदिकावर कब्जा घेत समोरुन झोळी डाव लावण्याचा प्रयत्न केला तर पै.वेदिकानेही सावध भूमिका घेत आक्रमक होत पै.प्रतीक्षावर कब्जा घेण्याचा प्रयत्न केला. पै.प्रतीक्षाने पट घालून डाव घेण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळेत कुस्ती न झाल्याने गुणावर कुस्ती घेण्यात आली. त्यात एक मिनिटाच्या झालेल्या कुस्तीत पै.वेदिकाने एकेरी पट लावून विजय मिळवला. तृतीय क्रमांकासाठी कागलची आंतरराष्ट्रीय पै.सृष्टी भोसले व कर्नाटकची पै.गायत्री सुतार यांच्यात रंगतदार लढत झाली. पै.सृष्टीने पहिल्यापासूनच आक्रमक होत हेवी डावावर कब्जा घेण्याचा प्रयत्न केला. मात्र पै.गायत्रीने तो धुडकावला. पुन्हा सृष्टीने फ्रंट लावला. मात्र तोही अयशस्वी ठरला. दोघींनी कब्जा घेण्याचा प्रयत्न केला. मात्र पोकळ घिस्सा डावावर अखेरीस पै.सृष्टीनेच पै.गायत्रीला आस्मान दाखवले.जोतिराव वाझे व सुकुमार माळी यांनी निवेदन केले. यावेळी दिपाली फडके, राजेश रजपुते, उपायुक्त नंदू परळकर,राहुल मर्ढेकर आदींसह कुस्ती शौकीन विशेषतः महिला व युवतींची गर्दी झाली होती.

